॥ श्रीराम ॥

आपली भारतीय संस्कृती ही रामायण महाभारताच्या स्तन्यावर पोसली आहे. रामायण - महाभारत हे आपल्या धर्मजीवनाचे, संस्कृतीचे आधारस्तंभच आहेत आणि त्यातही रामकथेला अपूर्व स्थान आहे. मर्यादापुरुषोत्तम राम, एकपत्नी, एकवचनी, एकबाणी राम हा आपल्या सर्वांसाठी आदर्श आहे. रामकथा, कृष्णकथा ऐकली नाही अशी व्यक्ती भारतात शोधूनही सापडणार नाही. आजही उत्तम राज्यकारभाराला 'रामराज्य' असेच म्हणतात. आणि अशा या आदर्श कथानायकाचा प्रवास आपल्या प्रतिभासंपन्न लेखणीतून पिढ्यानपिढ्यांपर्यंत पोहोचवणारे महर्षि वाल्मीकि देखील आदर्शच आहेत. त्यांच्या एका रामायणामधून कितीतरी कवींना प्रेरणा मिळाली. अगदी आपण जी रामरक्षा म्हणतो त्यातही 'चरितं रघुनाथस्य शतकोटि-प्रविस्तरम्।' असा कृतज्ञतापूर्वक उल्लेख आहेच. तुलसीदासांनी अवधी शैलीमध्ये लिहिलेले तुलसी रामायण उत्तरेकडील जनमानसात पूर्णपणे रुजले आहे. दक्षिणेकडे देखील ही रामकथा नाट्यरूपाने सादर केली जाते. खरोखर वाल्मीकी रामायण हे अजरामर आहे, अलौकिक, अद्वितीय आहे. मराठी माणसाच्या मनामनातही रामकथा भरून राहिलीय आहे. शतकानुशतके, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हा रामकथेचा वारसा सोपवला जात आहे.

परंतु तरीही मराठी मनावर गारूड करणाऱ्या रामगीतांनी समाजमनाला भारून टाकण्यासाठी मात्र २० वे शतक उजाडावे लागले. त्याचं असं झालं की आकाशवाणीच्या पुणे केंद्रामध्ये श्री. सीताकांत लाड हे सहनिर्देशक होते. ते स्वतः अतिशय रसिक व गुणग्राहक होते. साहित्याची उत्तम जाण त्यांना होती. रसिकांना दर्जेदार व असामान्य कार्यक्रम ऐकायला मिळावेत यासाठी अविरत प्रयत्न करणारे असा त्यांचा लौकिक होता. आकाशवाणीच्या माध्यमातून ज्ञान आणि संस्कार सर्वदूर पोहोचवण्याचे उदात्त काम ते करत होते परंतु

रसिकांची उत्तम गीत श्रवणाची व संगीताची भूक तृप्त करण्यासाठी ते प्रयत्नशील होते. माझ्या रसिक श्रोत्यांसाठी मी आणखी काय बरं करू शकतो? हा ध्यास त्यांनी घेतला होता. १९५५ सालच्या फेब्रुवारी महिन्यामध्ये सहजच त्यांच्या मनात विचार आला, की पुढच्या महिन्यात रामनवमी येत आहे. त्या निमित्ताने रामकथेतील काही प्रसंग गीतांच्या माध्यमातून सादर करता येतील का? गुढीपाडवा महिनाअखेरावरच आला होता. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असणारी ही वर्षप्रतिपदा - या शुभ दिवशी एका आगळ्या उपक्रमाला सुरुवात करता येईल. लगेचच डोळ्यांसमोर नाव आलं ते त्यांचे स्नेही गजानन दिगंबर माडगूळकर म्हणजेच गदिमांचे! गदिमांच्या कुटुंबात रामकथेचे वाचन नित्य चालतच होते, शिवाय त्यांच्या आईच्या माहेरीही रामायणाचे पाठ चालायचे. गदिमांवर अगदी लहानपणापासून रामकथेचे संस्कार झाले होते. त्यामुळे त्यांनी आनंदाने होकार दिला. ठरलं! बोलता बोलता पुढच्या रामनवमीपर्यंत हा उपक्रम करावा. दर आठवड्याला एका प्रसंगावर आधारित एक गीत लिहायचं नक्की झालं. असामान्य प्रतिभा असणाऱ्या गदिमांना हे काही अशक्य नव्हतंच मुळी! आता या गीतांना संगीत कोण देणार असा प्रश्नच मुळी उद्भवला नाही. अगदी सहजच संस्कारक्षम अशा सुधीर फडके उर्फ बाबूजी यांचं नाव समोर आलं. त्यांनीही या गोष्टीला मोठ्या प्रेमाने संमती दिली.

'सत्य संकल्पाचा दाता नारायण' असं म्हणतात ते, किती खरं असावं याचं प्रत्यंतरच जणू या निमित्ताने येत होतं. सत्-शुभ संकल्प करणं एवढंच माणसाच्या हाती असतं. पुढे त्याला पूर्णत्व आणण्यासाठी परमेश्वरच अशा काही गोष्टी घडवून आणतो, ज्याला आपण योगायोग म्हणतो. उत्तम प्रतिभावंत कवीच्या काव्याला साथ मिळाली ती प्रयोगशील अशा संगीतकार बाबूजींच्या

संगीताची! पण एवढ्यावरच हा योगायोग थांबणार नव्हता. आटवलेल्या दुधात केवळ साखरच नाही तर केशर वेलची पडणार होती. कारण या वर्षी अधिक महिना आल्यामुळे वर्षात ५२च्या एवजी ५६ आठवडे असणार होते.
अधिकस्य अधिकं फलम्!
पुरुषोत्तम मासामुळे या पर्यायपुरुषोत्तम असणाऱ्या रामकाव्या म्हणजेच रामकथेचा आस्वाद ४ आठवडे आणखी घेता येणार होता. सगळाच समसमा संयोग साधून आला. शब्द - स्वरांचा उत्तम मेळ जमून आला. त्यात आणखी बहार आली ती प्रभाकर जोगांच्या उत्तम वाद्यमेळामुळे! कुठेच न्यून नाही. उत्तम संयोजक, प्रतिभावंत कविराज आणि संगीतामध्ये नवनवीन प्रयोग करणारे बाबूजी! अशा या सुयोग्य, सुमेळ साधलेल्या कलाकृतीला नावही तसेच योग्य हवे. ते देखील सर्वानुमते लगेचच ठरले —— 'गीत रामायण'
अशी ही अपूर्व कलाकृति जमून येणं हे मानवी शक्तीच्या आवाक्याबाहेरचं काम आहे. ते केवळ आणि केवळ ईश्वरी प्रेरणेनेच घडू शकते. अशी ही अजरामर कलाकृती!
~~असा~~ या ५६ गीतांनी मराठी मनामनांवर अक्षरशः गारुड केलं. सच्च्या रसिक मराठी माणसाला यातील कितीतरी गीते अगदी मुखोद्गत आहेत. संगीतातल्या नेमक्या जागा ठाऊक आहेत. 'सेतु बांधा रे सागरी' या गीतामध्ये 'रे' किती लांबवायचा, पुनरावृत्ति किती वेळा करायची आणि प्रत्येक कडव्यानंतर आवेशाने सियावर रामचंद्रकी जय! कसं म्हणायचं? हे अगदी रोमरोमात भिनलं आहे.
हे शब्दवैभव आहे गदिमांचं! बाबूजींनी रसिकांचे कान तयार केले आणि योजकस्तत्र दुर्लभः या वचनानुसार ही समयसूचकता आहे श्री. सीताकांत लाड यांची.
६०/६५ वर्षे उलटली तरी, अगदी कितीही वेळा ही गीतं ऐकली तरी त्यांची खुमारी अजूनही कमी झालेली नाही.



©www.madhaveeraghuveer.com

कंटाळा नर कधीच येणार नाही. या गीत रामायणाचे देश परदेशात कितीतरी कार्यक्रम झाले. अगदी लहान मोठ्या गावामध्येही प्रयोग झाले.

'श्रीराम श्रीराम श्रीराम' असा बाबूजींचा मधाळलेला स्वर कानावर पडला ना, की पुढच्या गीताचा आनंद घेण्यासाठी रसिक श्रोते अगदी सरसावून बसायचे. अंगावर रोमांचाची फुलं फुलायची आणि आता पुढचे २.२.३० तास शब्द स्वरांच्या अमृतवर्षावात चिंब भिजण्यासाठी सज्ज व्हायचे.

त्यानंतर वेगवेगळ्या गावांमध्ये, वेगवेगळ्या गायकांकडून, वेगळ्या वाद्यवृंदामध्ये कितीही वेळा हे गीतरामायण ऐकलं तरी ते ताजेच वाटते. आजही अगदी आताही अंगावर रोमांच उभे राहतात.

असं हे गीतरामायण!

यातील बहुसंख्य गाणी आपल्या सर्वांच्या अंतःकरणाच्या अगदी जवळ आहेत. त्यातील शब्दसौंदर्याशी आपण परिचित आहोत. परंतु मी मात्र यातील काही अनवट गाणी मुद्दामच निवडली आहेत. कारण त्यामध्ये शब्दसामर्थ्य व स्वरसाजाच्या दृष्टीने कुठेही कमतरता नसली तरीदेखील ती तितकीशी लोकप्रिय झाली नाहीत. खर तर त्यात तरतम भेद करणारे आपण कोण?

या रामकथेचं निवेदन कोण करत आहेत? तर प्रभु रामचंद्रांच्या अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगी तपस्वी वेशातील दोन बटु श्रीरामांचे चरित्रगायन करत आहेत. इथेच गदिमा रसिकांची मने जिंकतात. Flash back पद्धतीने हे उदात्त चरित्र आपल्यासमोर मांडले आहे. प्रभु रामचंद्रांना जरी या बटुंचा प्रत्यक्ष परिचय नसला तरी सुजाण श्रोते ओळखतात की हे प्रत्यक्ष श्रीरामांचेच पुत्र आहेत. आणि त्यांना (बटुंना) देखील ठाऊक नाहि की आपण आपल्या पित्यासमोर त्यांच्याच चरित्राचे गायन करत आहोत. सामवेदाप्रमाणे या बटुंचे गायन मधुर आहे.



© www.madhuveeraghuveer.com

'ज्योतिने तेजाची आरती' 'प्रत्यक्षाहुनि प्रतिमा उत्कट' या काव्यपंक्ति तर अजरामर झाल्या आहेत. त्या Phrase म्हणून वापरल्या जातात.

पुत्रप्रेष्टिचा थाट महोत्सव। पाहिलो उभयतांनी माहिती। या भावपूर्ण ओळी वाचताना। ऐकताना रसिकांचे डोळे पाणावल्यावाचून राहत नाही. गदिमांचे शब्द आणि बाबूजींच्या स्वरातील आर्तता यामध्ये श्रेष्ठ काय हे ठरवताच येत नाही. आपण केवळ नतमस्तक होतो. या गीतांमध्ये पावित्र्य आहे, मांगल्य आहे, शुचिता आहे आणि गांभीर्य ही आहे. पण ते लोभसवाणे आहे.

हे गीत ऐकता ऐकता आपण या जगात उरतच नाही. या काळात आपण राहत नाही तर आपण जाऊन पोहोचतो रामायणकाळात, अयोध्या नगरीला।

अयोध्या नाम नगरी तत्रासीत्लोकविश्रुता।
मनुना मानवेन्द्रेण या पुरी निर्मिता स्वयम्।

मूळ रामायणातील ५ व्या सर्गामधील हा श्लोक। परंतु मूळच्या या सुबक, रेखीव सर्गामध्ये गदिमांनी आपल्या प्रतिभेचे नैसर्गिक रंग भरले आणि त्याला मराठी साज चढवला. ~~प्राचीनता व्यक्त होत आहे~~

सरयू तीरावरी
अयोध्या मनुनिर्मित नगरी।

त्या नगरीच्या विशालतेवर
उभ्या राहिल्या वास्तु सुंदर
मधून वाहती मार्ग समांतर
रथ, वाजी, गज, पांथिक चालती नटुनी त्यांच्यावरी ॥१॥

शरयू नदीच्या तीरावर कोसल नावाचा धनधान्याने समृद्ध असा देश होता. या देशातील अयोध्या ही नगरी स्वतः मनुने वसवली आहे असे म्हटले जाते। / अत्यंत



© www.madhaveeraghuveer.com

शोभायमान असणारी ही नगरी ~~अत्यंत~~ कितीतरी विशाल म्हणजे १२ योजने लांब व तीन योजने रुंद अशी होती. अयोध्येतून बाहेर जाणाऱ्या ~~राजमार्गावर~~ दोन्ही बाजूंनी ~~फळा~~ विविधरंगी फळाफुलांनी युक्त अशा वृक्ष वल्ली होत्या. या महामार्गावर दररोज सुगंधित जलाचा शिडकावा होत असे. या नगरीतील अनुपम प्रासाद, प्रशस्त रस्ते, नक्षीदार कमानी, रेखीव शिल्पाकृती या सगळ्यांमुळे या नगरीचे सौंदर्य आणखीनच विकसित झाले होते. या मुख्य मार्गाला समांतर ~~असे~~ व काटकोनात येऊन मिळणारे काही उपमार्ग देखील होते. या राजपथावरून सतत रथ, घोडेस्वार, हत्ती आणि नटून थटून जाणारे स्त्री पुरुष जात असत असा उल्लेख करून त्या ~~नग~~ नगरीचे शब्दचित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे केले आहे.

या नगरीची भौगोलिक रचना तर आकर्षक होतीच. निसर्गाची अनुकूलता देखील या अयोध्येला लाभली होती. इथे केवळ बाह्य सौंदर्यच नव्हे तर या नगरीतील राजा दशरथ हा धर्माने न्यायाने राज्य करत होता आणि प्रजाहितदक्ष अशा या राजाच्या राज्यकारभाराचे ~~प्रतीक~~ अनुमान अर्थातच प्रजेच्या सधनतेवरून, कलाप्रियतेवरून निश्चित करता येते. इथल्या घराघरांवर तोरणे लावली होती ती रत्नांची! त्यांच्या घरांना रमणीयता लाभली होती आजूबाजूच्या वाटिकांमुळे, उपवनांमुळे आणि या उद्यानांमध्ये मनोरंजनाचे दर्जेदार कार्यक्रम नित्य होत असत. त्यामुळे प्रजाजनांची मने नेहमी उल्हसित राहत असत. कलह, वादविवाद यांना इथे थाराच नव्हता. या नगरीत विविध वाद्ये वाजवणारे वादक ही पुष्कळ होते. त्यांनी वाजवलेल्या वीणा, मृदंग यांचा ध्वनी उत्साहवर्धक व मधुर होता.

© www.madhaveeraghuveer.com

पंचमहाभूते देखील आपली मर्यादा ओळखतात.



08 स्वर्गात जशी देवेंद्राची अलकापुरी तशीच ही पृथ्वीवरील अयोध्यानगरी आहे असा विश्वास प्रत्येकाला वाटत होता.

09 स्त्रिया पतिव्रता पुरुषही धार्मिक
पुत्र उपजती निश्चल दीपक

10 नृशंस ना कोणी, कुणी ना नास्तिक
अनृताचा कुठे न वावर चोरी, जारी, ।।३।।

11 'यथा राजा तथा प्रजा' असं एक नीतिवचन आहे. ज्या
12 नगरीचा राजा न्यायनीतिने कारभार करत असतो त्या
नगरीमध्ये आपोआपच धर्माला उच्च स्थान प्राप्त होत असते.
13 प्रत्येकजण स्वधर्माने वागत असतो. इथे देखील दुर्व्यवहाराला
स्थानच नव्हते. प्रत्येकाचे जीवन हे नेमस्त होते. इथल्या
14 स्त्रिया सुंदर, सुशील, सद्गुणी होत्या. आणि त्यांचे पुरुषही
आपली नित्यकर्मे चोखपणे पार पाडत होते. घराघरामध्ये
15 अग्निशाळा होत्या. प्रत्येक सात्विक गृहस्थ अत्यंत आस्थेने
धर्मकार्ये आचरत होते. आणि तिथे धर्माचा वावर असतो
16 तिथे / निसर्ग देखील स्वैरपणाने वागायला कचरतो. असं
म्हटलं जातं की अयोध्येमध्ये वारा देखील इतक्या हळुवारपणे
17 वहायचा की पतिव्रता स्त्रियांचा पदर सुद्धा चुकूनच
फडफडेल. असा सोळा सहस्रमा संयोग घडून आल्यावर
18 लहान बाळांवर सुद्धा आपोआपच सुसंस्कार घडायचे. त्यांना
तेच सदाचरणाचं बाळकडू मिळाल्याने कोणीही उच्छृंखल, स्वैर वा
19 नास्तिक असणे शक्यच नव्हते. आपल्या कुळाचे, घराण्याचे नाव
उज्वल करणार कुलदीपकच इथे आपला पिढ्या वारसा पुढे न्यायचे.
20 साहजिकच सुख, शांति, समाधानच होते. कुठेही असूयेला,
असमाधानाला वावच नव्हता. ना नगरामध्ये, ना घरामध्ये
ना अंतःकरणामध्ये!

इक्ष्वाकु कुळ कीर्ति भूषण
राजा दशरथ धर्मपरायण
त्याच नगरीचे करितो रक्षण
नृप हा चंद्रमा, नागरिक चकोर, सूर्य [illegible] ।।४।।



© www.madhaveeraghuveer.com

या दशरथ राजाच्या मागे अनेक सद्गुणी राजांची वैभवशाली परंपरा आहे. अज, दिलीप, रघु राजांनी पराक्रम तर गाजवलाच परंतु आपल्या प्रजेवर पुत्रवत प्रेम केले होते. इक्षुवत वाकू येथे (असे) जो इक्ष्वाकु अशरीरी रूपाने आढळते. ज्यांची वाणी ऊसाप्रमाणे मधुर आहे असे राजे ज्या कुळात होऊन गेले ते इक्ष्वाकु कुळ. या परंपरेतील प्रत्येक राजा हा आदर्शच होता. आणि या सर्व पिढ्यांच्या पुण्याचा परिपाक असलेला राजा दशरथ हा धर्मपरायण होता यात काही संशय नाही. आणि आदर्श याचा अर्थ जिथे जसे कार्य आवश्यक आहे, योग्य आहे तिथे उचित कर्म करणारा. रामरक्षामध्ये (रामलक्ष्मणांचे) सुकुमारौ महाबलौ असे वर्णन आहे. कोणत्या ठिकाणी सुकोमलतेने व्यवहार करायचा आणि कुठे शौर्य गाजवायचे याचे तारतम्य हवे. आणि म्हणूनच इथे राजा दशरथाचे वर्णन तीन प्रकारांनी केले आहे. घरात जो चंद्राप्रमाणे शीतल आहे. राजा म्हणून व्यवहार करताना इंद्राप्रमाणे दक्ष व पराक्रमी आहे आणि समरांगणामध्ये जो सूर्यासारखा तेजाने तळपता असा राजा अयोध्येवर राज्य करत होता.

अनुप्रास

[illegible]
[illegible]
[illegible]
बहुश्रुता त्या ... अनुरूपा सुंदरी ॥३॥

राजा दशरथाच्या तिन्ही पत्नींचे वर्णन गदिमांनी अत्यंत थोडक्यात संक्षेपाने परंतु यथोचित केले आहे. नेमकेपणाने केले आहे. सुवंशजा, सुमुखी, बहुश्रुता, पतिव्रता, स्वरूपशालिनी या विशेषणांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आलेख चटकन डोळ्यांसमोर येतो. त्यांचे कुलशील, घराण्याचा संयमित व सुयोग्य उल्लेख केला आहे. त्यांच्या रूपाबरोबरच त्यांच्या बुद्धिमत्तेला दाद देणारा बहुश्रुता हे विशेषण चपखलपणे वापरले आहे. पतीची सेवा करण्यासाठी त्या नेहमी सिद्ध आहेत. यातून त्यांची तत्परता दिसून येते. पण या सर्वांपेक्षा गदिमांनी तिन्ही राण्यांना अनुरूपा असे विशेषण वापरले आहे.

वास्तविक हे विशेषण वाल्मिकींनी अयोध्येसाठी वापरले होते परंतु या राण्यांशी तेजस्विता अनुरूपच होती हे यातून दर्शवले आहे.

तिन्ही स्त्रियांच्या प्रीतिसंगमी
तिन्ही लोकींचे सुख ये धामी
एक उणे पण गृहस्थाश्रमी
पुत्रवदन पण अजुनि नाहले, प्रीतिसंगमी उणीव ही ॥२॥

खरं तर या तिन्ही राण्या म्हणजे एकमेकींच्या सवती। त्यांच्यामध्ये सापत्नभाव असता तर ते स्वाभाविकच होते, परंतु तसा सवतीमत्सर त्यांच्यात अजिबात नव्हता हे गदिमा 'प्रीतिसंगमी' या शब्दातून सुचवतात. आणि या तीन राण्या जेव्हा एकदिलाने, एकोप्याने संसार करत असतील तर तिथे त्रिभुवनाचे सुख एकत्र येईल हे ओघानेच आले. परंतु सुखालाही कुठेतरी गालबोट हे लागतेच. त्यामुळे हे सगळे सुखदायी वर्णन सांगितल्यानंतर गृहस्थाश्रमातील एकमेव पण महत्त्वाचे शल्य ते उघड करतात. सगळे सुख हात जोडून उभे असले तरी अजून अपत्यप्राप्ति झाली नव्हती. प्रेमाने बहरलेला हा संसार त्यामुळेच अजून रिताच होता.

शान्ति एक ते कौसल्येची
दिसे सुमित्रा रमा उमेसी
एक कैकयी नारि लाघवी
दशरथासही असा एक तो चिंतेने अशांतही कळा

तिन्ही राण्यांची नावे सांगून त्यांच्या अंतरीची व्यथा मांडताना देखील गदिमा औचित्यपूर्ण शब्दरचना करतात. कौसल्येमधील वैशिष्ट्यपूर्ण नम्र हे अक्षर 'शान्त' म्हणून व्यक्त करतात. सुमित्रेची उदासी 'स' च्या पुनरुक्तीमुळे अधोरेखित होते आणि कैकयीच्या असंख्य नवससायासांना उद्देशून 'कैक' ऐसा संस्कारदर्शक पण अतिशय समर्पक असा शब्द ~~[illegible]~~ योजला आहे. आणि शेवटी सारे सुख पुरेपूर अनुभवले तरीही या शूर पराक्रमी पुरुषाला, राजा दशरथाच्या अंतर्यामी एक बोच होती, टोचणी होती आणि ती वारंवार सलत होती.



© www.madhuveeraguruveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

08 राजलक्षण ने सौरभ आणिले
इत्यः चिंतन लक्ष मनांचे
09 काय काय या सौरभ घ्यायचे!
कल्पतरूला फूल येईल का, वसंत फुलेल नाही?

10 રાજા હાલકે પાન ડોલે। રાજાચં દુઃખ તે પ્રજેચં દુઃખ।
રાજા આનંદી તર પ્રજા આનંદી! રઘુરાજ અયોધ્યા નગરી
11 હી ધનધાન્યાની, દુધદુભત્યાને, રત્નમાણકાંને, ... પરિપૂર્ણ હોતી. તરીહી સર્વ પ્રજાજનાંચ્યા અંતરંગામધ્યે
12 એક સલણાર દુઃખ હોત આણિ તે મ્હણજે અજૂન રાજ્યાલા
વારસ નાહી. યા કોંચણીમુળે બહુતાંશી નાગરજન વ્યાકુળલેલે
13 હોતે. સભોવતાલચ્યા ગોષ્ટી કાહી ધનાને વિકત ઘેતા યેત નાહીત.
કાહી ગોષ્ટી કાહીજણાંસાઠી દુષ્પ્રાપ્ય કા અસતાત? આતા
14 વાટ તરી કિતી પહાયચી? આજપર્યંત આશા વાટત હોતી કી
આજ નાહી તરી ઉદ્યા હોઈલ. યા રાણીલા નાહી તરી ત્યા
15 રાણીલા હોઈલ. પરંતુ એક દિવસ ઉગવૂન તસાચ રિકામા
માવળતો તસતસે તે દુઃખ અધિકચ ગડદ હોત જાતંય।
16 ~~વસં~~ત ઋતુ મ્હણજે નાકપ્ય સરત આલ તરી અજૂન કલ્પતરૂલા
ફૂલ આલે નાહી. આતા કુઠવર સોસાયચં? હે ન્યૂન કધી દૂર
17 હોણાર? સંસારવેલીવર કધી ફૂલ યેણાર?
યા ગીતાચી સુરુવાત કરતાના અયોધ્યેચી વિશાળતા
18 સુંદરતા, પવિત્રતા મનાવર ઠસવલી આહે. ત્યાનંતર
પ્રત્યેક કડવ્યાબરોબર આપણ અયોધ્યેચ્યા રસ્ત્યાવરૂન
19 ફેરફટકા મારૂન યેતો. તિથલ્યા રસ્ત્યાંશી, ઉપવનાંશી
ભોંડ્યાંશી પુષ્પાંશી સંવાદ સાધાયલા લાગતો. આદર્શ રાજા,
20 ત્યાંચ્યા સુશીલ સદ્ગુણી રાણ્યાંવિષયી અધિક જાણૂન ઘેતાના
શેવટી માત્ર ત્યાંચ્યા અંતરીચી વ્યથા આપલ્યાલા વિષણ્ણ
કરૂન જાતે. હી ગદિમાંચ્યા શબ્દાંચી કિમયા આહે.
મિશ્ર દેસકાર રાગામધ્યે સંગીતબદ્ધ કેલેલ હે ગીત
મનામધ્યે ઘર કરતે હે માત્ર નિશ્ચિત!



© www.madhaveeraghuveer.com

(२) उगा का काळीज माझे उले।

॥ श्रीराम ॥

कमलदलांना फुलो नये का वसंत सरला नाही?

या चरणाने मागील गीताची सांगता झाली होती. अयोध्येचे वैभव, तिथली संपन्नता, तिथले प्रासाद, उद्याने, रसिक श्री पुरुष (इक्ष्वाकू) यांचे ~~का~~ शब्दचित्र गदिमांनी अगदी हुबेहूब रेखाटले आहे आणि त्याचबरोबर इक्ष्वाकु कुळाची कीर्ति, राजा दशरथाची प्रजावत्सलता, त्याच्या सुलक्षणी, सद्गुणी भार्यांचे वर्णन करता करतानाच अगदी गालबोट म्हणावे अशा कौसल्येच्या शल्याचा ओझरता उल्लेख अगदी जाता जाता केला आहे.

नेमका हाच धागा पकडून गदिमांनी राणी कौसल्येच्या मनाची तगमग आणि आर्तता प्रकट करणारे हे गीत गदिमांनी आपल्या अलौकिक प्रतिभेतून साकारले आहे. वास्तविक या गीताला मूळ रामायणाचा आधार नाही. तरीही रसिकांना हे गीत व्याकूळ करून जाते. प्रजेवर पुत्राप्रमाणे प्रेम करणाऱ्या प्रेमळ राजाच्या घरी पाळणा हलत नाहीये हे दुःख सर्वच प्रजाजनांना होते. तर मग तिन्ही राण्यांना तर किती वाईट वाटत असेल, त्यातल्या त्यात थोरली राणी म्हणून कौसल्येच्या वेदना तर किती तीव्र होत्या: आणि त्याच भावना ती या गीतामधून व्यक्त करत आहे. कौसल्या म्हणते ---

उगा का काळीज माझे उले।
पाहुनी वेलीवरची फुले।

योग्य ठिकाणी योग्य शब्द योजण्याचे औचित्य गदिमांकडे जसं आहे तसं इतरत्र क्वचित कुठे आढळेल. इथे देखील ते मन म्हणत नाहीत, हृदय म्हणत नाहीत. किंवा अंतःकरणही म्हणत नाहीत तर ते म्हणतात काळीज! आणि ते काळीज देखील रडत नाहीये, आक्रंदन करत नाहीये, तक्रार करत नाहीये तर ते उलतंय! आधीच काळीज या शब्दातच ~~काहीतरी~~ काळजाला हात घालणारं काहीतरी आहे. आणि त्यात उले या शब्दामुळे कौसल्येची वेदना, सल, ठसठस तुमच्या माझ्या काळजापर्यंत पोहोचत आहे. जखम होणे, भळाभळा रक्त वाहणे वेदना होणे. पण येणे हलासरावरा दुःखं उदासपणे धडधडणाऱ्या



©www.madhaveeraghuveer.com

| | |
|---|---|
| **19** MAY | TUESDAY<br>WEEK 21<br>DAY 139-226<br>DATE 19.05.2015 |

| MAY | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

08 गोष्टी आहे. परंतु या सर्वांपेक्षा 'उमलणे' या शब्दात अगदी खोल अर्थ दडलेला आहे. जे आतल्या आत सोसावं
09 लागतंय. कुणाला सांगता येण्यासारखं नाहीये - सांगूनही समजणार नाहीये, असं काहीतरी अंतर्यामी हुसहुसणारं दुःख
10 या उमल्यातून उलगडलंय. आणि ते काळीज का उकलतंय? त्याला कारण झाली आहेत, ती वेलीवरची फुलं!
11 खरं तर वेलीवरची उमलती फुलं आनंद देणारी, उत्साह मनाला देणारी असतात. मग इथे या कौसल्येला
12 ही फुलं पाहून दुःख का बरं होतंय? कारण! कारण तिची कूस अजून उजवली नाहीये! खरं तर सगळी सुखं अगदी
13 हात जोडून समोर उभी आहेत. अगदी राजमंदिर काय किंवा अयोध्यानगरी काय? सत्ता, संपत्ती, सामर्थ्य, सौंदर्य यांनी
14 परिपूर्ण आहे. मात्र हे सर्व वैभव पायाशी लोळण घेत असलं तरी पोटी संतान नसल्याचं दुःख हे त्या सर्व
15 सुखांपेक्षा वरचढ ठरतंय. आणि नेहमीच पुरुषापेक्षा स्त्रीला त्याची बोच सर्वांत जास्त असते. आणि तीच व्यथा
16 इथे फुलांकडे पाहून व्यक्त झाली आहे.

कधी नव्हे ते मळले अंतर
17 कधी न शिवला सवतीमत्सर।
आज का लतिकावैभव सलते ॥ पाहुनि ॥६॥

18

19

20

© www.madhaveeraghuveer.com

॥ श्रीराम ॥

## दशरथा घे हे पायसदान - - -

यज्ञसंकल्पना ही आपली फार प्राचीन परंपरा आहे. यजुर्वेदामध्ये तर अनेक प्रकारचे सकाम यज्ञ सांगितले आहेत. यज्ञ - याग - इष्टि - होम यामध्ये विधिच्या दृष्टीने थोडा फरक आहे. आपल्या ऋषिंनी तर अनेक प्रकारचे यज्ञ केले होते. विश्वामित्रांनी देखील सृष्टीकल्याणासाठी यज्ञ केल्याचा उल्लेख रामायणामध्ये आढळतो. बहुतांश वेळा याग हे एखाद्या देवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी केले जातात तर एखाद्या मंगलकार्याच्या समाप्तिनंतर किंवा शुभप्रसंगी होम केला जातो. इष्टि मध्ये काहीतरी इच्छा असते आणि यज्ञ हा बहुतेक वेळा - - सृष्टीकडून जे काही आपल्याला मिळाले आहे, ते कृतज्ञतापूर्वक परत करण्यासाठी केले जातात. किंवा निदान ऋणमुक्तीची भावना त्यात निश्चित असते.

'अश्वमेध' यज्ञ हा राजाचे सार्वभौमत्व सिद्ध करण्यासाठी, इतर राजांकडून तशी मान्यता मिळवण्यासाठी केला जातो. अश्वमेध यज्ञापूर्वी एक वर्षभर एक यज्ञीय अश्व मुक्त सोडायचा. वर्षभर विविध राज्यांमध्ये जाऊन मान्यता मिळवायची. एखाद्या राजाला जर हे मान्य नसेल तर त्याने तो घोडा अडवायचा आणि हा यज्ञाश्व ज्या राजाचा असेल त्याला युद्धासाठी ललकारावे अशी प्रथा होती. त्या दृष्टीनेही यज्ञाचे महत्त्व आहे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे यज्ञाने सृष्टीचा समतोल साधला जातो. घेण्यापेक्षा देण्याची भावना वृद्धिंगत होते.

नीचैः यानुदारानं व्यात्युदानं नातोऽधिकम् ।
इत्यथा प्रार्थनाऽस्माकं भगवन् परिपूर्यताम् ॥

समाजाचे / सृष्टीचे जे अपार ऋण आपल्यावर आहे ते अंशतः पूर्ण करण्याचा, निदान मान्य करण्याचा हा शास्त्रविधी आहे. मात्र त्यासाठी यज्ञविधिमध्ये सांगितलेल्या सर्व गोष्टींचे त्यातील बारकाव्यासहित पालन करणे आवश्यक आहे.



©www.madhaveeraghuveer.com

आणि सर्व यज्ञ विधिवत झाला तर यज्ञाचे फळ तत्काळ प्राप्त होते. आणि जर त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या तर त्याचे दुष्परिणामही होऊ शकतात.

वस्तुत: यज्ञाची पाच प्रमुख अंगे आहेत.

१. विधियुक्त क्रिया - भूमि, दिशा, वेदी, कुंड, यजमान
२. मंत्रोच्चारण - शुद्ध, स्पष्ट स्वरात.
३. अन्नदान - उपस्थितांना प्रसन्न करणे
४. दक्षिणा - नियमानुसार अधिकारानुसार दक्षिणा
५. श्रद्धा - पर्जन्य यज्ञ - छत्री घेऊन लहान मुलगा

यज्ञविधीमध्ये चार ऋत्विज असतात.
अध्वर्यू, होता, ब्रह्म, उद्गाता
त्यांना तीन / तीन सहाय्यक असतात.
असे १६ जण आणि शिवाय सपत्नीक यजमान
असे सर्व मिळून १८ जण असतात.

पूर्वी प्रत्येक घरामध्ये अग्निशाळा असे, आणि गृहस्थाने रोज अग्निहोत्र करण्याची पद्धत होती. याखेरीज इतर प्रसंगी यज्ञ केले जात. दर पौर्णिमा / अमावस्येला यज्ञकर्म केले जात असे. अर्थात काळाच्या ओघामध्ये यज्ञविधीमध्ये पुष्कळ परिवर्तन झाले असले तरी यज्ञाचे माहात्म्य नाकारता येणार नाही.

राजा दशरथाच्या बाबतीत देखील असेच काहीसे घडले. खर तर प्रजाहितदक्ष, शूर, पराक्रमी असा हा राजा सद्गुणी, सत्शील अशा तीन तीन राण्या असूनही संतानप्राप्ति नसल्याने सगळ्याच सुखाला गालबोट लागल्यासारखं झालं होतं. राजाही मनात खंतावत होता. अशा वेळी ऋष्यशृंग ऋषींनी राजाला पुत्रकामेष्टि यज्ञ करण्याचा आदेश दिला. राजा दशरथानेही आनंदाने त्याला संमति दिली. उत्साहाने यज्ञाची सज्जता केली. ऋत्विजांच्या उपस्थितीत विधिवत यज्ञ संपन्न झाला. यज्ञाची सांगता पूर्णाहुतीने झाली.

© www.madhaveeragurjar.com

शास्त्रशुद्ध रीतीने यथासांग यज्ञकार्य घडले असेल तर यज्ञाचे फळ तत्काळ मिळते. राजा दशरथाने मांडलेल्या या यज्ञप्रसंगी असेच घडले आणि यज्ञवेदीतून रक्तवर्ण असा तेजस्वी यज्ञपुरुष प्रकट झाला. प्रसन्न मुद्रेने आणि मधुर व तरीही धीरगंभीर वाणीने बोलू लागला --

दशरथा, घे हे पायसदान, पायसदान।
तुझ्या यज्ञि मी प्रगट जाहलो हा माझा सन्मान ॥धृ.॥

मूळ रामायणात देखील हा उल्लेख आहे. त्यात अग्निदेवतेने राजा दशरथाला श्रीविष्णूंचा प्रसाद देऊन तो राण्यांना द्यायला सांगितला होता. त्या प्रसादाच्या सेवनाने त्या राण्या पुत्रवती होतील असाही आशीर्वाद दिला---

इथे मात्र गदिमांनी रामायणातील संस्कृत भाषेवर आपल्या मराठीच्या अलौकिक साज चढवला आहे. त्या विष्णूच्या प्रसादाला पायसदान म्हटले आहे. पायस म्हणजे केवळ दूध किंवा खीर नव्हे तर त्या पायसाला दैवी स्पर्श आहे. त्यात पावित्र्य आहे. मांगल्य आहे. शुभशकुन आहे. प्रसन्नतेचे वरदान आहे.

अग्निला अनल, पावक, वह्नि अशी अनेक नावे आहेत. त्यांचं एक नाव आहे 'हव्यवाहन'. म्हणजे मंत्रोच्चारासहित अग्निमध्ये जे हवन केले जाते ते ते त्या त्या देवतेपर्यंत पोहोचवणारा, वाहून नेणारा तो हव्यवाहन) आणि देवतांनी दिलेला प्रसाद यज्ञकर्त्या यजमानापर्यंत आणून देणारा देखील अग्निदेवच आहे. इथेही अग्नीच्या रंगाचा, अग्नीच्या तेजाने युक्त असा यज्ञपुरुष प्रकट झाला होता. आणि या वेळी तो केवळ Messenger of God म्हणून आला नव्हता. तर या पावन अशा अयोध्यानगरीमध्ये सुरू असणाऱ्या या यज्ञकार्यात प्रकट होण्याचा बहुमान मला मिळाला हे माझे केवढे भाग्य आहे असेही तो म्हणतो आहे. या त्याच्या एका वाक्यातून राजा दशरथाच्या आणि संपूर्ण रघुवंशाची धर्मपरायणता अधोरेखित झाली आहे.

© www.madhaveeraghuveer.com

आपल्याला देखील एखाद्या पुण्यशील संतपुरुषाकडे एखादे साधेसे काम करण्याची संधी मिळणे, हाच मोठा गौरव वाटतो ना तसेच काहीसे भाव या यज्ञीय पुरुषाच्या मनात आले असावेत.----

तव यज्ञाची होय सांगता
तृप्त जाहल्या सर्व देवता
प्रसन्न झाले नृपा तुझ्यावर
श्री विष्णू भगवान ॥ ६॥

दशरथ राजा हा केवळ संपन्न नव्हता तर सुशील होता. त्यामुळे त्याच्याकडून या यज्ञविधीमध्ये कुठलेही न्यून राहिले नव्हते. अर्थातच त्यामुळे यज्ञ सांगते-बरोबरच सर्व देवदेवता संतुष्ट झाल्याचा संदेश त्याने पोहोचता केला. यज्ञो वै विष्णुः। असे वचन आहे. यज्ञ हाच विष्णु आहे आणि म्हणूनच हे नृपा, तुझ्यावर भगवान श्री विष्णु प्रसन्न झाले आहेत असे म्हटले आहे. इथे राजाला नृप म्हणतात. 'प' याचा अर्थ पालनकर्ता असा आहे. भूप म्हणजे सर्व देखील राजा! भूमीचे पालन करणारा तो भूप! इथे मात्र नृ' म्हणजे नराचे अर्थातच प्रजेचे पालन करणारा या अर्थाने नृप हा शब्द आला आहे.

श्री विष्णूंची आज्ञा म्हणुनि
आलो मी हा प्रसाद घेऊनि।
या दानासी या दानाहून
अन्य नसे उपमान ॥ ७॥

साक्षात श्री भगवान विष्णूंच्या आज्ञेने मी हा प्रसाद घेऊन आलो आहे. एरवी आपण देवाला नैवेद्य दाखवून नंतर आपण सेवन करतो त्याला प्रसाद म्हणतो. पण इथे तसे नाहीये. साक्षात परमेश्वराने हा प्रसाद दिला आहे. त्यामुळे याची तुलना दुसऱ्या

© www.madhavgajanuweer.com

कोणत्याही प्रसादाशी करता येणे शक्यच नाही. इथे गदिमांनी अनन्वय अलंकाराचा अत्यंत समर्पकपणे उपयोग केला आहे. मूळ रामायणातही महाकवी वाल्मीकिंनी हा अलंकार योजला आहे. रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव नसेच इथे गदिमा म्हणतात — या दानाला या दानाहून अन्य नसे उपमान। त्याची उपमा द्यायची त्यामध्ये आणि उपमेयामध्ये काहीतरी साम्य असावे लागते ना! कुंदकळ्यांसारखे दात सोनचाफ्यासारखा वर्ण किंवा नागिणीसारखी वेणी! इथे थोडेतरी साम्य आहे. पण या दानाची बरोबरी करेल असे दुसरे दान कुठे शोधून तरी सापडणार आहे का?

करात घे ही सुवर्णस्थाली
दे राण्यांना क्षीर आतली।
कामधेनुच्या दुग्धाहूनही
ओज हिचे बलवान ॥३॥

श्री विष्णूंच्या प्रसादभोजनाला साजेशा अशा सुवर्णाच्या पात्रामध्ये हे पायस आहे. त्यातील प्रसाद हा तिन्ही राण्यांनी मोठ्या श्रद्धेने सेवन केल्यास त्यांचे ईप्सित पूर्ण होईल. त्यांच्या पोटी पुत्र जन्माला येतील, कारण या पायसामध्ये सर्व दैवी गुण एकत्रित झाले आहेत. साक्षात श्री विष्णूंचा हा प्रसाद आहेच परंतु कामधेनू इच्छिलेल्या सर्व कामना तृप्त करते, त्याहीपेक्षा अनेक पटीने या पायसाचे ओज सामर्थ्यवान आहे. बलवान आहे. ओज या शब्दामध्ये तेजाचे आधिक्य दर्शविले जाते. अंतर्बाह्य तेज यात अभिप्रेत आहे. काया - वाचा - मन - बुद्धि - चक्षु - वाणी या सर्वांवर हे तेज झळकले तेच खरे ओज! त्यामुळे या पायसाच्या सेवनाने राण्या गर्भवती राहतील आणि त्यांच्या पोटी इक्ष्वाकु वंशाला साजेसे असे पराक्रमी पुत्र जन्माला येतील ----

(४) श्रेष्ठ तुल्य पुत्र मला। ----



२४ मार्च २०२१

|| श्रीराम ||

यज्ञो वै विष्णुः। असे श्रुतिवचन आहे. जे जे काम ईश्वराच्या आराधनेसाठी केले जाते ते ते सर्व यज्ञकर्मच आहे आणि यज्ञकार्य समजून जे जे कर्म केले जाते ते ते आपोआपच निर्लेप होत जाते. त्याचे बंधन मनुष्याला पडत नाही आणि अशी सर्व कर्मे विलीन होऊन जातात --- यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते।

सर्वच संत महात्मे, थोर विभूतींनी आपले संपूर्ण जीवनच यज्ञमय केले होते. आद्य शंकराचार्य, महायोगी अरविंद, स्वामी विवेकानंद, समर्थ रामदासस्वामी यांनी आपली सगळी कर्मे यज्ञकर्म समजून केली. अगदी व्यवहार करताना देखील सगळीच कामे निर्लेप भावनेने, निरासक्त वृत्तीने आणि लोककल्याणासाठी केली आणि म्हणून ते जीवन जगत असतानाच मुक्त म्हणजेच जीवन्मुक्त झाले. पण हा झाला यज्ञाचा प्रतीकात्मक अर्थ।

परंतु जो यज्ञ प्रत्यक्ष केला जातो, त्यालाही फार मोठी, व्यापक विचारांची परंपरा आहे. यज्ञ हा विश्वाचा नियम आहे. Universal Truth आहे. श्रद्धेने केलेला कोणताही यज्ञ परमश्रेयाकडे नेतो.

यज्ञो वै विश्वस्य नाभिः। यज्ञ हा विश्वाचा केंद्रबिंदू आहे. अर्थात तो शास्त्रशुद्ध रीतीने करायला हवा. वैदिक संस्कृतीमध्ये यज्ञाला इतके का बरे महत्त्व दिले आहे?

श्रद्धायुक्त अंतःकरणाने, सर्व शास्त्रविधींचे पालन करून केलेला यज्ञ सृष्टीचक्राला पूरक आहे. कल्याणकारक आहे. एक दिवस केलेल्या यज्ञाने ६०० यार्ड त्रिज्येच्या परिसरातील वातावरणाची शुद्धी होते. प्रदूषित झालेली हवा पुन्हा शुद्ध होते. सध्या संपूर्ण जगाला भेडसावणारा Global Warming चा प्रश्न आहे. वास्तविक आपल्या पृथ्वीभोवती असणारा ओझोनचा थर जीवसृष्टीसाठी उपकारक आहे. त्या थरामुळे सूर्याच्या प्रखर किरणांपासून आपले रक्षण होत असते. निसर्गाचे हे रहस्य आमच्या

© www.madhaveeragnihotri.com

ऋषीमुनींनी फार पूर्वीच ओळखले होते. त्यांनी हा धोका आधीच जाणला होता. ते खऱ्या अर्थाने द्रष्टे होते. वैज्ञानिक होते. संशोधक होते.

यज्ञामध्ये आज्य म्हणून वापरले जाणारे देशी गायीचे तूप कितीतरी अनिष्ट गोष्टींपासून आपले रक्षण करत असते. किंवा अगदी दररोज लावलेल्या शुद्ध तुपाच्या निरंजनामुळे ओझोनच्या थराला पडलेले छिद्र बुजू शकते. आज नवनवीन विषाणू वातावरणात प्रवेश करत आहेत. इबोला काय निपाह काय, किंवा चिकनगुनिया काय! आणि आता तर संपूर्ण जगाला भयभीत करून सोडणारा कोरोना!

यज्ञात ज्या समिधा, जे हविर्द्रव्य, जे तूप वापरले जाते, त्यामुळे मनुष्य स्वतःच्या व परिसराच्या रोगजंतूपासून बचाव करू शकतो. यज्ञ हे अत्यंत आवश्यक असे नैमित्तिक कार्य आहे. मानवी जीवन कल्याणकारक, आनंददायक, निरामय होण्यासाठी ते उपयुक्त आहे. त्यावर टीका करणारे असेही म्हणतात की---.

किती या यज्ञामध्ये पैशाचा चुराडा होतो! किती तूप वाया जाते. समिधांच्या निमित्ताने किती वृक्षतोड होते! त्यापेक्षा तेच तूप गरीबांना द्यावे. परंतु गरजूंना, गरीबांना काही जीवनोपयोगी वस्तू देणे हे दान झाले. त्याचे महत्त्वही निश्चित आहेच पण तरी ते यज्ञापाठोपाठ आहे. यज्ञापेक्षा दान श्रेष्ठ नाही. यज्ञ दान तप अशी शब्दरचना गीतेमध्ये वारंवार येते. म्हणजे यज्ञाच्या खालोखाल दानाला महत्त्व आहे परंतु 'दान' हा यज्ञाला पर्याय होऊ शकत नाही, Substitute नाही. वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळे यज्ञ वारंवार झाले तर ही भारतभूमी पुन्हा पूर्वीचे वैभव प्राप्त करू शकेल. परंतु ही झाली ऋषींची धारणा! त्यांची विचारसरणी किंवा आजच्या युगातील सुसंस्कृत व्यक्तींचे विचार! ज्यांना खरोखरच सृष्टी कल्याणाची तळमळ आहे जनकल्याणाविषयी आस्था वैभवाची

© www.madhaveeraghuveer.com

आहे. परंपरांचा आदर आहे. पुढच्या पिढ्यांपर्यंत हा समृद्ध वारसा पोहोचवावा याची कळकळ आहे. त्यांना हे सहजच समजू शकेल. पटू शकेल. आपल्यासारख्या सुजाण श्रोत्यांना हा विचार पचनी पडू शकेल. - - -

पण मग जर हे जग असेच सुचारू रीतीने सुरू राहिले तर मग दुर्जनांनी काय करायचं? सगळेच जर का आलबेल असेल तर मग त्यांच्या विध्वंसक कृत्यांना खीळ बसेल. आजही अशी मनोवृत्ती असणारे नासधूस - तोडफोड - हिंसाचार करणारे विध्वंसक लोक पदोपदी भेटतातच की! आज आपण ज्यांना अतिरेकी म्हणतो, त्यांनाच पूर्वी असुर राक्षस | दानव म्हटलं जायचं. आणि सुष्ट प्रवृत्तीने वागणाऱ्या सज्जनांच्या कार्यात विघ्न आणण्यातच त्यांना भूषण वाटायचं. त्यांचा बीमोड कोण न कसा करणार? अर्थातच आपले ऋषी शास्त्रातही पारंगत होते आणि शस्त्रातही! परंतु कोणतीही सकारात्मक गोष्ट घडवायला काही कालावधी लागतो. मात्र बिघडवायला काही क्षणही पुरेसे असतात. ऋषी विश्वामित्र तर जन्माने क्षत्रिय होते. शूर पराक्रमी होते. परंतु तरीही विधिवत यज्ञकार्य करत असताना असुरांनी दुष्टपणाने यज्ञात विघ्ने आणली तर त्यांचा निःपात करण्यासाठी, यज्ञरक्षणासाठी त्यांना वीरपुरुष हवा होता.

ज्याच्यामध्ये क्षात्रतेजही असावे आणि तो धर्मपरायण असावा अशी त्यांची अपेक्षा होती. अशा बिकट प्रसंगी विश्वामित्रांच्या कानावर दशरथपुत्रांची कीर्ति आली होती. महर्षि वसिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली दशरथाच्या पुत्रांनी धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र यांचे अध्ययन केले होते. त्यातल्या त्यात श्री रामचंद्रांची कीर्ति तर सर्वदूर पसरली होती. असा दशरथाचा पराक्रमी असा ज्येष्ठ पुत्र मला माझ्या यज्ञाच्या रक्षणासाठी प्राप्त झाला तर निश्चिंत मनाने मला यज्ञकार्य करता येईल. - -



© www.madhaveeraghuveer.com

या हेतूने म. विश्वामित्र राजा दशरथाकडे आले आणि त्यांनी मागणे मागितले. मूळ रामायणामध्ये हा प्रसंग थोड्या वेगळ्या प्रकारे आला आहे.

विश्वामित्र म्हणतात - - - -

ज्येष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा।
यज्ञरक्षणास योग्य तोच सर्वथा ॥धृ.॥
मायावी रात्रिंचर कष्टविती मजसी फार।
केकवार करून यज्ञ नाही सांगता ॥१॥

मायावी याचाच अर्थ खोटे, कपटी, भासमान! रामरक्षेमध्ये यांनाच निशाचरचमू किंवा छद्मचारिण: असे म्हटले आहे. म्हणजेच Pseudo! वेगवेगळी रूपे घेऊन भुलवणारे! पुढे रामायणातील अरण्यकांडामध्ये मारीच राक्षसाने देखील मायावी हरणाचे रूप घेतले होते. नक्तंचर याचा अर्थही निशाचर असाच आहे.

एकूणच राक्षसी | आसुरी | तामसी वृत्तीच्या लोकांना प्रकाशाची भीति वाटते. त्यामुळे त्यांची ही अघोरी कृत्ये रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात चालतात. त्यांना ज्योतीचा अडथळा वाटतो, संकट वाटते अशा गोष्टी उरकून टाकण्यासाठी त्यांना रात्रीचा काळोख जवळचा वाटतो. आणि त्याउलट सज्जन गुणांच्या, मनुज अंत:करणाच्या स्कूत्कर्त्यांना मात्र सूर्यप्रकाश हा उत्साह, ऊर्जा देणारा आणि ज्ञानार्जन व ज्ञानदानासाठी उपकारक ठरतो.

एकदा यज्ञ सुरू झाल्यानंतर त्याची यथोचित सांगता होणे, पूर्णाहुति होणे आवश्यक असते. तसे जर का झाले नाही तर त्यापूर्वी केलेल्या यज्ञविधिचा तिळमात्र परिणाम होत नाही. सर्व श्रम व्यर्थ जातात. आणि एकदा | दोनदा नाही तर अशी विघ्ने वारंवार यायला लागल्यावर या असुरांच्या कारवायांचा कायमचा बंदोबस्त करावा या उद्देशाने विश्वामित्र ऋषी राजाकडे आले आहेत. ते बोलत आहेत. आपली व्यथा मांडत आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

शाप कसा देऊ मी? दीक्षित मी नित्य क्षमी।
सोडतोच तो प्रदेश याग मोडता ॥२॥

तपःसामर्थ्यामुळे ऋषींच्या वाणीला एक विलक्षण असे तेज प्राप्त झाले होते. वाचासिद्धी लाभली होती. त्यामुळे त्यांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द खराच ठरायचा. त्यामुळेच एखाद्या दुर्जनाला शाप देणे किंवा सज्जनाला वर देणे हे ऋषींना शक्य होते. परंतु त्याचेही काही नियम असतात. ज्याने यज्ञदीक्षा घेतली आहे. जो याज्ञिक आहे तो क्षमाशील असावा असा सर्वसाधारण निर्बंध असतो. त्यामुळेच विश्वामित्र म्हणतात — मी दीक्षित आहे. नित्य क्षमाशील वृत्तीने मी राहतो. माझ्या सहवासात येणाऱ्यांना मी क्षमा करतो. हा माझ्यावर मीच घालून घेतलेला दंडक आहे. शाप देण्याची क्षमता जरी माझ्यात असली तरी मी शाप देणे हे नियमाविरुद्ध होईल... त्यापेक्षा आजपर्यंत या राक्षसांनी मला जेव्हा जेव्हा त्रास दिला, यज्ञात विघ्ने आणली तेव्हा तेव्हा मीच तो प्रदेश सोडून तिथून निघून गेलो. दुष्टांचे निर्दालन करण्यात, त्यांच्याशी वैर करण्यात आपली शक्ती कशाला वाया घालवायची? अशा सदहेतूने मीच दुसरीकडे निघून जात होतो. पण आता पात्र हद्द झाली. मी जिथे कुठे यज्ञ करतो तिथे हे असुर हजर होतातच...

आरंभिता फिरून यज्ञ
आणिती ते फिरूनी विघ्न।
प्रकटतात मंडपात कुंड पेटता ॥३॥

राक्षसांनी कितीही त्रास दिला, कितीही विघ्ने आणली तरी मी प्रत्येक वेळी नेटाने पुन्हा यज्ञाला सुरुवात करतो. यज्ञसिद्धीसाठी पुष्कळ पूर्वतयारी करावी लागते. परंतु देवकार्य समजून मी हे सगळे मनापासून करतो...

© www.madhavaraghuveer.com

यज्ञकुंडाची रचना, साधन सामग्री, हविर्द्रव्य, समिधा, घृत या सर्व गोष्टींची जमवाजमव करेपर्यंत या दुष्ट शक्ती फारसे आपले अस्तित्व जाणवू देत नाहीत. कारण त्यापासून त्यांना फारसा काही धोका नसतो. मात्र जसे अग्निदेवतेला आवाहन केले जाते, यज्ञकुंडामध्ये वह्नि प्रज्वलित होतो, धडाडून उठतो, पिवळी केशरी ज्वाळा जशी ऊर्ध्वगामी होऊन वर झेपावते. तसे या आसुरी वृत्ती गोंधळतात. संभ्रमित होतात. कारण यज्ञविधी संपन्न होणे म्हणजेच दुष्ट प्रवृत्तींचा बीमोड करणे आहे आणि त्यामुळेच या यज्ञाची त्यांना भीती वाटते व त्यात ते अडथळा आणतात. वह्नि प्रज्वलित करण्यापूर्वी वातावरणात सूक्ष्म रुपाने असणाऱ्या अग्निदेवतेला मंत्रोच्चारणाने पाचारण करायचे. आणि अरणीमध्ये मंथन करून घर्षणाने अग्नि उत्पन्न करायचा. किंवा गारगोटीच्या दोन दगडांच्या घर्षणातून किंवा अगदी आजकालच्या युगात भिंगाच्या माध्यमातून सूर्यकिरणे एकत्रित करून अग्नि निर्माण करायचा. व नंतर तो काष्ठावर वा कापसावर घेऊन त्याच्या मार्फत यज्ञकुंडामध्ये अग्नि निर्माण करायचा. त्यासाठी कितीतरी वेळ लागू शकतो. त्यासाठी श्रमही हवेत, कौशल्यही हवे आणि धीरही हवा. परंतु असा अग्नि प्रकट झाल्यावर या राक्षसांचे धाबे दणाणते व ते त्रास द्यायला सुरुवात करतात.

वेदीवर रक्तमांस । फेकतात ते नृशंस ।
नाचतात स्वैर सुखे । मित्र थांबता ।। ४ ।।

यज्ञवेदीच्या आसपास सुद्धा ज्या गोष्टी असू नयेत अशा रक्त आणि मांसासारख्या निषिद्ध गोष्टी फेकण्यात या दुष्टांना आसुरी आनंद मिळतो. खरं तर आपल्या वैदिक मंत्रामध्ये फार मोठे सामर्थ्य आहे. मननात् त्रायते इति मंत्रः । मंत्रांची रचना इतकी शास्त्रशुद्ध आहे की त्यांच्या

© www.madhaveeragruveer.com

उच्चारणामुळे सकारात्मक स्पंदने वातावरणात निर्माण होतात आणि त्यामुळे दुष्ट शक्तींना अटकाव केला जातो. परंतु या मंत्रशक्तीचे, मंत्रोच्चारणाचे काही नियम आहेत. कोणी कुठले मंत्र कोणत्या स्वरात म्हणायचे? एकेकट्याने कोणते? समूहस्वरात कोणते? यामागे फार मोठा विचार आहे. शास्त्र आहे, सामर्थ्य आहे. परंतु काही काळापुरते जरी हे मंत्रोच्चार थांबले की या राक्षसांचे फावते. व ते यज्ञमंडपात येऊन स्वैरपणे नाचू लागतात. --

कालवीर राम तुझा। देवो त्यासी समरा।
सान जरी बाळ तुझा थोर योग्यता॥५॥

तुझ्या पुत्राचे वय अगदी कोवळे आहे, हे मी जाणतो. नुकतेच त्याने महर्षि वसिष्ठांकडून वेदाध्ययन प्राप्त करुन घेतले आहे. शास्त्राभ्यास केला आहे. अजून त्याला जगाचा अनुभव नाही. परंतु तो पराक्रमी आहे. शत्रूला तो कठोर शासन करेल. त्यांच्या उरात धडकी भरावी असे सामर्थ्य तुझ्या ज्येष्ठ पुत्राकडे आहे. आणि अर्थातच त्याच्या पाठीशी गुरु वसिष्ठांच्या कृपा आशीर्वाद आहे. त्याच्या जोडीला माझ्या तपोबलाचे सामर्थ्य आहे त्यामुळे हे राजा, तू शंकित होऊ नकोस. तुझा बाळ अगदी सुकुमार असला तरी महाबली आहे. त्यामुळे माझ्याबरोबर येऊन जाण्याची अनुमती तू द्यावीस. [सुकुमारो महाबलो] वास्तविक मूळ वाल्मीकी रामायणामध्ये विश्वामित्रांच्या या मागणीला राजा दशरथाने अनेकदा नकार दिला आहे व सरतेशेवटी निरुपाय होऊन अनुमती दिली असा उल्लेख आहे.

शंकित का होसी नृपा। मुनि मागे राजकृपा।
बावरसी काय असा शब्द पाळला॥६॥

© www.madhavpatrachuniveel.com

पूर्वी प्रत्येक राजाला मार्गदर्शन करणारे ऋषी असायचे – ऋषी – Legislation, राजा – Execution. सम्राट चंद्रगुप्ताला आर्य चाणक्यांचे मार्गदर्शन होते. पूर्वी राजांना ऋषींचा धाक असायचा. राजा हा प्रजेचा उपभोगशून्य स्वामी असे मानले जायचे. शत्रूवर आक्रमण कधी करायचे? भूप्रदेश काबीज कसा करायचा? राज्यविस्तार किती करायचा? माघार कधी? तह कधी? या सर्व बाबतीत अंतिम निर्णय हा राजर्षींचा असायचा. राजा केवळ त्याची अंमलबजावणी करायचा आणि या आध्यात्मिक बैठकीमुळेच बहुतेक सर्व निर्णय योग्यच असायचे व राज्यकारभार सुव्यवस्थित चालायचा. असा राजा प्रजाहितदक्ष असायचा आणि त्यामुळेच प्रजेला अत्यंत प्रिय असायचा. मात्र हे सर्व मार्गदर्शन करत असताना ऋषिवरांची अपेक्षा काहीच नसायची. केवळ राज्यामध्ये धर्मकार्याला सन्मान मिळावा, ऋषींना संरक्षण मिळावे इतकीच माफक अपेक्षा असायची. आणि इथे विश्वामित्रही केवळ राजकुमारच तर मागत आहेत. या मागणीवर संदेह निर्माण होण्याचे काहीच कारण नव्हते. उलट रामचंद्रांच्या सैद्धांतिक अभ्यासाला प्रात्यक्षिकाचे परिमाण लाभणार होते. त्यामुळे राजा, तू बावरू नकोस. निःसंदेह होऊन तुझा ज्येष्ठ पुत्र माझ्याबरोबर अरण्यात पाठव---

प्राणाहून वचनी प्रीत । रघुवंशी हीच रीत ।
दाखवि बघ राम स्वतः पूर्ण सिद्धता ॥७॥

तुझ्या नकारामागे तुझे ममत्व आड येत आहे. आपल्या पुत्राबद्दल वाटणारी आसक्ती तुला तुझ्या कर्तव्यापासून च्युत करत आहे. पण तू रघुवंशातील श्रेष्ठ पराक्रमी राजा आहेस. एक वेळ प्राणत्याग घडला तरी चालेल. पण रघुकुलातील राजे आपल्या वचनापासून मागे फिरत नाही. एकदा वचन दिले, शब्द दिला की तो प्राणपणाने

जपण्याची, पूर्ण करण्याची रघुकुळाची रीतच आहे.
तुलसी रामायण — रघुकुल रीत सदा चली आयी।
प्राण जाये पर बचन ना जायी।। रघुराजाने आपला शब्द पाळण्यासाठी कुबेरावर स्वारी केली. राजा दिलीपाने गाईच्या रक्षणासाठी आपले प्राण देखील अर्पण केले. अशा दिव्य परंपरेचा वारसा तुझ्याकडे चालत आला आहे, आता मागे फिरू नकोस. त्या रघुवंशाचा सन्मान कर आणि पिता या नात्याने तुला काळजी वाटत असलेही. कारण वडिलांना आपले मूल लहानच वाटत असते. परंतु इकडे बघ! हा राम तर माझ्याबरोबर येण्यासाठी सिद्ध झाला आहे. आपले तात राजर्षिंना का बरं नकार देत असावेत? असा प्रश्नही त्याच्या मनात वारंवार येत असावा! पित्याची जर ही स्थिती तर मातेची अवस्था काय बरे वर्णावी?

कौसल्ये, रडसी काय? भीरु कशी वीरमाय?
उभय वंश धन्य रणी पुत्र रंगता।।८।।

मातेचे हृदय तर निसर्गतःच कोमल असते. पुत्राचा विरह तिला सहन होत नाही आणि इथे तर दुष्ट अशा राक्षसांचे निर्दालन करण्यासाठी विश्वामित्र मागणी करत आहेत. कुठे ते बलाढ्य, अक्राळविक्राळ असे यज्ञामध्ये विघ्न आणणारे महाकाय विराट राक्षस आणि कुठे माझा सुकोमल असा राम! तो तर अगदी सरळ मनाचा, कोमल कायेचा, मृदु अंतःकरणाचा आणि वयाने लहान आहे. माझ्या रामाच्या शौर्याविषयी, त्याच्या पराक्रमाविषयी मला पूर्ण विश्वास आहे पण त्या राक्षसांचा काय नेम सांगावा? कपटी रूपे धारण करून त्यांनी माझ्या रामाचा घात केला तर? अशा कितीतरी अभद्र विचारांनी कौसल्येचे अंतःकरण व्याकुळ झाले होते. परंतु विश्वामित्र तिला धीर देत होते.

©www.madhaveeraghuveer.com

अगं कौसल्ये, तुला असं रडणं शोभत नाही. तू वीरमाता आहेस. तू भीरू असणे हा श्रीरामांच्या पराक्रमाचा अवमान आहे. पुसून टाक तुझे ते अश्रू! आणि आनंदाने, अभिमानाने तुझ्या पुत्राला निरोप दे. आशीर्वाद दे. हा तुझा पुत्र इक्ष्वाकु वंशाची कीर्ति वाढवणार आहे, हे निश्चित! परंतु त्याचबरोबर त्याच्या मातुलगृहाची, तुझ्या माहेरची, कोसल देशाची कीर्ति देखील याच्या पराक्रमामुळे धवलतर होणार आहे. राक्षसांचा बीमोड केल्याने उभय वंशात याची कीर्ति दुमदुमणार आहे--- —

मारीच तो, तो सुबाहु राक्षस ते दीर्घबाहु।
ठेवतील शस्त्र पुढे रामास पाहताही॥

अत्यंत बलाढ्य अशा राक्षसांशी सामना करायचा आहे. मारीच आणि सुबाहुसारखे राक्षस तर कपट करण्यामध्ये, मायावी रूप घेण्यामध्ये अगदी वाकबगार आहेत. या मायावी शक्तीच्या प्रभावाने ते कितीही कठीण काम करू शकतात. हे जरी कितीही खरे असले तरी सत्यापुढे असत्य नेहमीच निष्प्रभ ठरते. सत्याच्या पाठीशी विश्वचालक शक्तीची ताकद असतेच. त्यामुळे श्रीराम जरी वयाने सान असला, कोवळा असला, अननुभवी असला तरी सत्याने, धर्माने, नीतिने वागणारा आहे--- आणि त्यामुळेच त्याच्यापुढे असत्याचे, अनीतिचे, अधर्माचे काहीही चालणार नाही. जेव्हा हे दुष्ट राक्षस रामाला पाहतील ना तेव्हा ते आपण होऊनच शस्त्र खाली ठेवतील. रामाला शस्त्राच्या आघात करण्याची वेळही कदाचित येणार नाही. धर्माचा, तेजाचा प्रभावच असा आहे की नकारात्मक शक्तींना निघून काढता पाय घ्यावा लागेल. असे बोलून विश्वामित्र रामाकडे वळतात--

© www.madhaveeraghuveer.com

श्रीरामा तूच माना। घेई तुझे चापबाण।
येता तर येऊ दे अनुज मागुता ॥१०॥

माता पित्यांना समजावून झाल्यावर विश्वामित्र आता रामाकडे वळतात. निर्णय आता तुझ्याच हाती आहे असे सुचवतात. त्याच्या अंतरात्म्याला साद घालतात आता तूच काहीतरी ठरव. माझ्या मागणीचा तू विचार कर. तुझ्या आविर्भावावरूनच मला समजते आहे की तुला ही मागणी मान्य आहे. एवढेच नाही तर माझ्या-बरोबर यज्ञरक्षणासाठी यायला उत्सुक आहेस. आणि त्यामुळे तुझे धनुष्य बाण सिद्ध करून ते तू बरोबर घे-आणि तुझा अनुज असणारा लक्ष्मणही येत असेल तर त्यालाही आपल्याबरोबर येऊ दे. यज्ञरक्षणासाठी त्याचेही सहाय्यच होईल. असे म्हणून या गीताची सांगता केली आहे.

एका ब्रह्मर्षीने एका प्रजाहितदक्ष राजाकडे ही वेगळीच मागणी केली आहे आणि विश्वामित्रांच्या मनातील सर्व भाव आपल्यापर्यंत पोहोचवण्यामध्ये गदिमांचे शब्दवैभव प्रकर्षाने दिसून येते. या १० कडव्यांमध्ये कितीतरी पैलू उलगडेल आहेत.

पुरिया धनाश्री या रागात बांधलेले हे गीत गाण्यासाठी राम फाटक या गुणी गायकाची सुयोग्य निवड केली आहे. आणि त्यांनी देखील आपल्या प्रभावी स्वरातून ब्रह्मर्षी विश्वामित्र आपल्या दृष्टीसमोर उभे केले आहेत---

॥ श्री राम जयराम जय जय राम ॥

© www.madhaveeraghuveer.com

(५) चला राघवा चला ---

२५ मार्च २०२१



॥ श्रीराम ॥

चला राघवा चला ---

म० विश्वामित्रांनी आरंभ केलेल्या यज्ञकार्यामध्ये असुर वारंवार विघ्न आणत होते. त्रास देत होते. यज्ञाची सांगता होऊ देत नव्हते. अशा असुरांच्या निर्दालनासाठी, त्यांच्या मनात जरब/दरारा निर्माण करण्यासाठी, यज्ञरक्षणासाठी विश्वामित्र ऋषींनी राजा दशरथाकडे त्याच्या ज्येष्ठ पुत्राची मागणी केली होती. मोठ्या जड अंतःकरणाने परंतु कर्तव्यबुद्धीने राजाने ही मागणी मान्य केली. व आपल्या ज्येष्ठ पुत्राला श्रीरामाला ऋषींसमवेत जाण्याचा आदेश दिला. आपल्या नजीक बंधूला सावलीसारखी साथ देणारा त्याचा अनुज सुमित्रानंदनही बरोबरच निघाला. ~~[illegible]~~ सर्वांचा निरोप घेऊन, ज्येष्ठांना वंदन करून, त्यांचे आशीर्वाद घेऊन हे दोघे जण निघाले.

विश्वामित्रांच्या जाणत्या नेतृत्वाखाली यांचा प्रवास सुरू झाला. प्रवासातही विश्वामित्र त्यांना काही अनुभवाच्या गोष्टी सांगत होते. कर्तव्यपालन, ज्ञानग्रहण याविषयी तत्पर कसे असावे याविषयी उपदेश करत होते. यज्ञासाठी सुनिश्चित केलेली जागा पुष्कळ दूर होती. तिथे पोहोचण्यापूर्वी त्यांच्या कानावर अचानकच भीषण गडगडाट आला. व त्यापाठोपाठ विकट हास्य करत अक्राळविक्राळ अशी त्राटिका राक्षसीण मार्गात समोर उभी राहिली. तिने त्यांचा मार्ग अडवला. त्या उपद्रवी राक्षसिणीला पाहून विश्वामित्रांनी तिला ठार मारण्याची आज्ञा श्रीरामाला केली. रामचंद्र शूर वीर होते. परंतु तरीही एका स्त्रीवर शस्त्र कसे उगारावे हा प्रश्न त्यांना पडला. परंतु विश्वामित्रांनी त्यांचे संशयनिरसन केले. जनकल्याणासाठी, अडथळा ठरणाऱ्या नारीचा वध करणे शास्त्रसंमत आहे. हे आधारभूत वचन सांगून, इतर काही दृष्टांत देऊन विश्वामित्र म्हणतात ---

जोड झणी कार्मुका / सोड रे सायका / मार ही त्राटिका / रामचंद्रा ॥



© www.madhaveeraghuveer.com

जेवढी ती दर्शनाने अभद्र आहे. त्यापेक्षा कितीतरी पटीने ती वागायलाही अभद्र आहे. तिचा वध करण्यात काहीही गैर नाही." ही त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानून श्रीरामांनी त्राटिकेचा वध केला.

पुढे प्रत्यक्ष सिद्धाश्रमात पोहोचल्यावर यज्ञाची सिद्धता सुरु झाली. आणि लगेचच राक्षसांच्या कारवाया सुरु झाल्या. त्यांनीही विघ्ने आणायला सुरुवात केली. पण यावेळेस विश्वामित्रांच्या साथीला केवळ त्यांचे शिष्यगणच नव्हते, केवळ ऋषिकुमार नव्हते. तर रामलक्ष्मणासारखे क्षत्रिय कुळाला भूषण असणारे असे वीर योद्धे होते. त्यांच्या शस्त्रसामर्थ्याला मंत्रसामर्थ्याची जोड होती. वसिष्ठ, विश्वामित्रांचे आशीर्वाद होते त्यामुळे अर्थातच त्यांच्या शस्त्रांनी लक्ष्याचा वेध निश्चितपणे घेतला जायचा---.

मारिच आणि सुबाहुसारखे उन्मत्त राक्षस यज्ञभूमीवर चाल करुन येत होते. परंतु त्यांना अडवण्याचे कठीण काम रामलक्ष्मण अगदी लीलया करत होते. मनातल्या मनात आपल्या गुरुजनांचे स्मरण करुन, श्रद्धापूर्वक मंत्रोच्चार करत श्रीरामाने आग्नेयास्त्र सोडले व सुबाहुचा वध केला. आणि लगेचच मानवास्त्र सोडून मारिचाला समुद्रात बुडवले. याच मारिचाने पुढे सुवर्णमृगाचे मायावी रूप घेऊन रावणाला मदत केली.

मारिच आणि सुबाहु यांची ही केविलवाणी स्थिती पाहून इतर राक्षसांची समोर येण्याची हिंमतच झाली नाही. आणि जे कोणी राक्षस आडमार्गाने यज्ञात विघ्न आणण्याचा प्रयत्न करत होते. त्यांचा तत्काळ बंदोबस्त लक्ष्मणाने केला. अर्थातच हे पाहून इतर राक्षस भयभीत होऊन पळून गेले.

पुढे ६ दिवस यज्ञ सुरु होता. परंतु कोणतेही मोठे विघ्न आले नाही. विश्वामित्रांचा हा यज्ञ यथासांग आणि निर्विघ्नपणे पार पडला.

© www.madhavbhagruveer.com

यज्ञाची सांगता होत असतानाच दूताने वार्ता आणली की काही दिवसानंतर जनक राजाच्या मिथिला नगरीमध्ये एक मोठा यज्ञ होणार आहे. आणि त्यासाठी त्याने श्रेष्ठ मुनिवरांना, आश्रमवासियांना, राजांना आमंत्रणे पाठवली आहेत.

विश्वामित्रांचा यज्ञ यथासांग पूर्ण झाल्यावर लगेचच दुसऱ्या यज्ञासाठी आमंत्रण येणे हा विश्वामित्रांना शुभशकुनच वाटला. त्यांनी लगेचच मिथिला नगरीला जाण्यासाठी सिद्धता सुरु केली. याप्रसंगी इतर मुनिजनांनी देखील आपल्याबरोबर चलण्यासाठी राम-लक्ष्मणांना आग्रह सुरु केला. ते म्हणू लागले---

चला राघवा चला।
पहाया जनकाची मिथिला॥

मिथिला नगरी तर प्रेक्षणीय आहेच. परंतु तेथील राजा हा दर्शनीय आहे.

मिथिलेश ही दर्शनीय नृप।
राजर्षी तो जनक नराधिप।
नराधिपाच्या नगरामाजी यज्ञ नवा मांडिला॥१॥

मिथिला नगरी ही देखील अयोध्येप्रमाणेच आदर्श नगरी होती. भरतभूमिमधील सात पुण्यनगरीमध्ये जरी तिचा अंतर्भाव नसला तरी मिथिलानगरी त्याच तोडीची होती. या नगरीत उत्तुंग प्रासाद होते. प्रशस्त रस्ते होते. स्वागतोत्सुक कमानी होत्या. चौकाचौकामध्ये विविध शिल्पाकृती होत्या. नगरीतून बाहेर जाणाऱ्या मार्गावर दुतर्फा फळाफुलांनी बहरलेले वृक्ष होते. या राजमार्गामुळे नगरीला आणि नगरीमुळे मार्गाला शोभा आली होती. अनेक शिल्पकारांना इथे राजाश्रय मिळाला होता. त्यामुळे आपल्या कलाकृतींनी ते नगरीच्या वैभवात भर घालत होते.

परंतु हे सारे बाह्य सौंदर्याबद्दल! कोणतीही नगरी खुलून दिसते, प्रसिद्ध होते ती तिथल्या नगरवासीयांमुळे! येथील प्रजाजन कसे होते? तर धर्मपरायण आणि परंपरा जपणारे होते. त्यांच्याकडे अनेक प्रकारची यंत्रेही होती [illegible]



© www.madhaveeraghuveer.com

शस्त्रेही होती. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ती वापरण्याचा विवेक त्यांच्याकडे होता. मंत्रसामर्थ्य होते. तसेच या नगरीमध्ये अनेक कलाकार होते. अनेक स्त्री-पुरुष नृत्य-नाट्यातून आपली कला सादर करायचे. याच्या जोडीला षडंगयुक्त अशा वेदशास्त्रांचा अभ्यास करणारे विद्वान होते, याज्ञिक होते, अग्निहोत्री होते. स्नान आणि दान यासारख्या सद्गुणांना प्रतिष्ठा होती. इतरांनी आदर्श ठेवावा अशी ही मिथिलानगरी होती.

आणि या सर्व उत्तमोत्तम गुणांनी युक्त अशा मिथिलेचा राजा जनक हा धर्मशील होता. केवळ तत्त्वज्ञानी नव्हे तर आत्मज्ञानी होता. निर्लोभी, निर्मोही होता.

'यथा राजा तथा प्रजा' असे वचन प्रसिद्धच आहे. आणि मिथिलानगरीमध्ये त्याचा निश्चितपणे प्रत्यय येतो. राजा जनक हा केवळ राजाच नाही तर त्याचे आचरण ऋषीतुल्य होते. तो राजर्षि होता. त्याचे राज्य हे धर्माच्या निकषावर चालणारे होते. अर्थातच सर्व प्रजाजन हे धर्माच्या चौकटीत राहून अर्थ काम व मोक्षाचा आनंद लुटायचे.

सर्वच जण सुशील, सदाचारी, प्रसन्न व धार्मिक होते. कामी, कंजूष व कृतघ्न मनुष्य तर शोधूनही सापडला नसता या नगरीमध्ये! राजभक्ति तर सर्वांच्या रोमरोमात भिनली होती. अर्थात जनक राजाही तसाच गुणग्राहक होता. कला, विद्यांना उत्तेजन देणारा होता. राजा जर उत्तम असेल तर त्या नगरीला कशी ऊर्जितावस्था येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे मिथिलानगरी!

अशा या नराधिप असणाऱ्या राजा जनकाला धर्मकार्य करण्याविषयी आस्था होती. ज्ञान होते. त्याविषयी जाण होते. सृष्टिसंरक्षणासाठी, मानवतेच्या विकासासाठी अनेक प्रकारचे यज्ञ मिथिलेमध्ये संपन्न होत होते. आता देखील अशाच एका नव्या यज्ञाची सिद्धता मोठ्या उत्साहाने सुरू होती. देशोदेशींच्या राजांना, ऋषींना, मुनिजनांना या समारंभासाठी आमंत्रित केले होते

© www.madhaveeragnuwal.com

यज्ञमंडपी सुनाभ कार्मुक
ज्यास पेलता झाला त्र्यम्बक
त्र्यंबक देवे त्याच धनूने त्रिपुरासुर मारिला॥२॥

हा समारंभ राजदरबारात नाही तर यज्ञमंडपात सुरु आहे. 'यज्ञो वै भुवनस्य नाभिः' असे वचन आहे. 'नाभि' याचा अर्थ केंद्रबिंदू आहे. या मंडपाच्या केंद्रस्थानी एक प्रचंड असे शिवधनुष्य ठेवले आहे. जे आकाराने व वजनाने इतके प्रचंड आहे की सर्वसामान्य योद्ध्याला ते पेलणे शक्य नाही. साक्षात त्र्यंबकाने, शिवशंकराने याचा उपयोग करून त्रिपुरासुराचा वध केला होता. त्यामुळे त्या धनुष्यामागे विजयाची परंपरा तर होतीच. परंतु कल्याणकारी अशा शिवशंकराच्या हस्तस्पर्शाने पावन झालेले हे धनुष्य उचलणे हे कोणा सर्वसामान्य माणसाचे काम नाही. इथे केवळ शक्तीचा प्रयोग चालणार नाही तर त्या धनुर्धराच्या पराक्रमाबरोबरच त्याच्या सदाचरणाची जोड असणे आवश्यक होते----

शिवधनूला त्या सदनी ठेवून
जनक त्याचे करितो पूजन
पूजनीय त्या विशाल धनूला जगात नाही तुळा॥३॥

धर्मशील असा जनकराजा या धनुष्याकडे केवळ शस्त्र म्हणून पाहत नाही. तर शिवशंकराचा प्रसाद म्हणून पाहतो आहे. राजा जनकाच्या तपश्चर्येमुळे प्रसन्न होऊन आशुतोष असणाऱ्या शंकराने आपले हे विक्रमी धनुष्य जनकाला सोपवले होते. त्यामुळे त्याचे मूल्य जनकराजा जाणत होता. अर्थातच प्रसादतुल्य अशा या शिवधनुष्याची राजा जनक दररोज श्रद्धेने पूजन करत होता. अशा या विशालकाय धनुष्याच्या तोडीचे दुसरे धनुष्य शोधून देखील सापडणार नाही. या धनूला खरोखर तुळा नाही-

© www.madhaveeraghuveer.com

देशोदेशीचे नृपती येऊन
स्तिमित जाहले धनुष्य पाहून ।
पाहताच ते उचलायाचा मोह त्यां जाहला ॥४॥

राजा जनकाने देशोदेशीचे राजे, महाराजे या यज्ञ समारंभासाठी निमंत्रित केले होते. त्यानुसार दुरून-दुरून याच निमित्ताने राजे आले होते. क्षत्रियांना शस्त्र चालवण्याचे ज्ञान असणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे त्याविषयीचे ज्ञान असावे लागते. शस्त्रांचे, अस्त्रांचे विविध प्रकार खरा क्षत्रिय जाणत असतो. शस्त्राचा वापर वारंवार करता येतो तर अस्त्र हे केवळ एकदाच वापरता येते. 'अस्' या धातूचा अर्थ असणे असा असला तरी त्याचाच दुसरा अर्थ फेकणे असा आहे. आणि सगळीच अस्त्रे ही फेकून मारायची आहेत. त्यांचे ज्ञान राजांना असायलाच हवे. शिवाय अस्त्र व शस्त्र यामधील वैविध्य देखील ते जाणतात. परंतु या राजांनी इतके भव्य, विशाल आणि वजनदार धनुष्य कधी पाहिलेच नव्हते. आणि खऱ्या क्षत्रियाला अशी नवनवीन शस्त्रे हाताळावीशी वाटतात. आणि असे विराट धनुष्य, शिवाय साक्षात शिवशंकराचा प्रसाद म्हणून प्राप्त झालेल्या धनुष्याला निदान स्पर्श तरी करावा, ते उचलून तरी पहावे, त्याला बाण तरी लावता यावा असे एक अनावर आकर्षण साऱ्याच राजांना वाटत होते. त्या प्रयत्नातून काय साध्य होणार आहे? जनकनंदिनी अशा सीतेची प्राप्ती होईल का? हे प्रश्न देखील या धनुष्यासमोर गौण ठरले. आता मनात एकचे विचार येतोय. माझ्या क्षात्रवृत्तीला अनुसरून अशी ओढ मनातून वाटते आहे. या शिवधनुष्याला उचलून बाण लावायचा. बस एवढीच इच्छा आहे. क्षत्रिय म्हणून या सभामंडपात लज्जित होण्याची वेळ येऊ नये. परंतु कोणत्याही राजाची ही इच्छा फलद्रूप होऊ शकली नाही-

देव दैत्य वा सुर नर किन्नर
उचलू न शकले त्यास तसूभर । वाकला ॥७॥
तसूभरही ना सरलपणा त्या चापाचा ~~वाकला~~

केवळ राजे रजवाडेच नाही तर या पुण्यशील अशा राजा जनकाच्या सभामंडपात देव दैत्य सुर नर किन्नर, यक्ष अशा विविध योनिमधील श्रेष्ठ आले होते. देवांना, सुरांना आपापल्या क्षमतेविषयी विश्वास होता. राक्षसांकडे, दैत्यांकडे अघोरी अशी शक्ती होती. सर्वसामान्य माणसांपेक्षा कितीतरी पटीने ते शक्तिशाली होते. त्यांना त्यांच्या शक्तीचा फाजील अभिमानही होता. यक्ष, किन्नरांकडे अतिमानवी अशी दैवदत्त देणगी होती. या सर्वांना हे धनुष्य उचलणे सहज शक्य वाटत होते. परंतु ते उचलणे तर दूरच परंतु त्याला तसूभर हलवणे देखील त्यांना शक्य झाले नाही. त्या वजनदार धनुष्याला शिवशंकरांच्या तपश्चर्येची जोड होती. त्यामुळे या सर्वांची अफाट शक्ती या धनुष्यापुढे निष्प्रभ ठरत होती. त्यामुळेच त्या धनुष्याची ताठ, सरळ, असणारी प्रत्यंचा वाकवणे हे कोणालाही शक्य झाले नाही. त्यामुळे त्या सरळपणाला कोणीही वाकडे करू शकत नाही. एकेक वीर आत्मविश्वासाने पुढे जात होते आणि अयशस्वी होऊन परत फिरत होते. परंतु त्यामुळेच सर्वांची उत्सुकता वाढत चालली होती---

कोण वाकवुन त्याते ओढील ?
प्रत्यंचा त्या धनूस जोडील ?
सोडील त्यातून बाण असा नर कोणी ना जन्मला (!) ॥८॥

कितीतरी पराक्रमी पुरुष प्रयत्न करत होते, निराश होत होते. आपल्या शौर्याला लागलेला हा कलंक आहे, असं वाटल्यामुळे दुःखित होत होते. आता पण जिंकणे

© www.madhuraveeraghuveer.com

तर दूरच राहिले, पण अशा मानहानिच्या प्रसंगाला सामोरे जाणे हेच नकोसे वाटत होते. क्षात्रधर्माला जणु काही कलंकच आहे ही भावना बळावत चालली होती. आणि जसजसा एकेक वीरपुरुष पराभूत होत चालला होता, तसतशी सर्वच उपस्थितांच्या चेहऱ्यावर निराशा दाटून येत होती. शक्तिशाली, समर्थ, पराक्रमी असे योद्धे देखील हतबल झालेले पाहून मनात येत होते की हा यज्ञ असाच व्यर्थ जाणार का? यातून काहीच साध्य होणार नाही का? ज्या राजांनी, वीरपुरुषांनी अद्याप प्रयत्न केला नाही, त्यांच्यामध्ये एखादा तरी पराक्रमी निघावा की जो हे अवजड धनुष्य उचलू शकेल, त्याच्या प्रत्यंचेचा टणत्कार करू शकेल, त्याला बाण जोडू शकेल--- असे तर नाही ना होणार की सर्वांचेच प्रयत्न निष्फळ होतील. या धनुष्याला बाण लावणारा अजून जन्मालाच आला नाही. असा याचा अर्थ समजायचा का?

उपजत योद्धे तुम्ही धनुर्धर
निजनयनी ते धनु पहा तर
बघा राघवा, सौमित्री तर औत्सुक्ये दाटला ॥८॥

तुम्ही तर रघुकुळामध्ये जन्म घेतलेले असे उपजत धनुर्धर आहात. पराक्रम तर तुमच्या नसानसांमध्ये खेळतो आहे. एका दिव्य व पराक्रमी परंपरेचे तुम्ही वारस आहात. आणि अर्थातच उपजत गुणांना शास्त्राभ्यासाची जोड मिळाली आहे. हि-याला पैलू पाडण्याचे काम महर्षि वसिष्ठांनी चोख पार पाडले आहे. अर्थातच तुमची ग्रहणक्षमता देखील असामान्य आहे. त्यामुळे तुमच्या शस्त्रकौशल्याला शास्त्राध्ययनाची झालर आहे. क्षत्रिय कुळाला भूषण असणारे तुम्ही माझ्याबरोबर मिथिलानगरीला

केवळ चला. एकदा तुमच्या डोळ्यांनी तो यज्ञसमारंभ, तो राजा जनक, ते शिवधनुष्य आणि ती मिथिलानगरी पहा तरी! मी तुम्हाला मनापासून ही विनंती करत आहे.
परंतु श्रीरामांच्या मनात येत होते की, आपण तर विश्वामित्रांच्या यज्ञरक्षणासाठी मातापित्यांचा निरोप घेऊन निघालो होतो. आता ते कार्य पूर्ण झाल्यानंतर उगीच रेंगाळणे योग्य ठरणार नाही. तेव्हा सरळ अयोध्येला परत जावे. परंतु महर्षि विश्वामित्रांची सूचना, आश्रमवासीयांचा प्रेमळ आग्रह यामुळे सुमित्रानंदन लक्ष्मणाला मात्र त्या न पाहिलेल्या मिथिलेचे आकर्षण वाटू लागले होते. आणि ती उत्सुकता त्याच्या अधीर डोळ्यांमधून व्यक्त होत होती.

उत्साहाने निघती मुनीजन
चला संगती योद्धे आपण।
आपण होता सहप्रवासी, भाग्यतरु ये फळा ॥८॥

हे संभाषण सुरु असतानाच एकीकडे प्रवासाची सिद्धता सुरुच होती. यज्ञात वारंवार येणाऱ्या विघ्नांमुळे आश्रमजनांना पुष्कळ त्रास, मनस्ताप सहन करावा लागला होता. आणि राम-लक्ष्मणांच्या पराक्रमामुळे बराच काळ लांबणीवर पडलेली यज्ञाची सांगता आता विधिवत पूर्णत्वाला गेली होती. आता नजीकच्या काळात कोणताही यज्ञ होणार नव्हता. असुरांची विघ्ने आता येणार नव्हती. उलट आता नवीन रमणीय प्रदेश बघायला मिळणार होता. त्या मिथिलानगरीचा, शूर उदार, धार्मिक राजा जनकाचे दर्शन होणार होते. या कल्पनेनेच उत्साहाला उधाण आले होते. आदर्शभूत असणाऱ्या राम-लक्ष्मणांनी त्या आश्रमवासीयांची मने आधीच जिंकून घेतली होती. अशातच जर त्यांचा सहवास आणखी लाभणार असेल तर तो मणिकांचन योगच समजावा.

© www.madhaveeraghuveer.com

JUNE 2015

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

08 जणू आमच्या भाग्यनगर हा फुलांनी बहरावा असाच योग
आला आहे. अशी आश्रमवासियांची भावना होती.
09 आणि हे आश्रमवासिय ऋषींच्या सहवासात व मार्गदर्शनाने
तयार झालेले असे मर्यादशील, धर्मचरण, व्रतस्थ
10 असे होते. आणि अशा सत्यशील, नीतिमान, संयमी
व्यक्तींच्या मनामध्ये किती आग्रही सादिक आणि तरीही
11 निश्चय असायला हवा हे बाबूजींनी नेमके जाणले ---
आणि आश्रमवासियांच्या स्वराचा सच्चेपणा जपताना हे
12 गीत श्री० चंद्रकांत गोखले या ज्येष्ठ आणि ऋषितुल्य
कलाकारांच्या आवाजात हे गीत सादर केले आहे. आणि
13 त्यांच्या स्वरांनी या गीताला योग्य न्याय दिला आहे.

|| श्रीराम जयराम जय जय राम ||

14

15

16

17

18

19

20

© www.madhaveeraghuveer.com

(६) आनंद सांगू किती?



२६ मार्च २०२१

॥ श्रीराम ॥

## आनंद सांगू किती?

आश्रमवासियांच्या आग्रहाला मान देऊन श्रीराम व लक्ष्मण विश्वामित्रांसमवेत मिथिला नगरीमध्ये आले. शूर, धार्मिक व अगत्यशील अशा राजा जनकाने त्यांचे मोठ्या आदराने स्वागत केले. त्यांची योग्य ती व्यवस्था ठेवली. दुसऱ्याच दिवशी सर्वजण शुचिर्भूत होऊन यज्ञमंडपात आले. यज्ञमंडपामध्ये मध्यभागी शिवधनुष्य ठेवले होते. अनेक रथी, महारथी राजांनी त्या धनुष्याला बाण लावण्याचा प्रयत्न केला. पण कुणालाही त्यात यश आले नाही. तेव्हा म. विश्वामित्रांनी श्रीरामांना धनुष्याची प्रत्यंचा खेचून त्याला बाण लावण्याची आज्ञा केली. श्रीरामांनी प्रथम श्रीगुरूंना वंदन केले. त्यांचे आशीर्वाद घेतले. इतर ज्येष्ठांना प्रणाम केला. त्यानंतर भव्य अशा त्या शिवधनुष्यालाही प्रणाम करून नम्रतेने धनुष्याला हात लावला. श्रीरामांनी अगदी सहजच धनुष्य उचलले व त्याला बाण लावणार इतक्यात कड कड असा आवाज झाला व धनुष्य भंग पावले. महाबाहू अशा श्रीरामांचा तो पराक्रम पाहून राजा जनक हर्षभरित झाला. विश्वामित्रांची अनुज्ञा घेऊन आणि श्रीरामांची संमति घेऊन आपल्या कन्येचे जानकीचे पाणिग्रहण करावे अशी विनंति केली. संमति मिळताच सायंकाळ राम-सीता विवाह सोहळा संपन्न झाला. जणू धरणीमातेचं नातं आकाशाशी जडले. खरोखर हे माया ब्रह्माचे मीलन होते. सगळीकडे आनंदी आनंद झाला. त्याचबरोबर उर्मिला, मांडवी, श्रुतकीर्ति या भगिनींचे विवाहदेखील लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांच्या सारख्या सुयोग्य वरांबरोबर संपन्न झाले. ही वरात वाजत गाजत अयोध्यानगरीपर्यंत झाली.

अयोध्यावासीयांना तर आपल्या लाडक्या रामचंद्राला या वरवेषात पाहून फारच आनंद झाला. आणि नवीन युवराज्ञी तर अत्यंत सुरेख, नम्र व शालीन होत्या. स्वागतसोहळा मोठ्या थाटामाटात साजरा झाला. कौसल्या, सुमित्रा, कैकयी या तिन्ही राण्या तर आनंदाने हरखून गेल्या होत्या. या नवीन

©www.madhaveeradhuveer.com

08 सुनांचे कोडकौतुक करण्याची तर त्यांच्यामध्ये अगदी चढाओढच
लागली होती. सुखाचे माप अगदी भरभरून वाहत होते.
09 आता हे संसारचित्र अगदी परिपूर्ण झाले होते. आता यामध्ये
कोणतेही न्यून नव्हते. कोणतीही कमतरता नव्हती. चारही
10 राजकुमारांना साजेशा अशा सहचारिणी लाभल्या होत्या.
वैभवात तर कधीच कसलीच कसर नव्हती परंतु आता तर
11 आयुष्यामध्ये कुठलीही कमी उरली नाही. या नवीन नगरीशी,
नवीन घराशी, नवीन माणसांशी या चारही सुनांचा हळूहळू
12 परिचय होत होता. माहेरच्या रेशमी बंधानं त्या बांधल्या जात
होत्या. माहेरी तर या चौघी बहिणी आणि आता माहेरी तर
13 नात्याने या चौघी जावा जावा!
नात्यांची नावे बदलली तरी अंतरीची जवळीक ही
14 आधीपासून होतीच. मात्र आता तो अधिक गहिरी, अधिक
घट्ट, अधिक जबाबदारीची झाली होती. एकमेकींच्या,
15 सहृदां सहकारित्या आणि तरीही जबाबदारीच्या जाणिवेतून
दिवस अगदी आनंदात चालले होते.
16 राजा दशरथांना तर अगदी धन्य धन्य वाटत होते.
कधी कधी तर हे सारं स्वप्नवतच वाटायचे. तो पुत्रकामेष्टि
17 यज्ञ, यज्ञातून प्रकट झालेला तो यज्ञपुरुष, त्याने दिलेला
तो पायसदान, त्या प्रसादातून या चार देखण्या बालकांचा जन्म,
18 त्यांचे अध्ययन, त्यांचा पराक्रम आणि आता तर त्यांचा
विवाह होऊन चार चार सुना घरी देखील आल्या.
19 खरोखर यापेक्षा सुख सुख ते आणखी काय असते?
बघता बघता किती मोठी झाली आपली मुलं?
20 शस्त्र आणि शास्त्र या दोन्हीमध्ये पारंगत आहेत. लोकांनाही
त्यांच्या वागण्या बोलण्यावरून या शालीनतेचे, बुद्धिमत्तेचे ~~प्रतीक~~
शौर्याचे दर्शनही घडत आहे. आपल्या या कुलसंपन्न पुत्रांकडे
पाहताना माझा ऊर अगदी अभिमानाने भरून येतो आहे. मात्र
योग्य काळी त्यांच्यावर जबाबदारीही सोपवायला हवी. राज्यकारभाराचा
हा भार त्यांच्या सुपूर्द करायला हवा. सर्वच जण पराक्रमी आहेत.
परंतु धर्मशास्त्रानुसार आणि कुळपरंपरेप्रमाणे ज्येष्ठ पुत्राला



© www.madhaveeraghuveer.com

राज्याभिषेक करणे योग्य ठरेल. गुरुजनांना हा मानस बोलून दाखवावा. अमात्यांचा सल्ला घ्यावा. आणि चांगला मुहूर्त बघून ज्येष्ठ युवराज – श्रीरामाला राज्याभिषेक करावा असे माझ्या मनात वारंवार येत आहे.

हे राज्य श्रीरामाच्या स्वाधीन केले म्हणजे मग मी वानप्रस्थ स्वीकारून विश्रांति सुखाचा लाभ घेईन. असे मला वाटते. जर श्रीरामाला राज्याभिषेक झाला तर सर्व प्रजाजनांनाही अतिशय आनंद होईल. कारण श्रीराम हा सर्वांनाच फार प्रिय आहे. असा विचार करून राजाने प्रथम आपल्या मंत्र्यांच्या कानावर हा विचार घातला. त्या सर्वांची संमति घेतली. राजा जनकांशीही विचार विनिमय केला. आणि सर्वांची संमति अनुमती मिळाल्यावर घोषणा केली की – –

चैत्रमासातील शुभ अशा पुष्य नक्षत्रावर श्रीरामांना राज्याभिषेक होणार आहे. वाऱ्याच्या वेगाने ही बातमी सर्वत्र पसरली. राजवाड्यातील सर्वांनाच अतिशय आनंद झाला. प्रत्येकजण मोठ्या औत्सुक्याने व आनंदाने एकमेकांना सांगू लागला – – श्रीरामांना राज्याभिषेक होणार – – र.

सिद्धता सुरु झाली. मुहूर्त जवळचाच काढला होता. चार दिवस उरले नव्हते. उत्साहाला अगदी उधाण आले होते. कशाचीच उणीव नव्हती. समृद्धी / संपन्नता होती. निष्ठावंत असे दासदासी होते. प्रजाजनांचे सहाय्य होते. अमाप उत्साह होता. मग काय विचारता? सगळ्यांमध्येच एक आगळेच चैतन्य सळसळत होते.

पण त्यातल्या त्यात उर्मिला आणि इतर भगिनींच्या हर्षविनोदाला उधाण आले होते. अयोध्येमध्ये आल्यानंतर साजरा होणारा हा पहिलाच मोठा समारंभ होता आणि समारंभ तरी कोणता? तर त्यांची लाडकी सीता आता महाराणी होणार होती कारण आता श्रीरामचंद्रांना राज्याभिषेक होणार होता. आता तर सीतेच्या मनोविनोदनाची एकही संधि त्या सोडणार नव्हत्या.

©www.madhaveeraghuveer.com

त्यांचा आनंद शब्दात व्यक्त करावा असं तर त्यांना वाटत होतं. परंतु तरीही तो पूर्णपणे प्रगट करताही येत नव्हता. कसं सांगू? कुणाला सांगू? कोणत्या शब्दात सांगू? अशी त्यांची अवस्था झाली होती. ऊर्मिला, मांडवी, श्रुतकीर्ति यांचा तर सीतेवर दोन्ही नात्यांनी अधिकार होताच. पण त्यांच्या जोडीला समवयस्क सख्याही येऊन मिळाल्या. शिवाय काही अगदी जवळच्या, मर्जीतल्या दासीही या आनंदमेळ्यात सामील झाल्या. उगीचच हास्याचा खळखळाट करत, एकमेकींना कोपरखळ्या मारत या दालनातून त्या दालनात त्यांची लगबग सुरू होती. हर्षविभोर होऊन त्या एकमेकींना खुणावत होत्या आणि गात होत्या----

सीतावल्लभ उद्या व्हायचे राम अयोध्यापती ।
सखे गं आनंद सांगू किती?

एकमेकींमध्ये आनंदाची ही देवाणघेवाण चालू आहे. पण तरीही समाधान होत नाहीये. राजवाड्यातील शिपायांना न जुमानता ओठांच्या महिरपीतून हे हसू बाहेर पडतंय. कारण उद्या श्रीरामांना राज्याभिषेक होणार आहे. आणि श्रीराम तरी कसे? तर 'सीतावल्लभ'! वा काय शब्दांची किमया आहे! वल्लभ याचा अर्थ शब्दकोशात 'पति' असा मिळेल कदाचित! परंतु त्यामध्ये एक नाजुकशी अलवार छटा लपलेली आहे. वल्लभ म्हणजे प्रिय पति! सखा! वल्लभ या शब्दामध्ये नात्यापलीकडचे तरल अनुबंध आहेत. पति पत्नीचे परस्परांवर निरतिशय पण तरीही अबोल प्रेम असते तेव्हा तो तिचा वल्लभ असतो. आजकालच्या उथळ आणि सवंग नात्यांच्या प्रदर्शनामध्ये कदाचित वल्लभ या शब्दातील कोवळीक करपून जात असेल पण अगदी प्राणापलीकडे प्रीति असूनही जेव्हा ती उघडपणे प्रगट केली जात नाही तेव्हा असतो तो वल्लभ! श्रीसूक्तामध्ये देखील 'श्री' चा उल्लेख अच्युतवल्लभा म्हणून केला. इथे तर मर्यादापुरुषोत्तम अशा श्रीरामांची प्रिय पत्नी तर किती मर्यादशील असेल! असे सीतापति उद्या तर अयोध्येचे स्वामी म्हणून सिंहासनावर बसणार आहेत. आणि अशा शुभ प्रसंगी

© www.madhaveeraghuveer.com

त्या सिंहासनावर राजांच्या डाव्या बाजूला जेव्हा तू बसशील ना सीते! तेव्हा तुझ्या भावना नेमक्या कशा असतील ग? ते तरी सांग ना आम्हाला! सांग ना!

सिंहासनी श्री राघव बसता
वामांगी तू बसशील सीता।
जरा गर्विता जरा लज्जिता
राजभूषणा भूषवील ही कमनीय तव आकृती ॥३॥

अगं, हा तुझा पहिलाच अनुभव आहे सीते! यापूर्वी तू असा प्रसंग कधी अनुभवलाच नाहीयेस. पण कधी जवळून पाहिला देखील नाहीयेस. त्यामुळे अशा वेळी त्या राजाच्या राणीने कसे वागायचे असते याविषयी तुला खरोखरच काही अंदाज नाहीये. म्हणजे सर्व राजदरबारातील मंडळींच्या अभिवादनाचा स्वीकार करताना मान ताठ हवी, की किंचित झुकलेली हवी याविषयी देखील तुझ्या मनात संभ्रम असणारच आहे. अगं आम्ही नीट ओळखतो ना तुला! आणि बरोबरच आहे तुझं! या सिंहासनाधिष्ठित राजांची अर्धांगिनी म्हणून गर्विता का या रघुकुळाची नम्र, शालीन अशी स्नुषा म्हणून लज्जिता, काहीच कळत नाहीये. मनात अगदी द्विधा मनस्थिती झालेली दिसतेय. पण एवढे मात्र निश्चित की उद्या राणीसाहेबांना विभूषित करण्यासाठी जे अलंकार, जी वस्त्राभूषणे आज इथे ठेवली आहेत ना, ते बघून आम्हाला तरी असे वाटतय की ते अलंकार तर मौल्यवान आहेत, सुंदर आहेत, धारदार आहेत. परंतु ते जेव्हा तुझ्या कमनीय कायेवर विराजमान होतील ना तेव्हा त्यांची शोभा आपोआपच वाढणार आहे. त्या आभूषणांमुळे तुला नाही तर तुझ्यामुळे त्या आभूषणांना शोभा येणार आहे.

इथे गदिमांनी कमनीय असा अचूक शब्द योजून तिच्या सौंदर्याचे वर्णन तर केले आहेच पण कुठेही तिच्या शालीनतेला बाधा येऊ दिली नाही आणि त्यामुळेच ही शालिनी, विनया, सुचरिता अशी सीता आपल्या दागिन्यांचे सौंदर्य अधिकच खुलवत आहे.

गुरुजन मुनिजन समीप येतील
सप्त नद्यांची जले शिंपतील।
उभय कुळे मग कृतार्थ होतील।
मेघाहुनिही उच्चरवांनी स्फुरतील या नौबती ॥२॥

विधिवत राज्याभिषेकासाठी अनेक तपोवृद्ध, वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध असे कितीतरी मुनिजन, गुरुजन अयोध्येमध्ये आलेले आहेत. उद्याच्या शुभप्रसंगी ते मंत्रोच्चार करून सात पवित्र नद्यांच्या जलाचे प्रोक्षण करून एकूणच वातावरणातील मांगल्याची वृद्धी करतील. सगळ्या राजदरबारात पावित्र्याच्या, मांगल्याच्या, सुगंधाच्या लहरी पसरतील. ज्येष्ठ मंडळींच्या आशीर्वादाने हा अभिषेक सोहळा संपन्न होईल. रामाच्या राज्याभिषेकाने केवळ रघुकुळालाच नाही तर तुझ्या माहेरी म्हणजे मिथिला नगरीमध्ये- जनक राजाच्या कुळामध्ये देखील तुझी राणी म्हणून कीर्ति पसरेल. कुलीन अशी सुकन्या दोन्ही कुळांचा उद्धार करते. आणि मनात उचंबळणाऱ्या या अबोध विचारांना / भावनांना जयघोष करत साथ देणार आहेत, त्या या उच्चरवाने झडणाऱ्या नौबती! आनंद हा वाटल्याने वाढतो. आणि घोषवाद्यातून नौबती, नगारे, डंका यांच्या माध्यमातून सुवार्ता पोहोचवण्याची पद्धत पूर्वापार आहेच. या नौबती मेघाहून ही उच्चरव करत आहेत.

सत्यासम तुज जनी मान्यता
राणीपद गे तुला लाभला।
पुत्राविण तू होशील माता
आधिक त्रेधा मातृत्वाची तुज करणे स्वीकृति ॥३॥

पत्नी ही पतिची अर्धांगिनी असते. त्याच्या सगळ्या दुःखात/सुखात तिचा वाटा असतोच पण त्याच्या कर्तव्यकर्मांमध्ये त्याला

पूर्णपणे साथ देणे हे देखील त्या पतिव्रता स्त्रीचे आद्य कर्तव्य आहे. आता जर तुझा प्रिय पति (वल्लभ) राजपदावर बसणार असेल तर ओघानेच हे राज्ञीपद तुला मिळणार हे उघडच आहे. आणि राजा हा प्रजेचा पालनकर्ता असतो. त्याच्या कल्याणाची, रक्षणाची जबाबदारी राजावर असते. खरं तर तो प्रजेचा पुत्राप्रमाणे सांभाळ करतो. आणि जर तो पिता असेल तर अगदी सहजपणे तू माता होशील. त्याने जरी तू लहान असलीस तरी तुझे उत्तरदायित्व मात्र मोठे आहे. प्रत्यक्ष जरी तू पुत्राला जन्म दिला नसलास तरी- देखील या प्रजेची, जनतेची तू साक्षात आईच आहेस. आपली दुःखे, आपल्या तक्रारी, आपली गाऱ्हाणी प्रजाजन दुसऱ्या कोणासमोर मांडणार? त्या सर्वांवर मायेची पाखर घालणारी तू वत्सल मांताच आहेस. अगदी निसर्गतःच त्यांनी बहाल केलेल्या मातृपदाचा स्वीकार तू करायला हवास.

तुझ्याच अंकित होईल धरणी,
कन्या होईल मातृस्वामिनी
भाग्य भोगिले असेल कोणी?
फळाफुलांनी बहरून राहील सदा माऊली क्षिती ॥४॥

सामान्यपणे राजाला भूप/भूपति म्हटले जाते. अर्थातच तो जसा नृपति म्हणजे नरांचा पति तसेच भूमिचा पति असतो. पालनकर्ता/रक्षणकर्ता असतो. किंवा अवनीपाल असा शब्द देखील पृथ्वीचा रक्षणकर्ता या अर्थाने येतो. अर्थातच जमिनीचे/धरणीचे रक्षण/पतीच्या कार्याचा भार स्वीकारणारी तू आर्य नारी! तुलाही या धरणीचे रक्षण करायचे आहे. पण इथे गंमत अशी आहे की सीता भूमिकन्या आहे. म्हणजे जिच्या पोटी जन्म घेतला तिचेच रक्षण करण्याची जबाबदारी तुझ्यावर आली आहे. म्हणजेच हे सीते!

तू कन्या असूनही आता, तुझ्या मातेचीही स्वामिनी होणार आहेस. ही गदिमांची प्रतिभा!

अर्थात हे अनुपम भाग्य तुला लाभले अशी तू भाग्यवती आहेस. परंतु ही भूमि/धरणीही स्थिति देखील तुझ्या स्वामित्वामुळे निःशंक होईल. आपल्याच कन्येवरचा तिचा विश्वास ती फळाफुलांच्या बहरातून मुक्तपणे व्यक्त करेल. मायलेकींचे हे अद्भुत नाते याचि देही याचि डोळा 'पाहणार आम्ही किती भाग्यवान!

पतितपावन रामासंगे
पतितपावना तूही सुभगे
पृथ्वीवर या स्वर्गसौख्य घे
तिन्ही लोकी भरून राहू दे तुझ्या यशाची द्युति ॥५॥

श्रीराम हे तर साक्षात विष्णूचा अवतार आहेत. अगदी पतितांमधील पतित असेल तरी त्याला पावन करण्याचे सामर्थ्य या श्रीरामांच्या केवळ दर्शनात, स्पर्शात, स्मरणात आहे. नामात आहे. अशा पतितपावन रामासमवेत सीते, तू त्याची अर्धांगिनी आहेस म्हणूनच सुभगा आहेस. तूच भगवती आहेस. समग्र ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान आणि वैराग्य अशा सहा गुणांच्या समूहाला भग असे म्हणतात. आणि तूही अशा दैवी गुणांनी युक्त अशी सुभगा आहेस. तू भगवती आहेस. शिव आणि शक्तीचा असा अपूर्व संगम झाल्यावर साक्षात स्वर्गीचे सुख या पृथ्वीतलावर अवतरेल यात शंकाच नाही. जेव्हा असा समसमा संयोग घडतो तेव्हा स्वर्गीय देवतांना देखील मग या धरतीचा हेवा वाटू लागतो. देवता सहर्ष पुष्पवृष्टी करतात. या स्वर्गसुखाचा तू आस्वाद घे. त्रैलोक्यात तुझ्या यशाची द्युति - प्रकाश तेजस्विता भरून राहू दे. तुम्हा उभयतांच्या सुकीर्तिने तिन्ही लोक भरून राहू दे. ---

© www.madhaveeraghuveer.com

महाराणी तू आम्ही दासी
लीन सारख्या तव चरणासी।
कधी कोणती आज्ञा देसी
तुझिया चरणी लीन राहू दे सदा आमुची मती॥६॥

सख्यांच्या थट्टामस्करीला अगदी ऊत आला आहे. तिच्या भाग्याचा त्या हेवा करत आहेत. मुद्दामच बोलून, वाकवून तिला शाब्दिक चिमटे घ्यायलाही त्या कमी करत नाहीत. आता काय म्हणे, तू महाराणी होणार- आम्ही सर्वजणी तुझ्या दासी म्हणून तुझ्या अवतीभवती असू. काही वार्तालाप करत असलो तरी देखील मनाने सावध, सजग असू हे निश्चित! कारण तू कधी, कोणती आज्ञा देशील याचा वेध आमचे कान सतत घेत असतील. कारण राणीसाहेबांचा हुकूम आम्ही खाली नाही पडू देणार--- आणि खरंच! हे जरी गमती गमतीमध्ये म्हणत असलो तरी आम्ही सख्यांच जणी तुझा अधिकारही जाणतो आणि तुझा स्वभावही! खरोखर तू एखादी आज्ञा करावीस आणि ती झेलण्यासाठी आमच्यामध्ये अगदी चुरस लागावी. असंच आम्हाला वाटतंय. तुझ्या आज्ञेचे पालन करण्यामध्ये आमची मति जोडलेली रहावी. हीच प्रार्थना त्या जगदीश्वराच्या चरणी आहे.

विनोद नच हा हीच अपेक्षा
तव भाग्याला नुरोत कक्षा।
देवदेवता करोत रक्षा
दृष्ट न लागो आमुचीच गे, तुझिया भाग्याप्रती॥७॥

हे आपलं बोलणं अगदी खेळीमेळीत चाललं असलं ना तरी आमच्या मनातलं, अगदी आत आत दडलेलं आज बाहेर येतंय. जरी गमतीने तुला महाराणी, राणीसाहेब असे वरवर लटकं वाटेल असं आम्ही बोलत असलो तरी

आम्हा सर्वांची हीच मनापासून इच्छा आहे. तुझ्या भाग्याला कोणतीही सीमारेषा नसावी. अमाप असे भाग्य तुझ्या वाट्याला यावं आणि ते निश्चित येणारच कारण आमची ही अगदी मनापासून इच्छा आहे आणि मानवी इच्छेला जेव्हा देवदेवतांचा आशीर्वाद लाभतो, तेव्हा त्या फलद्रूप होतातच. रघुकुळासारखं पवित्र कुळ, त्याही तुम्हा दोघांची- रामसीतेची सुयोग्य जोडी जर या अयोध्यानगरीच्या राजसिंहासनावर बसणार असेल तर सहजच देवतांचा कृपाशीर्वाद लाभणारच! मात्र हा उचंबळणारा सुखाचा सागर हेलकावे खात असताना उगीचच मनात शंका येत आहे. या सुखाला कुणाची दृष्ट तर नाही ना लागणार? आणि असं म्हणताना की अनेकदा जवळच्या माणसांचीच दृष्ट चटकन लागते. तसं मात्र नको हं व्हायला!

ओळखीचे बघ आले पदरव
सावलीतही दिसते सौष्ठव।
तुला भेटण्या येती राघव
बालिका नयनी तुझ्या येई का लज्जेला जागृती?

उद्या तू महाराणी होणार या आनंदामध्ये आम्हाला तर बाई कशाचंच भानच उरलं नाही बघ! बोलतच बसलो आम्ही तुझ्याशी वेड्यासारख्या! अगं, श्रीरामांनाही काही मनीचं गुज बोलायचं असेल हे लक्षातच नाही आलं बाई! त्यांच्याही मनात थोडी उत्कंठा, थोडी हुरहूर असेलच की! ते बघ, हे तुला भेटायला येत आहेत. हा पावलांचा आवाज ओळखीचा आहे ना! आपल्या माणसाच्या पावलांचाच काय, त्यांच्या श्वासांचा आवाजही सहज ओळखता येतो. आणि श्रीराम येण्यापूर्वी त्यांची सावली आधीच येऊन पोहोचली सुद्धा! सावली देखील कुणाची, तर श्रीरामांची!

© www.madhaveeghule.com

या सावलीमध्ये देखील त्यांच्या शरीरसौष्ठवाचे दर्शन घडते आहे. किती रेखीव आणि सुडौल आकृति आहे त्यांची! आणि धीरोदात्तपणे पावले टाकण्याची त्यांची लकब त्यांना किती शोभून दिसते आहे ना! कोणत्याही क्षणी ते इथे तुझ्या दालनात येतील बघ सीते! अगं, त्यांच्या या आगमनाच्या कल्पनेनेच तुझ्या बालसुलभ अशा लज्जेला जागृति आली आहे का? त्यांच्या केवळ नामोच्चाराने तुझ्या कायेवर रोमांच फुलले आहेत काय? आता आजची रात्र उलटण्याचाच काय तो अवकाश आहे. उद्या तर सिंहासन सोहळा!

अशी स्वप्ने रंगवतच युवतींचा तो मेळा निघून इतस्तत गेला. पण ही अल्पावधि असणारी रात्र ही काळरात्र ठरणार आहे. हे कोणालाही सांगून देखील खरं वाटलं नसतं. हीच रात्र सर्वच जीवनपटाला कलाटणी देणारी ठरली. आणि रामायण घडले.....

परंतु या अशुभाची चाहूल जाणवून देणाऱ्या काव्यपंक्ती याच गीतात येऊन गेल्या आहेत.

"दृष्ट न लागो आमुचीच गे तुझिया भाग्याप्रती ||"

अशा शब्दांमधून गदिमा भावी संकटाची सूचना अत्यंत सहजतेने देतात. मात्र त्या शब्दांमुळे कुठेही या आनंदाच्या उत्सवाला कुठेही बाधा आलेली नाही.

या गीतातील शब्दांना तशीच आनंदवर्धिनी चाल ही बाबूजींनी लावली आहे. हे गीत, म्हणताना, गाताना, ऐकताना आपल्याही मनात आनंदाची कारंजी थुई थुई नाचू लागतात— पाय थिरकू लागतात. स्वतःभोवती एक हलकीशी गिरकी घ्यावीशी वाटते आणि मुखातून अगदी सहजच शब्द बाहेर येतात— आनंद सांगू किती सये ग!

या गीतातील भाव आनंदी आहे. त्यातील जिव्हाळा, प्रेम ठळकपणे जाणवतो. या गीताच्या भावाला सुरेख स्वर देणाऱ्या त्याकाळच्या प्रसिद्ध गायिका- सुमन माटे, जानकी अय्यर, उषा अत्रे, योगिनी जोगळेकर, सौ जोग----

© www.madhaveeragniveer.com

(७) जेथे राघव तेथे सीता - - -

२८ मार्च २०२१

॥ श्रीराम ॥

अघटितघटना परीयसी माया। असं आचार्यांनी त्यांच्या मायापंचक स्तोत्रामध्ये मायेचे यथार्थ वर्णन केले आहे आणि ते किती सत्य आहे याचा प्रत्यय आपण आयुष्यात वारंवार घेत असतो. सत्य हे कल्पितापेक्षाही फारच विचित्र असते. आपल्या आजवरच्या अनुभवांवरून आपण एखाद्या व्यक्तीविषयी, प्रसंगाविषयी काही आडाखे बांधत असतो. बऱ्याच वेळा आपण केलेले अंदाज खरे ठरतातही. पण तरीही कितीतरी वेळा जोरदार दणका बसतो. आपण ज्याचा विचार कल्पनेतही करणार नाही अशा अकल्पित, अनाकलनीय घटना घडतात. हे कसं आणि का घडलं याविषयी विचार करायलाही उसंत मिळत नाही. आपण रंगवलेल्या चित्रातील रंग उडून जातात. अहो रंग तर सोडाच! पण कित्येक वेळा मुळात ते चित्रदेखील शिल्लक रहात नाही. पूर्णपणे उध्वस्त होऊन जातं. चित्राच्या चिंधड्या उडतात. कित्येकदा चित्राबरोबरच्या कागदाचाही पार चुथडा चुथडा होऊन जातो. आणि मग हतबल होऊन या विध्वंसाकडे बघत राहण्यापलीकडे आपल्या हातात काही म्हणजे काही रहात नाही. उरतो तो केवळ निरुपाय। नाईलाज। विवशता।

पण कधी कधी मात्र याच्या अगदी उलटही घडतं बरं का! म्हणजे आयुष्यात अगदी मिट्ट काळोख पसरला असताना, कुठूनही आशेचा किरण येण्याची शक्यता नसताना अचानक लख्ख प्रकाश पडतो. नवचैतन्य बहरून येते. वैभवाची सौख्याची बरसात होते. काळोख्या जीवनाला अचानकच नवी दिशा मिळते. आनंद ओसंडून वाहू लागतो आणि मग नकळतच त्या विश्वंभरासमोर हात जोडले जातात. डोळ्यातून अश्रू झरझर वाहू लागतात. अंगावर रोमांचाची फुले उमलतात. त्याच्या अपार कृपेची प्रचीती येते. आणि हीच तर माया आहे.

त्या परब्रह्माचीच एक अद्वितीय शक्ती म्हणजे माया। ही माया क्षणाक्षणाला रंग बदलत असते.

तिच्याबद्दल अंदाज वर्तवणे कुणालाही शक्य नाही. अगदी पुढच्या क्षणाला काय घडणार आहे, याविषयी काही भाकीतच करता येत नाही.

Life is unpredictable & that's the beauty of it. कारण त्यामुळेच तर अनिश्चिततेला आनंद अनुभवता येतो. पुढच्या क्षणाविषयी उत्सुकता टिकून राहते. नावीन्य वाटतं. ओढ वाटते आणि म्हणूनच जगण्यात गंमत वाटते. पण कधी कधी मात्र हात्याचे नकोसं होऊन जातं. चित्रामध्ये हौसेहौसेने भरलेले रंग फिसकटून जातात. ज्या आनंद सोहळ्याची अधीरतेने वाट पाहिली. मनापासून तयारी केली त्याला गालबोट लागतं म्हणजे आनंदाच्या परिमाणामध्ये केवळ उणेपणा येतो नाही, तर सगळा आनंद झाकोळून जातो आणि अतीव दुःखाचे, शोकाचे, विषादाचे अगदी नकोनकोसे वाटणारे सावट संपूर्ण आसमंत व्यापून टाकते.

आपण सारेजण अगदी सामान्य प्रापंचिक! आपल्या आयुष्यामध्ये कितीतरी वेळा असे अपमानाचे, दुःखाचे, फसवणुकीचे, प्रियजनांच्या विरहाचे प्रसंग अनपेक्षितपणे समोर आले आहेत. परंतु अगदी महान व्यक्तींच्या आयुष्याला देखील अशी कलाटणी मिळालेली आपण जाणतो. इतिहासात, पुराणात असे कितीतरी दाखले आहेतच की!

अगदी ययाति काय, देवयानी काय किंवा शर्मिष्ठा काय यांच्या आयुष्यात तर अशा अनपेक्षित, अकल्पित घटनांची सरमिसळ आहे. पण हे झाले - राजे महाराजे यांच्या बाबतीत! शेवटी ती देखील माणसंच!

पण अगदी देवादिकांच्या, अवतारांच्या बाबतीत देखील असं घडतं. आणि याची आपल्यालाही पूर्ण जाणीव आहे. आणि त्यांनी त्या त्या वेळी, त्या त्या प्रसंगाला कसं धीरोदात्तपणाने तोंड दिलं, कठीण प्रसंगावर मात कशी केली याचा आदर्शही आपल्या समोर ठेवला जातो. आणि मूगल्यांच्यावर गुदरलेल्या कठीण प्रसंगानंतर आपल्याला आपली संकटे अगदी क्षुल्लक वाटायला लागतात.

तसं नसतं, तर मग त्या राजवाड्यात उद्या होणाऱ्या राज्याभिषेकाची सज्जता इतक्या धामधुमीत सुरु होती. जेव्हा सगळ्यांचाच आनंद अगदी शिगेला पोहोचला होता अशा राजमंदिरावर दुसऱ्याच दिवशी इतकी शोककळा पसरली नसती. त्या महालात सनई चौघड्यांचे नगारा नौबतीचे स्फूर्तिदायक सूर दुमदुमणार होते, तिथे आज दबक्या आवाजातले हुंदके ऐकू आले असते. जिथे शुभशकुनांमुळे वातावरण मंगलमय होणार होते तिथे, त्या दालनावर अशुभाची कृष्णछाया पडली नसती.

मग एका रात्रीत हे असं काय घडलं? या आनंदसोहळ्याला कुणाची दृष्ट लागली? सुगंधित अशा गुलाबपुष्पांनी सजलेल्या शोभिवंत ताटव्यातून विखारी अशा कृष्णसर्पाने फूत्कार करावा तसं हे कल्पनेतही न सामावणारं संकट अवघ्या राजकुळाला राजपरिवाराला वेढून राहिलं होतं.

खरं तर, रामाला राज्याभिषेक होणार या कल्पनेने तिन्ही राण्या आनंदल्या होत्या. कौसल्या, कैकयी आणि सुमित्रा! परंतु अशा वेळी मंथरेने कैकयीच्या मनात जहर कालवलं. गोडगोड बोलून कैकयीच्या अंत:करणात मत्सराचा शिरकाव केला. आणि पूर्वी मिळालेल्या दोन वरांची आठवणही करून दिली. भरताला राजसिंहासन आणि रामाला १४ वर्ष वनवास असे दोन वर मागण्याचा आग्रह धरला. कैकयीची ही अनपेक्षित व विचित्र मागणी ऐकून राजा दशरथ शोकाकुल झाले. त्याने राणीला समजावून सांगण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु स्त्रीहट्टापुढे त्यांचं काहीच चाललं नाही. हतबल झालेल्या राजाला शेवटी विवशतेने मान तुकवली. हा निर्णय स्वतः कैकयीनेच श्रीरामांना सांगितला. राजा दशरथाचं मौन हीच त्यांची संमति आहे असं मानून पित्याच्या आज्ञेचं पालन करण्यासाठी श्रीराम सज्ज झाले. हळूहळू ही वार्ता राजवाड्यात पसरली. कौसल्या व सुमित्रेच्या शोकाला तर पारावार राहिला नाही.

© www.madhaveeraghuveer.com

| JULY | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

परंतु श्रीराम अविचल होते. त्यांनी आपल्या सौम्य, शांत, मृदु बोलण्याने त्या दोन्ही मातांच्या शोकावेगावर फुंकर घातली. आपल्या प्रिय पत्नीचा — सीतेचा निरोप घेण्यासाठी राम तिच्या मंदिरात निघाले असताना वाटेत लक्ष्मणाची भेट झाली. ही वार्ता ऐकून लक्ष्मण संतप्त झाला होता — रामाविण राज्यपदी कोण बसतो? असे उद्गार काढत होता. आपल्या पित्याविषयी राग व्यक्त करून श्रीरामांना तो बजावत होता ---

जर तुझा वनवासात जाण्याचा निर्धार कायम असेल तर मला सोडून जायचं नाही. हा माझा हट्ट आहे. मी आपल्याबरोबर येणारच. त्याला थोडसे शांत करून श्रीराम सीतेच्या महालात आले. तिलाही हा घडलेला सारा प्रकार कथन करून वनवासात जाण्यासाठी तिचा निरोप घेण्यासाठी आल्याचे सांगितले ---

'निरोप' हा शब्द ऐकूनच सीता म्लानपणे हसली. खिन्न झाली. दोनदा तीनदा हाच शब्द मनाशी घोळवत पुन्हा पुन्हा उच्चारू लागली आणि म्हणू लागली ---

निरोप कसला माझा घेता
जेथे राघव तेथे सीता ॥ धृ. ॥

आज इतक्या वर्षांनंतर देखील मराठी साहित्यामध्ये पति-पत्नींच्या नात्यातील रेशमी अनुबंध निर्देशित करायचे असतील तेव्हा किंवा त्यांच्यातील अद्वैत अधोरेखित करायचे असेल, तेव्हा आजही ही शब्दयोजना एखाद्या सुविचारासारखी, सुभाषितासारखी वापरली जाते. पती पत्नीच्या नात्यातील जवळीक, ओलावा — जी पानभर मजकुरातून वाचकांपर्यंत पोहोचवता येईल ती केवळ या वाक्प्रचारातून 'जेथे राघव तेथे सीता' यामधून सूत्ररूपाने मांडता येते.

ज्या मार्गी हे चरण चालती
त्या मार्गी मी त्यांच्या पुढती
वनवासाची मला न भीती
संगे आपण भाग्यविधाता ॥ १ ॥



© www.madhavgeeraghuveer.com

या कडव्यामध्ये शब्दांची उलटापालट झाली आहे, असं वाटेल कदाचित। वास्तविक खरी पतिव्रता स्त्री ही पतीच्या पाठोपाठ असायला हवी. आणि इथे तर सीता म्हणतेय की त्या मार्गी मी तुमच्या पुढती।

परंतु इथे तिने श्रीरामांचा अधिक्षेप केला नाहीये तर यातही तिचा विचारी स्वभाव दिसून येतो. हा चरण नीट समजावून घ्यायला हवा. तिचं असं म्हणणं आहे की कदाचित तुम्हाला वनवासाचे थोडेतरी कष्ट वाटत असतील. पण त्या बाबतीत म्हणजे सोशिकपणाच्या बाबतीत मात्र मी तुमच्यापुढे एक पाऊल टाकायला तयार आहे. मला त्या वनवासाची यत्किंचितही भीती नाही. कारण माझा भाग्यविधाता माझ्यासोबत आहे. असं असेल तर मग मला कधिकाळाचीही भीती नाही आणि त्यामुळेच 'जेथे राघव तेथे सीता' यात कोणताही संदेह नाही.

संगे असता नाथा आपण
प्रासादाहून प्रसन्न कानन
शिळास म्हणतील जन सिंहासन
रघुकुल शेखर वरी बसता ॥२॥

तुम्ही माझे नाथ आहात. स्वामी आहात. आपण जर माझ्या समवेत असाल तर या राजमंदिरापेक्षा देखील ते कानन मला निश्चितच अधिक प्रसन्न वाटेल. इथेदेखील जंगल, अरण्य, वन, रान असे शब्द न वापरता गदिमांनी 'कानन' या शब्दातून अरण्याची भीषण बाजू काढून टाकून त्याची सुखावह बाजू समोर आणली आहे. शेवटी सुख काय किंवा दुःख काय? ते कशावर अवलंबून असतं तर ते आपल्या माणसांवर! इथे अगदी राजप्रासादामध्ये तुमच्यावाचून दिवस कंठायचे म्हणजे वनवासापेक्षा देखील दुःसह अवस्था! आणि तेच जर का अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील जर तुमचा सहवास लाभणार असेल तर तो वनवास देखील सुखावह असणार आहे. त्या वनाचे नंदनवन होणार आहे.

© www.madhavelaghuveer.com

नाहीतरी रघुकुळाचे भूषण असणारे असे माझे पती एखाद्या साध्याशा शिळेवर जरी बसले तरी त्या शिळेला देखील राजसिंहासनाचे वैभव प्राप्त होईल, नसेना का मौल्यवान धातु, रत्नांनी जडवलेले सिंहासन! परंतु आपल्या सैन्याच्या पराक्रमाच्या प्रभेने शिळादेखील लखलखु लागेल. शौर्याच्या परंपरेतील आपण सर्वोच्च शिखर आहात. इथे देखील गदिमा 'जनसिंहासन' हा लोकशाहीचा गौरव करणारा शब्द योजितात.

वनी श्वापदे क्रूर निशाचर
भय न तयांचे मनसी तिळभर
पुढती मागे दोन धनुर्धर
चाप त्या करी पाठीस भाता ॥३॥

सीतेने कधी प्रत्यक्ष वन पाहिले देखील नव्हते. मात्र त्याविषयी तिला ज्ञान होते. गर्द झाडीमध्ये कितीतरी श्वापदे राहतात. तसेच असुरांचे समुदायदेखील रात्री-बेरात्री दुष्कृत्य करण्यासाठी फिरत असतात. कधी कोण कुठून हल्ला करेल हे काही सांगता येत नाही. त्यामुळे सदैव सावध रहावे लागते. इथे राजवाड्यात आपल्या दिमतीला अनेक दास दासी हजर असतात. कोणतीही गोष्ट मागितली की तत्काळ मिळू शकते. परंतु वनवासामध्ये अखंड सावधानता बाळगावी लागते. असे मी ऐकलंय पण त्याची काळजी मी कशाला करु? मला त्या कुणाचेच भय वाटत नाही. कारण माझे रक्षण करण्यासाठी दोन दोन धनुर्धर माझ्या मागे-पुढे असणार आहेत. लक्ष्मणही रामासमवेत असणार आहेत ही वार्ता सीतेच्या कानावर आली असावी. किंवा त्यांच्या बंधुप्रेमामुळे सीतेने ही गोष्ट गृहीत धरली असावी. आणि हे धनुर्धर कसे आहेत? तर -- सासितूणधनुर्बाणम्। हातामध्ये सज्ज असे धनुष्य आहे, तर अक्षय आणि अक्षुण्ण अशा बाणांनी युक्त असा भाता आहे. असे दोन धनुर्धारी असताना मला चिंता करण्याची गरज काय!

© www.madhaveeraghuveer.com

ज्या चरणांच्या कामासाठी । दडले होते धरणीपोटी ।
त्या चरणांच्या विरह शेवटी । काय दिव्य हे मला सांगता ॥१८॥

श्रीराम हे साक्षात विष्णूचा सातवा पूर्णावतार आहेत हे आपण सारे जाणतो. परंतु या रामावतारप्रसंगी त्या कालखंडामध्ये, त्या प्रदेशामध्ये जे जे कोणी त्यांच्या सहवासात आले होते. ते देखील कोणी सामान्य नव्हते. तर ते सगळे पुण्यात्मे होते. म्हणजे राजा दशरथाला जो रघुपित्याचा मान लाभला त्यामागे त्याचे पूर्वसंचित होते. तिन्ही माता, तिन्ही बंधु, राजदरबारातील मंत्री, अमात्य, सेवक या सर्वांचे पुण्य फळाला आले म्हणून त्यांना त्या काळी त्या ठिकाणी जन्म मिळाला. अगदी रामसेनेमध्ये सामील झालेले वानर देखील पुण्यात्मे होते. सलोकता, समीपता या मुक्तिसुख त्यांना हे भाग्य लाभले होते. अगदी सेतुबंधनासाठी मदत करणारी लहानशी खार असो, जटायु असो, संपाती असो किंवा अगदी श्रीरामांचा स्पर्श लाभलेले किडा मुंगी असोत. खरोखर त्यांचे भाग्य थोर म्हणून त्यांना श्रीरामांचा सहवास, स्पर्श लाभला. मग या जानकीचा तरी अपवाद कसा असणार? ती काही केवळ योगायोगाने श्रीरामांची पत्नी झाली नव्हती. तर तिच्या स्वत:च्या पुण्याचा साठा फार मोठा होता. श्रीराम हे जर परब्रह्म असतील तर ती त्यांची शक्ती माया होती. हा विवाह शिवशक्तीचा होता. हे माया ब्रह्माचे मीलन होते. या सर्व घटनांच्या मागे विधात्याचा काहीतरी विशिष्ट हेतू असतो. इक्ष्वाकु कुळामध्ये श्रीरामांचा जन्म झाल्यावर योग्य वेळी भूमातेमधून ही भूमिकन्या प्रकट झाली. हे सगळे असेच घडणार होते. म० वाल्मीकींनी हे संपूर्ण रामायण आधीच ग्रथित केले होते. धरणीमध्ये दडलेली ही तेजस्वी कन्या ज्या पूर्णपुरुषाची प्रतीक्षा करत होती. ते अवतरल्यावर तीही राजा जनकाच्या मिथिला नगरीत अवतरली. आणि त्यांच्याशी विवाह करून ती इथे अयोध्येत आली होती



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

त्याच चरणांचा आता विरह सहन करायचा? इतकी मोठी शिक्षा मला नका ना करू! हे दिव्य मला सहन करता येणार नाही. मला आपल्याबरोबर येण्याची अनुमती द्या ना नाथा!

कोणासाठी सदनी राहू? का विरहाच्या उन्हात न्हाऊ?
का भरतावर छत्रे पाहू? दास्य करू का कारण नसता ।।धृ।।

आपल्याविना हे राजवैभव मला शून्यवत आहे. या साऱ्या वैभवाला आपल्याशिवाय काहीच अर्थ नाही. मग मी कुणासाठी इथे राहायचं? माझ्या जीवीचा जिव्हाळा माझ्या समोर असेल तर त्याच्यामुळेच इतर गोष्टींना शोभा येते परंतु जसे मुख्य पदकाविना माळेला सौंदर्य प्राप्त होत नाही. त्याचप्रमाणे तुम्ही नसताना या सदनात राहण्यात काहीच अर्थ नाही. उलट या विरहाच्या झळांची काहिली मी कुठवर सहन करणार? प्रत्येक वेळी मी सुखोपभोग घेत असताना आपण मात्र कोणत्या संकटांना तोंड देत आहात या विचाराने प्रत्येक वेळी मिष्टान्नाचा घास माझ्या मुखात अडकेल. दासी जेव्हा विंझणवारा घालत असतील तेव्हा उन्हाच्या तप्त झळांनी म्लान झालेले तुमचे मुख आठवून मला तो शीतल वारादेखील नकोसा होईल. दगडावर, गवतावर विसावलेला तुमचा देह जेव्हा माझ्या कल्पनेने मी रेखाटेन तेव्हा ती मऊ मऊ शय्यादेखील मला काट्यांप्रमाणे टोचू लागेल, हो नाथा! आणि शिवाय या विरहाग्निमध्ये भरीस भर म्हणून की काय, पण जेव्हा राजसिंहासनावर अधिष्ठित अशा भरतावर छत्रे, चामरे मला पहावी लागतील, तेव्हा माझ्या काळजात कळ आल्याशिवाय राहणार नाही. मला कोणी कुणी अगदी दासी म्हणून वागवणार नाही. पण तरीही ज्या सिंहासनावर माझे नाथ शास्ता म्हणून असणार होते, त्या सिंहासनावर भरताला पाहणे म्हणजे स्वतःला दासी मानण्यासारखेच आहे. हे नाही मला सहन होणार...

खरं तर रामायणातील अयोध्याकांडाच्या २६व्या भागात रामाने सीतेला काही बोधपर गोष्टी सांगितल्या आहेत. त्यात तो म्हणतो, "माझ्याशिवाय इथे तू एकटी रहात असताना भरतासमोर माझी स्तुति करू नकोस. कारण अधिकार धारण करणाऱ्यांना दुसऱ्याची स्तुति सहन होत नाही. अशा वेळी सीतेच्या मनात येते की माझ्या पतीची योग्य अशी स्तुति करण्यासाठी, शब्दांना ओठाबाहेर घेण्यासाठी मला भरताची परवानगी घ्यावी लागणे म्हणजे भरताचे दास्यत्व पत्करण्यासारखेच आहे.

का कैकयी वर मिळवी तिसरा/का आपुल्याही मनी मंथरा
का छळिता मग वृथा अंतरा/एकटीस मज का टाकुनि जाता ||

कदाचित आणखी काही इच्छापूर्तिसाठी कैकयी माता तिसराही वर मागू शकेल. आपण तर सत्त्वगुणाची मूर्ति आहात. आपल्याही मनात काही किल्मिष, काही संदेह तर नाही ना आला? यापुढील अनेक शतके मंथरा हा शब्द कदाचित मत्सराला, असूयेला समानार्थी म्हणून वापरला जाईल. आणि खरोखरच 'मंथरा' हे विशेषनाम अगदी बदनाम झाले आहे. दुसरं कुणी मनात शिरणे या अर्थी मंथरा हा शब्द विशेषत्वे वापरला जातो. आता तुम्ही मला नाकारून माझ्या अंतःकरणाला का बरं वेदना देत आहात? मला एकटीला टाकून नका ना जाऊ!

विजनवास या आहे दैवी/ठाऊक होते मला शैशवी।
सुखदुःखांकित जन्म मानवी/दुःख सुखाचे प्रीति लाभता ||

सीता ही काही कोणी सर्वसामान्य स्त्री नाही. ती दैवी शक्ती आहे. ती महामाया आहे. पुढे घडणाऱ्या अशुभ घटनांची चाहूल तिला आहेच. अगदी बालपणीच जेव्हा ती शिवधनुष्याशी

© www.madhaveeraghuveer.com

थोडा-थोडा करून लीलया खेळत असे तेव्हाचे तिला आपला भविष्यकाळ ठाऊक होताच. आपल्या नशिबात वनवास आहे याची तिला फार पूर्वीपासूनच कल्पना होतीच परंतु त्याचा निश्चित काळ माहिती नव्हती. आनंदाच्या अगदी सर्वोच्च शिखरावर असताना असा काही वज्राघात होईल याची मात्र तिला अजिबात कल्पना नव्हती. श्रीराम जरी साक्षात विष्णू आणि सीता म्हणजे लक्ष्मी असली तरी जेव्हा हे अवतार मानवी स्वरूप धारण करतात तेव्हा त्यांना माणसाप्रमाणेच विवश होऊन सुखदुःखे भोगावी लागतात. ती सुखदुःखे टाळता येत नाहीत. कारण प्रारब्धाचे भोग हे भोगूनच संपवावे लागतात. हे जरी खरं असलं तरी त्याची तीव्रता (Intensity) किंचित कमी करता येते आणि दुःख भोगायला माझी ना नाहीये. परंतु त्या दुःखावर फुंकर घालायला जर आपण माझ्या समवेत असाल तर त्या सहवासाचा लोभ मात्र निश्चित आहे.
म्हणूनच म्हणते — जेथे राघव तेथे सीता।

तोडा आपण मी न तोडते। सात जन्मांचे आपुले नाते।
वनवासाती मीही येते। जाया पति का दोन मानता।।

पुरुष आपल्या पत्नीला आपले उत्तरदायित्व मानतो तर स्त्री ही पतीमध्ये समर्पित होत असते. पाणिग्रहणप्रसंगी पतीने शपथ घेतलेली असते. धर्मे च अर्थे च कामे च नातिचरामि। या तिन्ही बाबतीत मी तुझा अनादर करणार नाही. उल्लंघन करणार नाही. तुला सुखात ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीन. पत्नीच्या डोळ्यातील अश्रू हे पतीला दूषणास्पद वाटतात. म्हणूनच इथेदेखील सीतेने राजवाड्यातील सुखोपभोग सोडून उगीच माझ्याबरोबर वनवासातील कष्ट का बरं सोसायचे? असा रामाचा प्रश्न आहे. परंतु त्यावर सीतेचे उत्तर असे आहे की, तुम्हाला नाते तोडायचे असेल तर तोडू शकता पण मी तर माझे जीवन तुम्हाला

© www.madhaveeraghuveer.com

समर्पित केले आहे त्यामुळे माझी गोष्टच वेगळी आहे. अगदी आजच्या हिंदी गाण्याच्या ओळीत सांगायचं झालं तर—

मेरी बात और है। मैंने तो मुहब्बत की है।

आणि आपलं नातं किंवा एकूणच प्रकृति - पुरुष किंवा शिव - शक्ती हे अद्वैतच आहे. हे अर्धनारीनटेश्वराचे रूप आहे. ही दोन्ही रूपे परस्परांना पूरकच आहेत. एकाशिवाय दुसरे अपूर्ण आहे. तेव्हा वनवासात येण्यापासून मला अडवू नका. जेथे राघव तेथे सीता॥

पतीच छाया पतीच भूषण। पतिचरणांचे अखंड पूजन।
हे आर्यांचे नारी जीवन। अंतराय का त्यात आणिता॥
॥९॥

आणि मी काही हे जगावेगळं करत नाहीये. याला आपल्या आर्य परंपरेची साक्ष आहे. पती वृक्ष असेल तर पत्नी लता आहे. पति सागर असेल तर पत्नी सरिता आहे. पतीची अस्मिता फुलवणे हेच तर आर्य स्त्रीचे आद्य कर्तव्य आहे. अशी ही सच्छील पतिव्रता स्त्री ही पतिचरणांची सेवा करण्यातच भूषण मानते. यातच नारीजीवनाची कृतार्थता आहे. यामध्ये कोणताही त्याग नाही. नामुष्की नाही. तर समर्पित भावना आहे. या माझ्या स्त्रीसुलभ भावनेमध्ये आपण का बरे अंतराय आणता? मला दूर नका ना लोटू! जेथे राघव तेथे सीता---

मूक राहता का हो आता। किती हा ठेवू चरणी माथा।
असेल चुकले कुठे बोलता। क्षमा करावी जानकीनाथा॥१०

सीतेचा हा जगावेगळा हट्ट ऐकून श्रीरामांना काय बोलावे हे सुचेना. वीणेच्या दोन तुंब्यांमधून जसा एकच ध्वनि उमटावा तसेच त्यांचे झाले होते. तिच्या अंतरीचे हृद्गत त्यांना उमजत नव्हते असे थोडेच आहे? त्या दोघांचे नाते असे होते की शब्दांखेरीज न उच्चारता एकमेकांच्या

© www.madhaveeraghuveer.com

मनातील भावना दुसऱ्यापर्यंत पोहोचत होत्या.---
त्यामुळे श्रीरामांनी तिचे मनोगत ओळखले होते.
काही अंशी ते त्यांना पटलेही होते. परंतु ही कोमलांगी
सीता त्या वनवासाचे कष्ट कसे सहन करेल?
माझ्याबरोबर उगाचच तिने हे कष्ट का सोसायचे असं
विचारमंथन सुरू असल्यामुळे ते मूक झाले होते. खरे तर
बोलण्यासारखं खूप होतं, परंतु शब्द फुटत नव्हते.
आणि सीतेच्या मात्र मनात येत होतं की माझे काही
चुकलं तर नाही ना? भावनेच्या भरात मी काही
अनुचित तर बोलून गेले नाही ना? कारण कोणतीही
भावना अनावर झाली असता मनात नसताना देखील
चुकीचे शब्द येऊ शकतात. असा जर माझ्या हातून
काही प्रमाद घडला असेल तर जानकीनाथा, आपणच
मला क्षमा करा. माझे सर्व अपराध पोटात घाला.---
पण आपणासमवेत वनामध्ये येण्याची अनुमती मला द्या..
नाथा! जेथे राघव तेथे सीता!

मधुवंती रागात गुंफलेले हे गीत सुप्रसिद्ध
ज्येष्ठ गायिका - माणिक वर्मा - यांनी गायिले आहे.
त्यांच्या आवाजातील ताकदीतून त्यांनी सीतेची
तगमग, तिची विनवणी, तिचा निर्धार, आर्तता प्रकट
केली आहे.

आजही पतिपत्नीच्या अतूट नात्याचा विश्वास
दर्शविताना 'जेथे राघव तेथे सीता' हे चार शब्द
सगळ्या कोवळ्या भावना व्यक्त करतात.
हे आहे गदिमांचे शब्दसामर्थ्य!

||श्रीराम जयराम जय जय राम||

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

॥ श्रीराम ॥

राज्याभिषेक प्रसंगी राजा रामाची वामांगी म्हणून विराजमान होताना शोभून दिसतील अशी राजभूषणे काढून ठेवली होती. त्यांचा आता काहीच उपयोग नाही त्यामुळे ते सर्व उंची वस्त्रालंकार इतर नगरजनांना दान देऊन त्या सर्व वैभवाचा त्याग करून ही जनकनंदिनी श्रीरामांच्या समवेत वनामध्ये जाण्यासाठी सज्ज झाली.

निरोप घेण्यासाठी आलेल्या पतीला निरोप न देता अत्यंत मृदु पण तरीही निश्चयी स्वरात जानकीने सांगितले जेथे राघव तेथे सीता! तुमची ही कांता तुमच्या समवेत कांतारामध्ये येणारच! किंबहुना तुम्ही जिथे जिथे जाल तिथे तिथे ही जानकी तुमच्यासवे असेलच. सीतेची ही पतिपरायणता आणि लक्ष्मणाचे बंधुप्रेम उल्लंघून रामाला काही जाता येईना. राजवाड्यातील सर्वांनीच मन घट्ट केले आणि वल्कले धारण करून वनवासाला निघालेल्या राम - लक्ष्मण - सीता यांना निरोप देण्यासाठी अवघी अयोध्यानगरी लोटली. अयोध्येच्या सीमेपर्यंत त्यांना पोहोचवण्यासाठी सुमंताने रथ सज्ज केला.

थांब सुमंता थांबवि रे रथा! अशा प्रजाजनांच्या विनवणीमुळे मंत्री असणाऱ्या सुमंताच्या कर्तव्यपालनात मात्र कुठेही कसूर झाली नाही. डोळ्यांतील अश्रूंच्या पडद्यामुळे आता रथ धूसर दिसत होता. हळूहळू तो दिसेनासा झाला. मार्गक्रमणा करीत रथ गंगातीरी शृंगवेरपूराला आला. निषादाधिपती गुहाच्या नौकेतून गंगा नदी पार करत असताना गुहाबरोबरच सर्व नावाडी गात होते.

नकोस नौके परत फिरू ग
नकोस गंगे ऊर भरू ॥
श्रीरामांचे नाव गात या श्रीरामांना पार करू ॥
जय गंगे जय भागीरथी।
जय जय राम दाशरथी ॥

नदी पार करून झाली.



© www.madhaveeraghuveer.com

पुढे भरद्वाज मुनींच्या आदेशानुसार चित्रकूट पर्वतावर कुटी बांधून हे तिघेही व्रतस्थ जीवन व्यतीत करू लागले. हे वन कसे होते?

पलाश फुलले बिल्व वाकले
मधुमालक फळभारे लवले

या वनामध्ये निसर्गशोभा होती. डोळ्यांना सुखावणारी नयनमनोहर वर्णाची पुष्पसंपदा होती. कोकिळेच्या व मोरांच्या सुस्वराने कानांना सुखसंवेदना मिळत होत्या. तर किती तरी प्रकारचे मनोहारी सुगंध घ्राणेंद्रियांना संतोष देत होते. फांद्याफांद्यांवर मधाची पोळी लटकत होती. पंचज्ञानेंद्रियांना आल्हाद देणारा हा सृष्टीचा महोत्सव साजरा होत होता. अशा या चित्रकूट पर्वतावर पर्णकुटी बांधून तिघांचा दिनक्रम सुरु झाला.

मात्र तिकडे अयोध्येमध्ये काय परिस्थिती होती? तिकडे अगदी शोकाचे वातावरण होते. सुमंत जेव्हा रिकामा रथ घेऊन अयोध्येकडे परतला, तेव्हा राजा दशरथाचे उरले सुरले अवसान गळून पडले. काहीतरी चमत्कार होईल आणि कदाचित माझा राम परत येईल अशी जी वेडी आशा मनाशी बाळगली होती ती आता पूर्णपणे मोडून पडली. कंठ वारंवार दाटून येत होता. डोळ्यांमध्ये अश्रू होते. भ्रमिष्टाप्रमाणे अवस्था झाली होती. हातवारे करीत काहीतरी बोलण्याचा प्रयत्न राजा करत होता. पण तोंडातून नीट शब्द उमटत नव्हते.

सर्वांनाच चिंता वाटू लागली. अशातच तोल जाऊन महाराज दशरथ जमिनीवर कोसळले. धडपडत पुन्हा उभे राहिले. शोक प्रगट करू लागले. सर्वच अवसान आवरून बोलू लागले. सर्व बाजूंनी अंधार दाटून आला होता. शरीर अगदी गलितगात्र झाले होते. अशा अवस्थेत महाराजांना आपल्या हातून घडलेला श्रावणबाळाचा वध आणि त्याच्या आईवडिलांची शापवाणी पुन्हापुन्हा आठवत होती.



©www.madhaveeraghulveer.com

वयस्कर मातापित्यांच्या दुःखाची तीव्रता आज जास्त प्रकर्षाने जाणवत होती. त्यांच्याप्रमाणेच मीही पुत्रवियोगाने या जगाचा निरोप घेणार हे सत्य आज अंतःकरण पोखरत होते. मन शोकाकुल झाले होते.

ज्या रामाने माझ्या मनाला केवळ आनंदच दिला आहे, त्या रामाला वनात पाठवण्याचे पातक माझ्याकडून कसे काय घडले? आता राम मला कधी भेटेल? पण नाही. आता ते अशक्यच आहे. चौदा वर्षांचा वनवास संपल्याखेरीज माझा राम काही परत येणार नाही आणि माझी ही जर्जर कुडी या प्राणांना आणखी १४ वर्षे, दिवस काय तर १४ तासही रोखू शकेल असे वाटत नाही.

प्रजाजनहो, मला क्षमा करा, क्षमा करा. असं आर्ततेने विनवत राजा दशरथांनी अत्यंत करुण शब्दात विलाप करत, राम राम म्हणत प्राणत्याग केला. अयोध्यानगरीवर शोककळा पसरली. प्रजाजन व्याकुळ झाले. आता त्यांना कोणीच त्राता राहिला नाही. आजोळी नंदिग्राम येथे असलेल्या भरताला परत आणण्यासाठी दूत पाठवले गेले. मात्र मध्यंतरी घडलेल्या घडामोडी त्याच्यापासून गुप्त ठेवण्यात आल्या होत्या. कदाचित रामाच्या राज्याभिषेकासाठी आपल्याला पाचारण केलं असावं या कल्पनेने, मोठ्या उत्साहाने तो दूतांबरोबर अयोध्येला यायला निघाला. आणि अयोध्येत पाऊल ठेवताच तिथे उदास रूप पाहून मनाशी चरकला. मग कैकयीनेच सर्व वृत्तांत त्याला कथन करून महाराजांचे अंत्यसंस्कार करण्याची आज्ञा त्याला दिली. मनावर दगड ठेवून त्याने सर्व अंत्यविधी पार पाडले. आणि त्यानंतर मात्र मनात धुमसणाऱ्या अंगाराने त्याने कैकयीची कठोर शब्दात निर्भत्सना केली; तिला कुलटा, कुलटा, पापिणी म्हटले. 'माता न तू वैरिणी' असे वारंवार बजावून तिचा धिक्कार केला.....

© www.madhaveeraghuveer.com

अर्थातच तुझ्या या असल्या कृत्यांनी माझ्या मनातील श्रीरामांविषयी असणारा आदरभाव काही कमी होणार नाही हेही ठामपणाने सांगितले. रामाशिवाय हा प्रासाद उजाड आहे. मी रामाला शोधून आणेन. किंवा जिथे कुठे तो असेल तिथे त्याच्या मस्तकावर ठेवीन.

त्यासाठी मी माझ्याबरोबर वेदविशारद व शास्त्रपारंगत असे मुनि आणि आपली चतुरंग सेना घेऊन जाण्याची मी अमात्यांना आज्ञा देत आहे. आता आम्ही तर निघालो. तू मात्र या प्रासादरूपी अरण्यात एकटीच आक्रोश करत बस. अत्यंत वज्राघाती शब्दांनी कैकयीवर वार करून भरत निघाला बरोबर काही अयोध्यावासीही निघाले. कौसल्या व सुमित्राही निघाल्या. श्रीरामांचा शोध घेणे त्यांना काही फारसे कठीण गेले नाही.

ही एवढी मोठी सेना येत असल्याचे लक्ष्मणाने दुरूनच ताडले. धुळीचे मोठाले लोट येत होते. रणवाद्ये दुमदुमत होती. कुणीतरी शत्रु चालून येत असल्याचे वाटल्यामुळे लक्ष्मणाने सुरक्षिततेसाठी सीतेला गुहेकडे जाण्यास व श्रीरामांना धनुष्यबाण घेऊन सज्ज राहण्यास सांगितले. आणि तो स्वतः झाडावर चढून सेनेचे निरीक्षण करु लागला. सेना जसजशी जवळ येऊ लागली तसतसे लक्ष्मणाने भरताला ओळखले पण त्याच्या हेतुविषयी मात्र त्याच्या मनात शंका आली.

युद्धपिपासेने जर आपलाच बंधु आपल्याला शोधत आला असेल तर मीही राजधर्म जपण्यासाठी सज्ज आहे हे त्या भरताला समजू दे. आपल्या ज्येष्ठ बंधुविषयी अपरंपार आदर आणि सीतेच्या रक्षणाची जबाबदारी त्याच्या शब्दाशब्दातून प्रकट होते. त्याचा ठाम आत्मविश्वास त्याच्या देहबोलीतून झळकत आहे. तो भरतावर चाल करून जायच्या तयारीत असताना श्रीरामाने त्याला थांबवले. तितक्यात भरतही तिथे पोहचला.



©www.madhaveeraghuveer.com

त्याने श्रीरामांच्या पायाला घट्ट मिठी मारली. मोठ्या प्रेमभराने रामाने त्याला उठवून आलिंगन दिले आणि अयोध्येतील कुशल विचारले -- भरताने पितृनिधनाची वार्ता सांगितली तेव्हा सर्व आश्रमावर शोकाची छाया पसरली. भरताने देखील याबद्दल दुःख प्रगट करून झाल्या प्रकाराची क्षमा मागितली. आणि श्रीरामांना पुन्हा अयोध्येला चलण्याची व सिंहासनाचा स्वीकार करण्याची विनंती केली. अशा वेळी श्रीरामांनी आपल्या धीरगंभीर वाणीने त्याचे सांत्वन केले आणि त्याच्याबरोबर अयोध्येला परत येणे कसे योग्य ठरणार नाही याची अतिशय तर्कशुद्ध कारणमीमांसा केली. आणि यानिमित्ताने जीवनाचे उदात्त तत्वज्ञान भरताच्या निमित्ताने सर्व मानवजातीला समजावून सांगितले. ते गीत आजही वैदिक तत्वज्ञानाचे सार म्हणून मार्गदर्शक ठरले आहे. त्यातील कितीतरी ओळी आज सुवचनाप्रमाणे वापरल्या जात आहेत. मोजक्या शब्दांमध्ये फार मोठा आशय उलगडून सांगणे हे उत्तम कवीचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे. हे एकच गीत जरी गदिमांनी लिहिले असते तरी ते अजरामर झाले असते इतके या गीताचे माहात्म्य अलौकिक आहे.

दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ||

खरे तर, भरताचा आपल्या आईविषयीचा तीव्र संताप, आपल्या वडिलांची विषयासक्ती, त्यांचा कणाहीन स्वभाव त्याच्या शब्दाशब्दातून व्यक्त होत होता. त्याचा आवाजही अतिक्रोधामुळे कधी कंपित होत होता, तर कधी मुखातून शब्दही उमटत नव्हते. आईला तर आई म्हणायची देखील शरम वाटत होती, अपराधी भावनेने मन ग्रासून गेले होते. अशा वेळी श्रीरामांची मृदु, वात्सल्यपूर्ण आणि मधुर वाणी ऐकून त्या भरताचा श्रमपरिहार, शोकपरिहार

© www.madhavbhave.com

झाला होता. श्रीराम बोलत होते---- अरे भरता! हा सारा दैवाचा खेळ आहे. यामध्ये कोणाचाही दोष नाही. आयुष्य म्हणजे ऊनसावलीचा खेळ आहे. कधी सुख तर कधी दुःख हे पाठोपाठ येणारच.

सुखस्यानन्तरं दुःखं दुःखस्यानन्तरं सुखम् ।
न नित्यं लभते दुःखं न नित्यं लभते सुखम् ॥

आणि सुख हे हवेसे वाटले तरी ते मुद्दाम आणता येत नाही. आणि दुःख हे टाळू म्हटल्याने टाळता येत नाही. आपण सारीच माणसे त्या नियतीच्या हातातील बाहुले आहोत. या मर्त्य जगातील प्रत्येकजण हा पराधीन आहे. विवश आहे. आणि ही पराधीनता अधोरेखित करण्यासाठी गदिमांनी पुत्र मानवाचा अशी शब्दरचना केली आहे. कितीही शूर, पराक्रमी, विद्वान किंवा अधिकारी व्यक्ती असली तरी तो कुणाचा तरी पुत्र आहे. त्या व्यक्तीपेक्षा कोणीतरी श्रेष्ठ, शक्ती आहेच. तो परवश आहे. नियतीपुढे निष्प्रभ आहे.

माय कैकयी ना दोषी नव्हे दोषी तात
राज्यत्याग काननयात्रा सर्व कर्मजात
खेळ चालला हे माझ्या पूर्वसंचिताचा ॥३॥

अरे! भरता! तू आईची निर्भर्त्सना करतो आहेस. तिला दुष्ट, निंदनीय समजतो आहेस. पण लक्षात घे--- या साऱ्या प्रकारात तिची चूक फारच थोडी आहे. अरे! या सगळ्या गोष्टी दैवाधीन असतात. खरे सांगू का, कैकयी मातेचं माझ्यावर निरतिशय प्रेम आहे. परंतु अचानकच हा असूयेचा कली मनात शिरल्याने तिने असा हा सर्वस्वी अनपेक्षित आणि अविश्वसनीय पवित्रा घेतला आहे. किंवा तू आपल्या तातांनाही दोष देऊ नकोस. कैकयीमातेने युद्धप्रसंगी आपल्या शौर्याने पिताश्रींना सहाय्य केले होते हे विसरून चालणार नाही. आणि तातांनीही

© www.madhaveeraghuveer.com

अत्यंत प्रसन्न होऊन तिला दोन वर दिले होते. त्या वरांची आजच तिला आठवण होणे आणि त्यांची पूर्तता करण्यासाठी तिने आग्रह -- अगदी दुराग्रह धरणे हे देखील विधिलिखित आहे. कोणतीही व्यक्ती मुळात वाईट, दुष्ट नसतेच. परिस्थिती तिला तसे बनवत असते. प्रत्येकजण हा नियतीच्या हातातील खेळणे आहे. नियती जसे फासे टाकेल तसतशी कर्मे पराधीन अशा मानवाकडून घडत असतात. त्यामुळे ज्या काही घटना घडल्या -- म्हणजे मला राज्याचा, सिंहासनाचा त्याग करावा लागला किंवा वनवास स्वीकारावा लागला हे विधिलिखितच होते. यात कैकयी मातेचा काहीही दोष नाही. माझेच पूर्वकर्म, पूर्वसंचित या सर्व खेळी करत आहे. जे वाट्याला येईल त्या सर्वांचा आनंदाने स्वीकार करणे एवढेच आपल्या हातात आहे. हे मात्र तू समजून घे आणि झालेल्या घटनेचा शोक नको.

अंत उन्नतीचा पतनी होई या जगात।
सर्व संग्रहाचा वत्सा नाश हाच अंत।
वियोगार्थ मीलन होते नेम हा जगाचा॥२॥

हे संपूर्ण ब्रह्मांड आहे ते मंडलाकार आहे. त्यामुळे यात तसे पाहिले तर कुठेही सुरुवात नाही किंवा शेवटही नाही. किंवा वेगळ्या शब्दात सांगायचे झाले तर जिथे सुरुवात आहे तिथेच अंत आहे. आणि त्यामुळेच जिथे उन्नती आहे, शिखर आहे, परमोत्कर्ष आहे Climax आहे तिथूनच उतरणीला सुरुवात होते. या विश्वातील एकही गोष्ट शाश्वत नाही. कायम टिकणारी नाही. ज्या ज्या वस्तूंविषयी व्यक्तींविषयी, पदार्थांविषयी माणसाला प्रेम वाटते. ओढ वाटते. अनुराग, आसक्ती वाटते ती गोष्ट कायमच आपल्याजवळ असावीशी वाटते. मग ती संपत्ति असो की संतती! सत्ता असो की साम्राज्य! किंवा अगदी घर दार बायकामुले, आप्तस्वकीय, शेतीवाडी, गाडी बंगला या गोष्टी हव्याहव्याशा वाटतात. परंतु या सर्वच गोष्टी नाशिवंत आहेत.



©www.madhaveeraghuveer.com

इदम् म्हणून जे जे काही दाखवता येते किंवा ज्याचा साठा करता येतो त्या सर्व वैषयिक गोष्टी चिरंतन समाधान नाही देऊ शकत. आणि या वस्तूदेखील कायम एकाच्याच हातात राहू शकत नाहीत. त्यांचे हस्तांतरण सतत सुरु असते. कालच्या लक्षाधीश आज भिक्षाधीश होऊ शकतो. हे जीवनाचे कटु सत्य आहे आणि त्यामुळेच जिथे संग्रह आहे तिथे नाशाची बीजे आहेतच. आणि जे वस्तूंच्या बाबतीत तेच व्यक्तींच्या बाबतीत! जिथे मीलन आहे तिथे वियोग असणारच! मग तो कालखंड कमी-जास्त असू शकेल. परंतु हे जीवनाचे कालचक्र सतत फिरत असते. जीवनाचा हा अटळ असा नियमच आहे. किंबहुना वियोग घडण्यासाठीच मीलन होत असते.

जिवासंगे जन्मे मृत्यु जोड जन्मजात।
दिसे भासते ते सारे विश्व नाशवंत।
काय शोक करिसी वेड्या स्वप्नीच्या फळांचा।।

या जगामध्ये केवळ एकच सत्य आहे. - परब्रह्म! बाकी सारा मायेचा पसारा आहे. ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या। त्या एकमेवाद्वितीय ब्रह्माच्या अधिष्ठानावर हा सारा सृष्टीचा खेळ चालतो. अनेक जीव जन्माला येतात, जगतात आणि नष्ट होतात. प्रत्येक जीवाची आयुर्मर्यादा निश्चित आहे. जिवाच्या जन्माबरोबरच त्याचा मृत्युदेखील ठरलेला असतो. जन्म-मृत्यु ही कधीही न तुटणारी जोडी आहे. जो जन्माला आला त्याला मृत्यु आहेच. ही काळ्या पाषाणावरची रेघ आहे. त्या विश्वनियंत्याने आपल्याच शक्तीच्या, मायेच्या मदतीने एक खेळ मांडला आहे तो स्वतः या खेळामध्ये प्रत्यक्ष भाग घेत नाही परंतु अव्यक्त राहून तो सर्व क्रिया करवून घेत असतो. तोच सगळ्यांचा सूत्रधार आहे. परंतु त्याला शोधायला जाव तर तो काही सापडत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

कारण तो मुळी इंद्रियगोचर नाहीच आहे. तो डोळ्यांनी दिसत नाही. कानांनी ऐकू येत नाही. त्याला स्पर्श करता येत नाही. त्याची चव घेता येत नाही. त्याचा वास घेता येत नाही. परंतु त्याच्याशिवाय कशालाच अर्थ नाही. आणि जे जे दिसते, भासते, ऐकू येते, स्पर्शाने जाणवते, स्वादाने समजते त्यापैकी एकही गोष्ट कायमची नाही. चिरकाल नाही. टिकाऊ नाही. चिरंतन/शाश्वत नाही.

आपण मात्र, मोठ्या मोठ्यांच्या हजारो वर्षांच्या गप्पा मारत असतो. आतापर्यंत कितीतरी राजसत्ता आल्या आणि गेल्या. पण टिकल्या कोणीच नाही. अगदी आपल्याला कायमस्वरूपी वाटणारा हिमालयही कधी तरी संपणार आहे. अहो, एवढेच कशाला, चंद्र, सूर्य, ग्रह, तारे या सर्व वस्तुमात्रांना अंत आहे. मग अशा नाशिवंत गोष्टींचा शोक कशाला करायचा? आणि वत्सा, भारता तू तर स्वप्नातल्या फळाची अभिलाषा धरतो आहेस. किंवा त्या फळाच्या गमावल्याचा तू शोक करतो आहेस. अरे हे आयुष्यच मुळी क्षणिक आहे. स्वप्नवत आहे आणि त्या स्वप्नातल्या फळाचा लोभ धरणे हे तर अविवेकीपणाचे लक्षण आहे. जगा आल्यावर जशा स्वप्नातील गोष्टी खोट्या निरर्थक वाटतात ना, तसेच हे सारे विश्व म्हणजे विधात्याला पडलेलं स्वप्न आहे. शोक करू नकोस.

तात स्वर्गवासी झाले बंधु ये वनात।
अतर्क्य ना झाले काही जरी अकस्मात।
मरण कल्पनेशी थांबे तर्क जाणत्याचा ॥४॥

सर्व गोष्टी या चक्रनेमिक्रमाप्रमाणे घडतच असतात. जीवनाचे हे रहाटगाडगे फिरतच असते. एखादे गाडगे कधी सर्वांत वर असणार तर पुढच्याच क्षणाला ते अगदी तळाला जाऊ शकते. हा सृष्टीचा नियम आहे



© www.madhaveeraghuveer.com

आपल्या प्रिय व्यक्ती आपल्याला नेहमीच हव्याहव्याशा वाटतात. त्यांचा सहवास आपल्याला अधिकाधिक लाभावा असेही वाटते. परंतु हे योग्यही नाही आणि शक्यही नाही, कारण प्रत्येकाचा कालखंड भिन्न भिन्न असणार. कुणी पुढे जाणार तर कोणी मागे रेंगाळणार. आपले तात स्वर्गवासी झाले ही घटना अत्यंत दुःखद आहे आणि या साऱ्या घटना अनपेक्षित, अचानक झाल्यामुळे त्यांचा धक्का बसणेही स्वाभाविकच आहे. पण यात अतर्क्य किंवा असंभव असे काहीच नाही. कधी ना कधी हे घडणारच होते. हे सत्य आपल्याला पचवायलाच हवे. जिवलगांचा मृत्यू हा दुःख देणारा असला तरी तो अटळ आहे, अपरिहार्य आहे.

आणि म्हणूनच मृत्यूसमोर कोणाचीही कोणतीही टेर चालत नाही. त्याला सामोरे जावेच लागते. त्याच बोलावण्याला आव्हान कोणाच्याही सबबी चालत नाहीत.

तिथं मग माणसाचे रूप, वैभव, सत्ता, पराक्रम, अधिकार यापैकी काही म्हणजे काही कामाला येत नाही आणि विवेकी पुरुष हे जाणतात. मृत्यूची अपरिहार्यता त्यांनी मान्य केलेली असते. त्यामुळे मृत्यूपुढे कोणाचाही युक्तिवाद चालत नाही. सगळं जग या मरणकल्पनेशी येऊन थांबतात.

जरामरण यातून सुटला कोण प्राणिजात।
दुःखमुक्त जगला का रे कुणी जीवनात।
वर्धमान ते ते चाले मार्ग रे क्षयाचा ।।धृ।।

जीवन हे अकल्पित, अनाकलनीय घटनांनी भरलेला ~~आहे~~ चित्रपट आहे. अनिश्चितता हा याचा स्थायीभाव आहे. कोणालाच भविष्याचा अचूक वेध घेता येत नाही (एवढंच नाही तर अगदी उद्या काय घडेल याची शाश्वती देता येत नाही. परंतु तरीही एक गोष्ट शाश्वत-प्रतिशाश्वत सत्य आहे आणि ती म्हणजे प्रत्येकाला मृत्यू आहेच. आहे. कुणाला अल्पायुष्य लाभेल तर कुणाला दीर्घायुष्य | कोणाला सहजगत्या वेदनारहित मृत्यू असेल तर कुणाला अंथरुणावर खितपत पडावं लाग -

© www.madhaveeraghuveer.com

कुणी साथीच्या रोगाला बळी पडतील तर कुणी अचानक अपघातात मृत्युच्या कचाट्यात सापडतील. पण मृत्यु नाही असा कुणीही नाही एकही प्राणिजात नाही. कासवाचे आयुष्य ५०० वर्षांचे असेल तर फुलपाखराचे जेमतेम १५ दिवसांचे पण मृत्युची घटका भरल्यावर प्रत्येकाला जावे लागतेच.

आज जरी मृत्युच्या वेदनांचा आपल्याला परिचय नसला तरी लहान मोठी दुःखे आयुष्यात भेडसावत असतात. नाहीतरी सुखदुःखाच्या उभ्या आडव्या धाग्यांचे वस्त्र म्हणजेच तर जीवन आहे. आणि त्यामुळेच तर आयुष्याला चव आहे। बी जमिनीत रुजते. त्याला कोंब फुटतो. त्यातून दोन पाने वर येतात. त्याचे रोप होते. मग झुडूप होते. तरु होतो. वृक्ष होतो आणि एक ना एक दिवस उन्मळून पडतो. ज्या ज्या गोष्टीला वाढ आहे त्याला नाश निश्चित आहे. प्रत्येक जीव हा सहा विकारांमधून मार्ग काढत असतो अस्ति - जायते - विपरिणमते - वर्धते - अपक्षीयते - प्रणश्यति आणि जिथे संपले असे वाटते तिथे पुन्हा नवीन सुरुवात होते. फळ ही वृक्षाची सर्वोच्च किंवा अंतिम अवस्था नाही तर बीज ही वृक्षाची परिपूर्ति आहे. कारण बीजामध्ये नवनिर्मिती आहे. परंतु पहिले बीज आहे ते विश्वारंभीचे आणि नंतरचे बीज आहे ते पुनर्निर्मितीचे म्हणूनच वर्धमान त ते चाले मार्ग रे क्षयाचा।---

दोन ओंडक्यांची होते सागरात भेट।
एक लाट तोडी दोघा, पुन्हा नाही गाठ।
क्षणिक तेवि आहे बाळा मेळ माणसांचा ॥धृ॥

या चरणाचा संबंध थेट वाल्मीकी रामायणाशी आहे. त्यात म्हटले आहे. यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ। परंतु त्या श्लोकाचे हे भाषांतर आहे अशी पुसटशी शंका देखील येणार नाही इतका मराठमोळा साज त्यावर गदिमांनी चढवला आहे परंतु खरंच किती योग्य उपमा आहे ही। अफाट, अथांग असा सागरात प्रतिक्षणी नवनवीन



© www.madhaveeraghuveer.com

काटा उलटत असतात. जुन्या विरून जातात. कितीतरी गोष्टी जलाशयाच्या पृष्ठभागावर अचानकच दिसतात. पुन्हा समुद्राच्या तळाशी जातात. त्याचप्रमाणे कुठूनतरी वाहत आलेले दोन ओंडके केवळ कर्मधर्मसंयोगाने एकत्र येतात. काही काळ एकत्र प्रवास करतात आणि पुन्हा एखाद्या लाटेच्या तडाख्याने त्यांचे मार्ग भिन्न होतात. पुन्हा कधी त्यांची भेटही होत नाही. आपलंही जीवन असंच तर नाही का? आजपर्यंत कधीही भेट न झालेल्या, एकमेकांना कधीही न पाहिलेल्या दोन व्यक्ती केवळ योगायोगाने एकत्र येतात. त्यांच्यामध्ये नात्यांचे ऋणानुबंध निर्माण होतात. प्रेमाचे धागे एकमेकांत गुंफले जातात. परस्परां-शिवाय जगणेही अगदी अशक्य होऊन जाते. परंतु कुणाचेच अगदी कुणाचेच हे अनुबंध कायम टिकत नाहीत. कुणीतरी पुढे, कुणीतरी मागे असे जावेच लागते. नियतीचे काट प्रत्येकाला एका अनोळखी, अनपेक्षित अशा वळणावर आणून ठेवते. केवळ पतीपत्नीच्या बाबतीतच नाही तर आपल्याच मुलांचा सहवास देखील ऋणानुबंध असेपर्यंतच लाभतो. तीच गोष्ट शेजारी, पाजारी, सहकारी, मित्रपरिवार, नातेवाईक यांच्या बाबतीत असतेच. ज्यांच्याशिवाय जगणे अगदी कठीण वाटत होते त्यांची कित्येकदा वर्षावर्षांमध्ये गाठही पडत नाही. पण हीच जगाची रीतच आहे. न कळत्या वयापासून ते आजपर्यंत किती माणसं भेटली, त्यांची मोजदाद करणे अशक्य आहे.

नको आसू ढाळू आता, पूस लोचनांस
तुझा माझा आहे वेगळा प्रवास।
अयोध्येत हो तू राजा रंक मी वनीचा ॥ ५॥

अरे भरता, किती भावनाप्रधान आहेस रे तू! अरे माझ्या बोलण्याचा असा विपर्यास नको करूस. आपण कधी परत भेटणारच नाही, असं नाही. चल, ऊठ। आता डोळे पूस. अरे, माझ्या बोलण्याचा अर्थ एवढाच आहे की आपण सारे पराधीन, दैवाधीन आहोत.

परंतु तरीही नियतीने जे कर्म आपल्यावर सोपवले आहे ना, ते मात्र उत्तम प्रकारे आचरायचे आहे. मी अयोध्येला परत यावे अशी तुझी कितीही इच्छा असली तरी ते आता शक्य नाही. तुझा आणि माझा मार्ग वेगळा आहे. समांतर आहे. आणि समांतर रेषा कधीच एकमेकांना मिळत नाहीत. आपण रघुवंशी पुरुष आहोत. वडीलांच्या आज्ञेचा आपण आदर करु या. त्यांच्या अखेरच्या वचनाला अनुसरुन तू अयोध्येचा राजा हो आणि मी पुढची १४ वर्षे हे वनवासी जीवन आचरणार आहे. केवळ पितृराज्ञेचे पालन करून आपण दोघेही समाधान मिळवू -- आपले तातही आपल्याला आशीर्वाद देतील---

नको आग्रहाने मजसी परतवूस व्यर्थ
पितृवचन पाळून दोघे होऊ रे कृतार्थ
मुकुटकवच धारण करी का वेष तापसाचा ॥८॥

मला आता पुन्हा पुन्हा अयोध्येला परत येण्याचा आग्रह करु नकोस रे अनुजा. आपण दोघेही आपल्या पित्याची आज्ञापालन करून कृतार्थ होऊ या. मला वनवासात जाण्याचा आदेश मिळाला आहे. त्यानुसार मी वनात आलो आहे. त्याचप्रमाणे तुला राजगादी सांभाळायची आहे. तू राज्यकारभार उत्तम रितीने सांभाळ आणि त्यासाठी आवश्यक अशी राजवस्त्रे धारण कर. अंगामध्ये संरक्षक असे कवच आणि मस्तकावर मुकुट धारण कर. हा तापसाचा वेष तुला नाही शोभून दिसत. त्याचा त्याग कर. आणि अयोध्येचा स्वामी म्हणून राजसिंहासनावर बस. यातच आपले हित आहे.

संपल्याविना ही वर्षे दशोत्तरी चार
अयोध्येस नाही येणे, सत्य हे त्रिवार।
तूच एक स्वामी आता राज्यसंपदेचा ॥९॥

तूही एक रघुवंशी आहेस. आपल्या कुळाची रीत तू जाणतोस एकवेळ प्राण गेले तरी चालेल पण आपल्या वचनावर

© www.madhaveeladhuveer.com

मी मागे फिरणे नाही. अगदी कधीही नाही. पिताश्रींच्या आज्ञेचा आदर करून अयोध्यावासीयांचा निरोप घेऊन मी १४ वर्षांसाठी वनवास स्वीकारला आहे. आता त्या शब्दांपासून माघार नाही. काहीही झाले तरी आता ही १४ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय अयोध्येला परतणार नाही हे त्रिवार सत्य आहे. कोणीही, कितीही आग्रह केला तरी यात किंचितही बदल होणार नाही. ते मला शोभणारही नाही. आणि मानवणारही नाही. परंतु भरता, तुझा मार्ग मात्र भिन्न आहे. त्यामुळे तुला हा पदभार स्वीकारायला हवा. प्रजेच्या हितासाठी दक्ष राजा या नात्याने तुला सिंहासनावर बसायचे आहे. आपल्या पिताश्रींचा जसा लौकिक होता तसा तूही मिळव. पित्यासमान प्रजेचे पालन करणारा, प्रजेच्या कल्याणासाठी झटणारा राजा अशी त्यांची ख्याति होती. त्याला शोभेल असा राज्यकारभार उत्तम रीतीने करण्याची जबाबदारी मात्र तुझ्यावर आहे.

पुन्हा नका येऊ कोणी दूर या वनात
प्रेमभाव तुमच्या माझ्या जागता मनात।
मान वाढवी तू लौकी अयोध्यापुरीचा ॥१०॥

तुझ्या मनात माझ्याविषयी असणारा आदरभाव प्रेमभाव मी पूर्णपणे जाणतो आणि त्या प्रेमापोटी, तू माझे मन वळवण्यासाठी, मला अयोध्येला परत घेऊन जाण्यासाठी आला आहेस. हेही मी जाणतो. परंतु आता मी तुला बोधपर अशा चार गोष्टी सांगितल्या आहेत त्यावर तू थोडे चिंतन कर. ते शब्द मनात जपून ठेव. म्हणजे मी काय म्हणतोय त्याचा तुला उलगडा होईल. मात्र आता पुन्हा कोणीही या वनात येऊ नका. अरे, आपल्यामध्ये भौगोलिक अंतर असले तरी आपले अंतरंग जुळलेलेच आहे आणि ते तसेच राहील. अजिंक्य अशा अयोध्यानगरीचा लौकिक तसाच अबाधित ठेवण्याचे उत्तरदायित्व तुझ्याकडे आहे. लक्ष्मणाइतकाच तूही मला प्रिय आहेस हे ध्यानात ठेव.

© www.madhavaraghuveer.com

गीत रामायणातील सर्वोत्तम म्हणता येईल असे हे गीत आहे. जीवनाचे अमूल्य तत्त्वज्ञान सांगणारे हे गीत भरताच्या निमित्ताने जरी गायले असले तरी अखिल मानवजातीसाठी मार्गदर्शक ठरणारे असे आहे. हे गीत ऐकताना सर्वसामान्य प्रापंचिक व्यक्तीदेखील अंतर्मुख होते. राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, विनोबा भावे स्वातंत्र्यवीर सावरकर, गोळवलकर गुरुजी, यशवंतराव चव्हाण या थोर महात्म्यांना देखील या गीताने हेलावून टाकले.

या गीताच्या निर्मितीसाठी बराच काळ लागला असेल. कितीतरी चर्चा, विचारमंथने, दुरुस्त्या झाल्या असतील असे आपल्याला वाटत असेल कदाचित!

परंतु लोकोत्तर असे हे गीत गदिमांनी केवळ एका रात्रीत लिहून काढले आहे. आणि त्याची तितकीच भावस्पर्शी चाल बांधायला किती काळ लागला असेल? आपल्या घरापासून आकाशवाणी केंद्रापर्यंत जाताना रिक्षामध्ये सुचलेली ही चाल बाबूजींचे संगीतावरील प्रेम आणि प्रभुत्व दाखवणारी आहे. आकाशवाणी केंद्रात त्याची एकच रिहर्सल झाली आणि हे गीत प्रसारित झाले खरोखर या सगळ्यामागे होती ती रामशक्ती!

|| श्रीराम जयराम जय जय राम ||

© www.madhaveeraghuveer.com

(९) मज आणुनि द्या तो ---- 30 मार्च 2021

05 AUGUST

WEDNESDAY

WEEK 32

DAY 217-148

DATE 05.08.2015

| AUGUST | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

॥ श्रीराम ॥

मज आणुन द्या तो हरिण अयोध्यानाथा ----
श्रीरामांची किती तरी आर्जवं भरताने केली. परंतु त्यांना पुन्हा अयोध्येला परत आणण्याचा निश्चय काही सफल झाला नाही. उलट श्रीरामांनी त्याचीच समजूत घालून त्यालाच अयोध्येच्या सिंहासनावर बसण्याचा आदेश दिला. भरताची समजूत घालताना श्रीरामांनी मानवी जीवनातील विदारक सत्य सांगितले आहे. नियतीच्या प्रभावापुढे माणूस किती क्षुद्र आहे, किती हतबल, किती निरुपाय, विवश, पराधीन आहे हे सांगून प्रत्येकाने आलेल्या परिस्थितीचा स्वीकारच नव्हे तर सत्कार करावा असा बोध केला आहे. गीत रामायणातील सर्वोत्तम असा या गीताने अनेक थोर व्यक्तिमत्वे भारली गेली होती. केवळ सांगीतिक अंगाने गण्याचे हे गीत नाही, तर ऐकणाऱ्या प्रत्येकाच्या अंतर्मनावर खोल ठसा उमटवणारे हे गीत अक्षरशः डोळ्यात पाणी आणते. श्रोत्यांना अंतर्मुख करणारे आयुष्यातील कठोर वास्तवतेचे दर्शन घडवणारे हे अविस्मरणीय गीत ---
पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा !

भरताच्या मनात आपल्या ज्येष्ठ बंधुविषयी अत्यंत आदरभाव तर होताच परंतु तरीही त्याने अत्यंत मृदु तरीही निग्रही शब्दात केलेला बोध काही भरताला डावलता येईना. अयोध्येला श्रीरामांना मी परत आणीनच हा निश्चय पुरा होऊ शकला नाही. त्या ज्येष्ठ बंधूचा आधार होता, तोही तुटल्यासारखा झाला. आणि एकाएकी पोरकेपणाची भावना बळावू लागली. सगळीकडून अगदी तुटल्यासारखे वाटू लागले. या अफाट विश्वामध्ये आता आधारासाठी कोणाकडे पहावं हेच कळेना. पिताश्रींचा दुःखद असा मृत्यू झाला होता. आणि आई तर मनातून पार उतरली होती. आता माझं म्हणावं असं या जगामध्ये आहे तरी कोण? माझा दादा हाच एकमेव आधार होता पण त्यानेही नकार दिल्यावर आता मी कोणाकडे पाहू?

अशी भरताची अवस्था झाली. अशा वेळी त्याला लक्ष्मणाचा हेवा वाटू लागला. एखाद्या ध्वजदंडाप्रमाणे स्थिर उभा राहून त्याने रामाच्या यशाची ध्वजा अखंड फडकत ठेवली. रामाची छाया बनून त्याने कितीतरी कठीण कामं पार पाडली. रामाचे हात, पाय, डोळे इतकेच काय तर रामाचं मनही लक्ष्मणच झाला होता. त्याला स्वतःचं असं वेगळं अस्तित्वच उरलं नव्हतं. सतत श्रीरामांच्या सहवासात राहून लक्ष्मण हा राममयच झाला होता. ही झाली लक्ष्मणाची सगुण भक्ती!

परंतु असा निकटचा सहवास काही भरताला लाभणार नव्हता. त्याला तर अयोध्येला परत जाऊन राज्यकारभार सांभाळण्याचा आदेश मिळाला होता. तेही राम दृष्टीसमोर नसताना! आणि तेही थोडीथोडकी नव्हे तर तब्बल १४ वर्षं! कोणतेही आलंबन नसताना देखील त्याला रामाची भक्ती करायचीच होती. ही झाली निर्गुण भक्ती!

आणि निर्गुण भक्ती ही नेहमीच कठीण, क्लेशदायक असते. क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्।

खरं तर भरत रामाचा वियोग मानतच नव्हता. राम त्याच्या अंतरंगात नित्य होताच. त्याने तो वियोगच मुळी गिळून टाकला होता. पण तरीही त्याच्या निर्गुण वृत्तीला थोडासा सगुणाचा आधार हवासा वाटला. प्रत्यक्ष रामाला जरी अयोध्येला नेता येत नसलं तरी त्याची काहीतरी खूण, काहीतरी प्रतीक मी येथून घेऊन जाईनच. भरत हा कर्तव्यनिष्ठ, तत्त्वनिष्ठ होताच. तरी देखील त्याच्या स्वामिनिष्ठेला रामाच्या पादुकांच्या ओलाव्याची गरज भासली. आणि त्याने श्रीरामांकडे त्याच्या पादुकांची मागणी केली. त्या पादुका सिंहासनावर ठेवून मी केवळ प्रजेची सेवा करणारा, काळजी घेणारा, उपभोगशून्य राजा म्हणून राज्य करेन अशी ग्वाही त्याने दिली. खरोखर सगुण आणि निर्गुण भक्ती जरी परस्परपूरक असल्या तरी सगुणातूनच निर्गुणाकडे जायचं असतं आणि कधी कधी

© www.mauliveeraghuveer.com

या भक्तीने प्रसन्न होऊन निर्गुणालाही सगुणात यावेच लागते. भरताने देखील रामापासून दूर राहून रामाची भक्ती अनन्यभावाने केली - इतकी एकरूपता! इतके सामरस्य! इतकी शरणागति!

श्रीरामाचा निरोप घेताना भरत गहिवरून गेला आणि करूणार्द्र स्वरात सेनेसह अयोध्येला परत आला. श्रीरामांनी दिलेल्या पादुका डोईवरून मिरवत अयोध्येला आणल्या आणि त्या सिंहासनावर ठेवून त्यांचा सेवक म्हणून तो राज्यकारभार पाहू लागला.

इकडे श्रीरामांनी काही वर्षे चित्रकूटावर वास्तव्य केले त्यानंतर तो प्रदेश सोडून त्यांनी दक्षिणेकडे प्रवास सुरू केला. शरभंग ऋषींच्या आश्रमात जाऊन त्यांचे दर्शन घेतले. विराध राक्षसाचा वध केला, आणि त्यानंतर अगस्ति ऋषींचे दर्शन घेऊन पुढे गोदावरीच्या तीरावर पंचवटीमध्ये कुटी बांधून ते तिथे राहू लागले. अशा वेळी एक भयंकर स्त्री तिथे आली. आणि प्रेमालाप करण्याच्या हेतूने ती श्रीरामांजवळ येऊ लागली. ती होती लंकाधिपती रावणाची बहीण - शूर्पणखा! अक्राळविक्राळ अजस्त्र देह असणाऱ्या त्या राक्षसिणीची नखेदेखील प्रचंड मोठ्या सुपाप्रमाणे पसरट होती. अशा त्या शूर्पणखेने रामाशी विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. लाडीगोडी लावत रामाशी लगट करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा श्रीरामांच्या आज्ञेनुसार लक्ष्मणाने तिचे नाक आणि कान छेदून टाकून तिला विद्रूप केले. तेव्हा ती आक्रोश करते, किंचाळत आपला भाऊ रावणाकडे गेली व वारंवार सूड घेण्याचा आग्रह करू लागली. सूड घे त्याचा लंकापती! शिवाय, रावणाचा अहंकार जागवण्यासाठी वारंवार सीतेच्या सौंदर्याचे कोमलतेचे वर्णन करू लागली. तेव्हाचे तिने केलेल्या सूडाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन रामाशी युद्ध करून त्याला पराभूत करून त्याच्या चारुगात्री कामिनीला अशा

© www.madhaveeraghuveer.com

मारीचला पकडून आणण्याचा रावणाने निश्चय केला आणि त्याप्रमाणे योजना आखायला सुरुवात केली. त्याने त्यासाठी मारीचाचे सहाय्य मागितले. हा तोच मारीच ज्याला विश्वामित्रांच्या यज्ञरक्षणप्रसंगी मानवास्त्राने फेकून समुद्रात बुडवले होते. त्यामुळे मारीच हा रामचंद्रांचा पराक्रम जाणत होता. त्याने या बेतापासून रावणाला परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण रावण काही ऐकेना ऐकेना. तेव्हा कपटाने काहीतरी मार्ग काढावा या हेतूने रावणाने मारीचाला सोनेरी हरिणाचे रूप घेण्यास सांगितले व स्वत: याचक यतीचा वेष घेतला.

झाले! ठरल्याप्रमाणे या हरणाने मुद्दामच रामाच्या कुटीच्या अवती भवती विहार सुरु केला. हेतुत:च सीतेच्या दृष्टीपथात यावे अशा बेताने त्याचे चरणे उड्या मारणे सुरु होते. त्या मोहक, देखण्या सुवर्णवर्णी मृगाला पाहून सीतेला खरोखरच त्याचा मोह पडला. येनकेन प्रकारेण तिने त्याच्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. पण तो पुन्हा पुन्हा तिला दिसतच होता. उड्या मारत होता. चोरट्या डोळ्यांनी तिच्याकडे पाहून पुन्हा काही क्षणासाठी दिसेनासा होत होता. हे त्याचे विभ्रम पाहून सीतेला काही राहवेना. शेवटी ती श्रीरामांकडे जाऊन, तो सुवर्णमृग त्यांना दाखवून विनवू लागली—

तोडिता फुले मी सहज पाहिला जाता।
मज आणुन द्या तो हरिण अयोध्यानाथा ॥ध्रु.॥

असं जेव्हा सीता सांगते असते तेव्हा या घटनेची सहजता मनावर ठसते. अहो! अगदी सहजच, माझ्या नित्यक्रमाप्रमाणे मी फुलं तोडत असताना हा सुंदर दिसणारा कांचनमृग माझ्या नजरेला पडला आणि इतका आवडला की हा आपल्याजवळ असावा असं [illegible] मला अगदी निश्चित:च वाटायला लागलं. बाकी माझी कोणतीही इच्छा नाही. आपल्या कुटीच्या अंगणामध्ये



© www.madhaveeragurjar.com

त्याचा नित्य विहार असावा. डोळ्यांना आनंद देणारा हा मृग सतत दृष्टीला पडावा. एवढाच माझा हेतू आहे. आणि तुम्हाला काही हे अशक्य नाही. तुम्ही अगदी सहजच, विनासायास त्याला माझ्यासाठी, माझ्यापर्यंत आणू शकता. अशी आर्जवाने विनवणी करताना, सीतेने रामचंद्रांना अगदी हेतुपुरस्सर 'अयोध्यानाथ' म्हटले आहे. वास्तविक रामाची कितीतरी नावे वाल्मीकी रामायणात आली आहेत. परंतु योग्य ठिकाणी योग्य नावाची योजना करण्यातच तर प्रतिभावंत कवीची प्रतिभा दिसून येते. इथे जानकीवल्लभ कौसल्यानंदन किंवा राघव म्हटलेले नाही तर त्याच्या अधिकाराचे, पराक्रमाचे उचित असे स्मरण करून देणारे 'अयोध्यानाथ' हे संबोधन अगदी सहजतेने वापरले आहे. तुम्हाला काय अशक्य आहे! आपण तर अयोध्येचे स्वामी आहात. एका मृगशावकाला पकडणे हे तर तुम्हाला लीलया शक्य आहे. अर्थातच इथे सीतेची स्त्रीसुलभ वृत्ति दिसून येते. पतीच्या अस्मितेचे स्फुल्लिंग प्रसंगानुरूप चेतवण्यात तर उत्तम पत्नीची कसोटी असते. इथे देखील श्रीरामांना 'अयोध्यानाथ' अशी साद घालताना योद्ध्यातील शूर वीराला 'ती' ललकारत आहे.

भगवद्गीतेत देखील कोणतेही कठीण कार्य करताना अर्जुनाच्या पराक्रमाला साद घालताना त्याला महाबाहो, सव्यसाचिन असे संबोधले आहे. त्याप्रकारे इथे देखील अयोध्यानाथ म्हणताना तोच भाव आहे. आणि पुढे मग त्या हरणाच्या मोहकतेचे यथार्थ वर्णन केले आहे.

झळकती त्याच्या रत्न शृंगावरती
नव मोहक [illegible] सुवर्ण अंगावरती
हे नयन मखमल त्याच्या रंगावरती
इंद्रचापाचे पुच्छ भासत उडताना ।।

हा काही साधासुधा मृग नाहीये. अतिशय शोभिवंत आहे. त्याच्या शिंगावरती रत्ने जडवली आहेत. मोहकशाच्या मुखप्रभा त्याची अंगकांति झळाळत आहे. तो स्वच्छंदपणे

©www.madhaveeraghuveer.com

विहार करतो आहे. वृक्षाच्या छायेत असताना त्याच्या रंगछटा काहीशा गडद भासत आहेत आणि जेव्हा तो कोवळ्या उन्हात विहार करतो तेव्हा त्याच्या सोनसळी रंगामध्ये सूर्याची तेजस्वी छटा मिसळून तो अधिकच मोहक दिसतो आहे. तो समोरून येताना त्याचा वर्ण निराळाच भासतो. त्याचे पाणीदार डोळे जणू काही माझ्याशी गुजगोष्टी करत आहेत असे वाटते. परंतु मी जरा जवळ जाण्याचा प्रयत्न केला तर त्याची नजर कावरी बावरी होते आणि दुसऱ्याच क्षणी दुडक्या चालीने तो निघून पळ काढतो, आणि अशा वेळेस त्याच्या लहानशा पुच्छाची जी कमान होते, ती मला तर बाई इंद्रधनुष्याची लहानशी प्रतिकृतीच भासते. त्याला सतत निरखण्याचा मला जणू छंदच लागला आहे. वेगवेगळ्या कोनांमधून मी आजकाल त्याला निरखत असते जरासा तो नजरेआड झाला की मला चैन पडत नाही. तो सतत आसपास असावा, एवढीच माझी इच्छा आहे. एवढी माझी इच्छा पूर्ण करा ना, अयोध्यानाथा! मला तो हरिण आणून द्या ना!

तो ठुनकतो अनेकदा या दारी
दिसतात उमटली पदचिन्हे सोनेरी
[illegible] शिंग या रम्यस्थानावर
तो दिसे सुवर्णी मृग देवरा, कोणा!" २१.

गेले ४-५ दिवस झाले. तो मला सारखा दिसतो आहे. त्याचे आणि माझे काही आगळेच भावबंध निर्माण झाले आहेत. आणि तोही असा काही लबाड आहे की त्यालाही माझ्या नजरेतील ओढ जाणवतेय आणि मुद्दामच माझी गंमत करण्यासाठी तो हा लपाछपीचा डाव माझ्याबरोबर खेळतो आहे. मी कुटीमध्ये जेव्हा कोणत्यातरी कामामध्ये व्यग्र असते ना तेव्हा हा कितीतरी वेळा अगदी या दारापाशी येऊन माझी चाहूल घेऊन गेला आहे. परंतु त्याच्या पदरवाची जाणीव होऊन तेव्हा मी दाराबाहेर डोकावते तेव्हा मात्र हा वेगाने पळ काढतो आणि दिसेनासा होतो. आणि मला



© www.madhaveelagnaveer.com

08 खात्री आहे. की जेव्हा मी त्याला शोधत असेन तेव्हा
कोणत्या तरी झुडुपाआडून तो मला पहात असतो आणि
09 कदाचित गालातल्या गालात हसतहि असावा. त्याच्या
पावलांच्या खुणा इथे मातीमध्ये, गवतावर उमटलेल्या
10 दिसतात ना मला वारंवार! परवा तर आपल्या दारात
असणाऱ्या केळीच्या खांबावर आपली शिंगे घासताना तो
11 मला दिसला. त्यालाहि कदाचित या स्थानाविषयी जवळीक
वाटत असावी सु-वर्णाचा म्हणजे उत्तम वर्णाचा असा तो
12 मृग मात्र मन मोहवतोय. तो बघा ना! भाऊजी
तुम्हाला दिसतोय ना तो! तुम्ही तरी काही तरी करा ना।
13 अयोध्यानाथा, द्या ना मला तो हरीण आणून।

चालतो जलद गति, मान मुरडितो मंद
14 डोळ्यांत कितीसा भाव विलक्षण धुंद।
लागला मृगाचा मला नाथ हो छंद।
15 वेडीच जाहले तुम्हांवरी त्या बघता।।३।।

त्याबद्दल हे कबूल चुकले आहे की मी त्याच्यासाठी
16 अगदी वेडी झाले आहे आणि म्हणूनच तो चपळतेने पुढे
जात असताना मध्येच थबकतो आणि मान मुरडून
17 हलकेच मागे वळून पाहतो. कारण कुणीतरी पाठलाग
करत असतानाच पळण्यात मजा आहे आणि मी त्याच्या
18 मागावर आहे याविषयी त्याच्या मनात जणू काही खात्री
आहे. आणि नुसती खात्रीच नाही तर त्याच्या देखणेपणाची
19 त्याला जाणीव आहे आणि त्याहि पलीकडे जाऊन त्याला
अभिमान आहे आणि तो अभिमान त्याच्या धुंद दृष्टीतून
20 प्रकट होतो आहे. जणू तो म्हणतो आहे –
अगं तू माझ्यावर भाळली आहेस. यात काहीच
आश्चर्य नाही अगं मी आहेच तसा! हो चारुगात्री,
आश्रमवासिनी माझ्या आकर्षक रूपावर भाळली आहे हा संपूर्ण
सौंदर्याचा, चपळपणाचा विजयच आहे. असं त्या मृगाला वाटतंय
या हिरव्यागार गवतावर जेव्हा हा सुवर्णमृग इकडेतिकडे धावत
असतो ना तेव्हा मला तर तो विधात्याने रेखाटलेलं सुंदर चित्र
वाटते. त्याची प्रत्येक हालचाल मला वेड लावते आहे

किती किती मृगाचे लक्षण मी त्या गणू ?
त्या मृगास धरणे अशक्य कैसे म्हणू ?
मनसाठी मोडिले आपण शंकरधनु
जा, करा त्वरा, मी पृष्ठी बांधते भाता ॥ ४ ॥

नाथा, जेव्हा तो मृग माझ्या दृष्टीला प्रथम पडला तेव्हा मनात केवळ एकच विचार आला की किती मोहक आहे हा मृग। परंतु जसजशी मी त्याला निरखते आहे तसतशी त्याच्या देखणेपणाची एक एक छटा माझ्या अंतःकरणात नोंदली जाते आहे. आणि जेव्हा त्याच्या एकेक लक्षणाचे वर्णन मी आपणा दोघांसमोर करते आहे तेव्हा तर आणखी कितीतरी गोष्टी मला नव्याने जाणवत आहेत. आणि खरंच आहे. जेव्हा रूपाचे, गुणाचे वर्णन करणाऱ्या एक एक गोष्टी मुखातून दुसऱ्यापर्यंत पोहोचवल्या जातात तेव्हा त्या लक्षणांचे एक अलवार पदर हलकेच सुटे सुटे होत जातात अगदी अंतर्मनात दडलेल्या या अपूर्व लक्षणांची कबुली शब्द होऊन बाहेर पडते. माझंही तसंच झालंय. परंतु अशा शुभलक्षणांनी युक्त अशा मृगाला धरणे अशक्य आहे असं मात्र म्हणू नका हं. कारण त्यावर माझा विश्वासच बसणार नाही. मी पूर्णपणे ओळखते ना आपल्याला! तुमचं शौर्य, तुमचा पराक्रम मी नाही जाणणार तर आणखी कोण जाणणार? अहो, फार दूर कशाला? आपणच नाही का स्वयंवरामध्ये शिवधनुष्याचा भंग केला? अनेक रथी महारथींना जे कार्य अशक्य वाटत होते ते आपण लीलया करून दाखवलेत. आपल्याला काहीच अशक्य नाही. आपण आपली वीरता सिद्ध केली आहे. आता मात्र नाही म्हणू नका. माझा हा हट्ट पुरवाच. मी आपल्या पाठीवर वेगवान बाणांनी भरलेला भाता बांधते. वेळ दवडू नका --

कोपात कौशिके अयोध्येत जे धन ।
ते अरण्य धुंडीत चरणांसाठी वन ।
जा आर्य त्याने कुटीरी या घेऊन
सात्विक नोवरी गेह आपुला भ्राता ॥५॥

© www.madhuraveeraghuveer.com

नाथा, मला तर हा हरिण साधासुधा वाटत नाहीये. आतापर्यंत वनात आपल्याला कितीतरी श्वापदे दिसली, हिंस्र, क्रूर श्वापदेही पाहिली आणि भिऊन राहणारी हरणेही पाहिली. पण या हरणाच्या तर काही वेगळंच दिसतो आहे मला तर बाई, हा दैवी जीव वाटतो आहे. असं तर नसेल ना की आपण अयोध्येच्या राजवैभवाचा त्याग करून हे वनवासी जीवन स्वीकारलेलं; तेव्हा तिथल्या कोषातील कोंडलेलं जे धन होतं, त्याला बंदिवासात राहवत नसेल. त्या धनालाच कदाचित शूर, उदात्त राजांचे, आर्य वारस असेल आणि त्यासाठीच रघुकुलातील पवित्र पराक्रमी राजांचे पवित्र चरण शोधत ते धनच जणू हरिणाच्या, वैभवाच्या रूपाने आपल्यापर्यंत आले असेल. असं जर असेल तर त्या वैभवाचा, धनाचा, अनादर करणं आपल्याला शोभणार नाही. आपण तर व्रतस्थ वनवासी जीवन जगत आहोत, आपल्याला खरोखर लक्ष्मीचा मोह नाही. पण तरीसुद्धा दाराशी आलेल्या लक्ष्मीचा सन्मान करायलाच हवा. कोणी सांगावं, या लडिवाळ मृगाच्या रूपाने साक्षात लक्ष्मीच आपल्या कुटीमध्ये येत असेल. तेव्हा आर्यपुत्रा, त्वरा करा. त्या हरणाला आपल्या कुटीमध्ये घेऊन या. तोवर हा आपला कनिष्ठ भ्राता आपल्या आश्रमाचं रक्षण करेल.---

सापडे जरी तो सजीव आपुल्या हाती
अजिनी तयाच्या रत्ने होतील ज्योती
देतील आपणा प्रकाश रात्री रात्री
सजणी नेऊ त्या भरत पुरासी जाता ॥ ६॥

तो जसा आहे तसाच मला हवा आहे. त्याला मारण्याचा विचारसुद्धा माझ्या मनात नाही. शक्यतो त्याला सजीवच आश्रमात आणा. त्याच्या अंगावरील रत्ने चमचम करीत आहेत. त्या रत्नांच्या ज्योतीने इथून अगदी मिट्ट काळोखात देखील आणि या अरण्यात देखील आपल्याला प्रकाश मिळेल त्याच्यावर माझा इतका जीव जडला आहे की आपली वनवासाची १४ वर्षे पूर्ण झाल्यावर जेव्हा आपण अयोध्यापुरीला जाऊ तेव्हा याला घेऊनच जाऊ.

© www.madhavileeraghuveer.com

मनाचे पाहतील हरिण सासवा जावा
करतील कैकयी भरत आपुला हेवा।
ठेवील तो वरी जपून गोड हा ठेवा।
शोभला करशासन धनुर्धारी हो आता ॥७॥

आपण जेव्हा अयोध्येला परत जाऊ ना तेव्हा माझ्या सासवाजावा सासवा पाहतच राहतील. त्यांना वाटेल कदाचित की आम्ही राजमंदिरात राहून देखील एवढ्या वैभवाच्या मानकरी झालो नाही. पण सीतेचे केवढे भाग्य! ती वनवासात असताना, व्रतस्थ जीवन जगत असताना तिच्या दारात सुवर्णमृग चालत आला. असा दुर्लभ असा हा ठेवा हिला मिळाला! त्यांना कदाचित राजमंदिरात राहून देखील वैभव वाटत असावे.

फेकून बाण जरी अचूक जरी मारला।
काढून आणजी घालीन साची खाल।
त्या मृगासनी प्रभु बैसता जरी शोभाल।
तो पहा दिसे तो दूर टेकडी चढता ॥८॥

एरवी तर मला तो जिवंतच हवाय. असाच जोडकर उद्या माझ्याभोवती दुडक्या चालीने धावणारा। पाणीदार डोळ्यांनी कुतूहलाने माझ्याकडे पाहणारा। पण ते आदित्य शक्य झाले नाही तर मग बाण फेकून त्याला मारावे. तुमच्या शरसंधानाबद्दल तर कोणालाच शंका नाही. आणि तुम्ही त्याला जखमी केल्यावर पुढचे काम भावोजी सहज करतील. कोवळ्या पेटी अशा तुमच्या कदाचित जे शक्य होणार नाही. परंतु लक्ष्मण भावोजी त्याची सोनसळी कातडी काढून आणतील. आपण त्या शिळेवर नेहमी विराजमान होता त्यावर ते मृगाजिन अंथरल्यावर तर ती शिळा सिंहासनापेक्षाही कितीतरी सरस दिसेल आणि त्यावर आसनस्थ झालेले आपण जणू देवेंद्राप्रमाणे शोभून दिसाल. आता वेळ दवडू नका. तो पहा ना मृग तो दूरच्या टेकडी चढून जाताना मला दिसतो आहे. अयोध्यानाथा! या ना मज तो मृग आणून!

वाल्मिकी रामायण — मी त्या मऊ आसनावर बसेन, परंतु गदिमा सीतेच्या भावना मात्र अधिक उंचीवर नेतात. ([illegible]

गायिका — माणिक वर्मा. - - -



© www.madhavveeragnuweer.com

(80) धन्य मी शबरी श्रीरामा---31 मार्च 2021



॥ श्रीराम ॥

न निर्मिता केन न दृष्टपूर्वा
न श्रूयते हेममयी कुरङ्गी।
तथापि तृष्णा रघुनन्दनस्य
विनाशकाले विपरीतबुद्धी ॥

कोणीही कधीही सोन्याची हरिणी निर्मिली नाही वा कोठे पाहिलीही नाही. असे असताना देखील रघुनंदनाने तिची लालसा मनात धरून, मोहापोटी म्हणून का होईना, तिचा पाठलाग केला आणि पुढचं सगळं रामायण घडलं. माणसाचा विनाशकाल जवळ आला की त्याला विपरीत बुद्धी होते हेच खरं!

वस्तुत: श्रीराम सर्व काही जाणत होते. आणि तरीही आपल्या प्रिय पत्नीची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्याने त्या कांचनमृगाचा पाठलाग केला. अर्थात तो मृग काही खरा नव्हताच. कपटाने हरिणाचे रूप घेणाऱ्या मारीच राक्षसाने हुबेहूब रामाच्या आवाजात लक्ष्मणाला हाक मारली. आणि सीतेच्याच आग्रहावरून लक्ष्मण रामाच्या मदतीसाठी धावला. परंतु जाताना त्याने कुटीच्या बाहेर एक रेषा काढली आणि त्या रेषेच्या आत सीता सुरक्षित आहे असेही सांगितले. मग काहीही झाले तरी सीतेने ती रेषा ओलांडायची नाही असेही बजावून सांगितले. आता कुटीमध्ये सीता एकटीच होती. अशा वेळी रावणाने डाव साधला. यतिवेष धारण केलेला रावण भिक्षेच्या निमित्ताने कुटीपाशी आला व भिक्षा घालण्यासाठी सीतेला कुटीबाहेर येण्यासाठी आग्रह करू लागला. कारण लक्ष्मणरेषेच्या आत सीता सुरक्षित होती आणि रावण तर रेषेच्या आत पाऊल ठेवू शकत नव्हता. सीतेने त्याचा डाव ओळखला. त्याची कठोर शब्दात निर्भत्सना केली. जिवाच्या आकांताने रामाचा धावा केला. पण तरीही अनवधानाने तिचा पाऊल रेषेबाहेर पडलं. कपटी अशा रावणाने या संधीचा फायदा घेतला. सीतेच्या आक्रोशाला न जुमानता तिचं हरण केलं. तिला उचलून रथात ठेवलं आणि आकाशमार्गाने, वायुवेगाने तो

© www.madhaveeraghuveer.com

लंकेच्या दिशेने निघाला. इकडे, मारीच मृगरूपातील राक्षसाला ठार करून राम परतत असताना लक्ष्मणाला पाहून त्याच्या अंतःकरणात धर्र्र्कन झाले. आणि कुटी रिकामी पाहून तर त्याची शंका दृढ झाली. त्याच्या शोकाला पारावार राहिला नाही. श्रीराम वृक्षवेली, पशुपक्ष्यांना प्रश्न विचारू लागले – कोठे सीता जनकनंदिनी? एकापाठोपाठ एक आघात होतच होते. श्रीरामांच्या शब्दांमधून आर्तता, नैराश्य, अशुभ शंका प्रगट होत होत्या. आश्रम परिसरातील हरणे दक्षिण दिशेला तोंड करून काहीतरी सुचवू देत होती. शेवटी सीतेला शोधत चालत राम लक्ष्मणांनी दक्षिणेचा मार्ग धरला. थोडे अंतर जाताच सीतेच्या केशकलापातील काही फुले दिसली. मध्येच कुठेतरी सुकोमल पावलांचे ठसे तर कुठे राक्षसी पावलांचे ठसे दिसले. एका ठिकाणी तर रत्नजडित धनुष्य खंडित होऊन पडलेले दिसले. आता अशुभाची शंका बळावू लागली. त्यानंतर राक्षसी चिलखत रक्ताने भिजून पडलेले दिसले. म्हणून इथे कोणाशी तरी संघर्ष झालेला असावा.

माझ्या सीतेला पकडून नेणाऱ्याला कोणीतरी अडवले असावे. मला त्याचा शोध घेतलाच पाहिजे. त्याला भेटायलाच हवं. एवढा विचार मनात येताच समोर त्यांना जखमी अवस्थेत, रक्ताने माखलेला गरुड पक्षी जमिनीवर पडलेला दिसला. त्याने तर सीतेला मारले नसेल ना अशी शंका मनात येऊन श्रीरामांनी त्याच्यावर बाण रोखला. परंतु तो पक्षीराज जटायू सर्व हकीकत सांगू लागला. तो म्हणाला, दुष्ट, कामुक अशा रावणाने सीतेला पकडून नेताना मी पाहिले आहे. त्याच्यावर माझ्या पंखांनी, चोचीने प्रहार करण्याचा मी प्राणपणाने प्रयत्न केला. त्याच्याशी घनघोर संघर्ष केला. पण त्याने माझे पंखच छाटले. तेव्हा निरुपाय होऊन मी खाली पडलो. तुझी पत्नी अत्यंत करुण स्वरात आक्रोश करत होती. तू असाच दक्षिण दिशेला जा आणि देवीस्वरूप असणाऱ्या पवित्र सीतेला तू सोडव. असे म्हणून त्या जर्जर जटायूने प्राण सोडले. त्याच्या शरीरावर अंत्यसंस्कार करून राम लक्ष्मण दक्षिण दिशेकडे निघाले. वाटेत भटकत असताना कबंध



© www.madhaveeraghuveer.com

राक्षसाने पुढचा मार्ग दाखवला व पुढे तुला सुग्रीवाची मदत मिळेल असेही सांगितले. त्याने सांगितलेल्या मार्गाने जात असताना वाटेत पंपा सरोवर लागते -- लंकेकडे जाण्याचा मार्ग या सरोवरावरूनच पुढे जात होता. परंतु श्रीरामांनी अकल्पितपणे एक वळण घेतले आणि ते पंपा सरोवराच्या पश्चिम तीरावर आले. लक्ष्मणाने या वेगळ्या वाटेचे कारण विचारताच श्रीराम म्हणाले ---

"इथे एक जीव कित्येक काळापासून प्रतीक्षा करत आहे. त्याची भेट घेऊनच पुढचा मार्ग आक्रमायचा आहे."
तिथे बाजूलाच मतंग ऋषींचा आश्रम होता. त्या आश्रमात शबर जमातीतील एक वृद्ध स्त्री डोळ्यात प्राण आणून प्रभू रामचंद्रांची वाट पहात होती. किती वर्षे? एक-दोन-चार-दहा नाही तर तिच्या बालपणापासून!

आपल्याला शबरी माहिती आहे ती जरजर्जर म्हातारी म्हणून! पण ती देखील कधीतरी अल्लड बालिका होती. गेली अनेक वर्ष ती आश्रमात सेवाकार्य झाडलोट करत होती. अशा त्या मतंग ऋषींचा आशीर्वाद तिला लाभला. त्यांनी तिला सांगितले की स्वतः प्रभू रामचंद्र इथे येतील आणि तिचा उद्धार करतील. या दिलासा देणाऱ्या वचनामुळे शबरी इतकी आनंदित झाली की, ते कधी, कसे येतील कोणत्या दिशेने? यापैकी एकही प्रश्न न विचारता ती प्रतीक्षा करत राहिली. रात्रंदिवस, अहर्निश, रोज आश्रमाची झाडलोट, सडासारवण, ताजी फळे, ताज्या पाण्याचा कलश हे अविरतपणे सुरूच होते. मी निजले आणि प्रभु आले तर? या कल्पनेने तिचा कधी डोळ्याला डोळाही लागला नाही. पंचप्राण जणू डोळ्यात एकवटले होते. सद्गुरुंच्या वचनावर दृढ विश्वास होता.

विश्वास रे गुरुवाक्याचे सोने येईल समाधान ।।

एक ना एक दिवस प्रभु रामचंद्र निश्चित येतील आणि माझा उद्धार करतील. ते आजच आणि आत्ताच आले तर! रोजच्यासारखाच तोही एक दिवस होता. सर्वत्र नीरव शांतता होती. दूरदूरपर्यंत कोणाचीही चाहूल नव्हती.

© www.madhaveeraguweer.com

आज प्राण्यांचे आवाज नव्हते. पक्ष्यांचे कूजन नव्हते. इतकेच नाही तर झाडांच्या पानांची सळसळही नव्हती. एवढेच काय तर पंपा सरोवराच्या पाण्यावर तरंगही नव्हते. जणू काही सर्व विश्व शांत झोपी गेले होते. जागी होती ती शबरी! फक्त शबरी! केवळ शबरी!

पण निसर्ग काही थांबतोय थोडाच! निसर्गनियमानुसार उजाडलं. पहाट झाली. रोजच्याप्रमाणे आश्रम झाडून झाला. बाजूचा रस्ताही स्वच्छ केला. सडा घातला. स्नान केले. घडा घासून स्वच्छ केला. त्यात ताजे पाणी भरले. आणि जणू काही समोरच्या रस्त्याने श्रीराम आश्रमाकडे येत आहेत असे कल्पनाचित्र ती रंगवू लागली. त्यांच्या स्वागतासाठी एका मोठ्याशा शिळाखंडावर तिने आसन अंथरले होते, ते पुरेसे मऊ आहे ना! काही टोचत तर नाही ना, खुपत नाही ना, हेही चाचपून पाहिले. पाय धुण्यासाठी दुसऱ्या एका घड्यामध्ये पाणी भरून ठेवले. आजूबाजूच्या वेलींची फुलं आणून त्यांच्या माळा गुंफल्या. निवडक रसाळ गोड फळं आणली. सर्व सिद्धता पूर्ण झाली होती. आता कधीही येतील प्रभू श्रीराम! पण नाही. सकाळ सरली. दुपार टळली. संध्याकाळ झाली. रात्र झाली. पण प्रभू रामचंद्र काही आले नाहीत. दिवसामागून दिवस चालले होते. बाल्यावस्थेतली शबरी तरुण झाली, प्रौढ झाली, वृद्ध झाली. परंतु अजूनही प्रतीक्षा संपली नाही. केवळ एकच ध्यास - एकच ध्यान! श्रीराम - श्रीराम! आता तर तिचे शरीरही थकत चालले होते. अजून किती काळ? हा प्रश्न गुहाआश्रमाला पडे. पण शबरीला असं कधीच वाटलं नाही. उगवणारा प्रत्येक दिवस तिला सांगायचा - आज निश्चित अगदी निश्चित आज श्रीराम येणार! तिच्या प्रतीक्षेपुढे, ध्यासापुढे, निग्रहापुढे काळदेखील नतमस्तक झाला आणि अखेर तो भाग्याचा दिवस उजाडलाय. शबरीच्या कुटीत साक्षात परब्रह्म अवतरले. ध्यानात अनुभवलेले ते कल्पनाचित्र आज प्रत्यक्षात आले. समोरच्या मार्गाने साक्षात श्रीरामप्रभू सावकाश पावले टाकत येत होते. अंत:करणामध्ये

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

जे रूप साठवले होते तेच प्रत्यक्षात आले. तिला ते कोण आहेत हे सांगावे लागले नाही. अंतरीची खूण पटली. श्रीरामांनाही सांगावे लागले नाही की ही शबरी आहे. आणि खरंच आहे. भक्तांच्या अंतरंगात ज्या स्वरूपात प्राकट्य झाले असते तेच रूप घेऊन परमात्मा प्रकट होतो.

नको विचार, देव कसा? देव असे हो भाव जसा।

शबरी हर्षविभोर झाली. त्यांचे ते दिव्य रूप न्याहाळत राहिली. बोलणं तर ती विसरूनच गेली होती. प्रभूंच्या चरणकमलांवर ती कोसळली. त्यांच्या चरणांना तिने मिठी घातली. ती भावाकुल झाली. लक्ष्मण हे दुरूनच पहात होता. त्याला काही हा प्रकार फारसा रुचला नाही. हळूहळू भावसमाधीतून शबरी भानावर आली आणि शब्द शब्द जुळवत बोलू लागली - - -

धन्य मी शबरी श्रीरामा।
लागली श्रीचरणे आश्रमा।।

श्रीरामांची धीरोदात्त, आश्वासक, शांत, सौम्य प्रसन्न मूर्ति पाहून शबरीला कांहीच सुचेना. मात्र इतके निश्चित की आजवर केलेली प्रतीक्षा फळाला आली. आपले श्रीचरण या आश्रमाला लागले. या मातीचा कण न कण आज धन्य झाला. या दुःखित शबरीच्या देहाचे आज सोने झाले आणि हे जे काही मी बोलत आहे ती काही आत्मस्तुति नाही. वल्गना नाहीत. किंवा कपोलकल्पित कथाही नाहीत. कारण मला ठाऊक आहे - - -

चित्रकूटा हे चरण लागला
किती पावले मुनी मुक्तता।
वृक्षानेहे या थांबा क्षणभर
करा कुटीला क्षमा।। ६।।

मी जाणते ना सारा वृत्तांत! आपल्या केवळ पदस्पर्शाने कित्येक जीवांच्या जन्माचे सार्थक झाले आहे. अगदी सुरुवातीला जेव्हा आपण चित्रकूट पर्वतावर मुक्काम केला होता तेव्हा कितीतरी मुनींना आपल्या दर्शनाने, स्पर्शाने, श्रवणाने



© www.madhaveeraghuveer.com

मुक्ती मिळाली होती. आपले केवळ अस्तित्व देखील कितीतरी जीवांचे कल्याण करू शकते. आपली दृष्टी ज्यांच्यावर पडते त्यांना त्यांना मोक्षाची प्राप्ति होतेय. पण हे काय! किती मी वेंधळी! खुळ्यासारखी बोलतच काय बसले! क्षणभर या कुटीरवासीना विसावा द्या! मी आपणासाठी आसन सिद्ध केलंय. त्यावर बसा. असे म्हणून आधीच अंथरलेले आसन पुन्हा झटकून नीट घातले व श्रीरामांना बसण्याची विनंति केली.

या चरणांच्या पूजेकरिता।
नयनी प्रकटल्या माझ्या सरिता।
पदप्रक्षालन करा त्वरिता।
प्रवासातल्या श्रमा ॥२॥

केव्हाही, कुठेही पुष्कळ चालले की थकवा येतो. शीण येतो. पाय दुखायला लागतात. मात्र पायावर पाणी घेतले की बऱ्याच अंशी तो शीण दूर होतो. आणि तेच पाणी थोडेसे कोमट आणि क्षारयुक्त असेल तर? मग तर सारा थकवा दूर होतो. इथे शबरी म्हणते आहे. तुमच्या दमलेल्या पावलांना थंडावा देण्यासाठी मी स्वच्छ पाण्याचा घडा आधीच भरून ठेवला आहे. पण काय करू! माझ्या अश्रुधारा थांबतच नाहीयेत. त्यांनी जणू काही नदीचे रूप धारण केले आहे आणि त्या आनंदाश्रूंनी जर आपले चरणप्रक्षालन केले तर आपल्याला विश्राम लाभेल. थकवा पूर्णपणे दूर होईल. आणि प्रवासात जे काही श्रम झाले असतील, त्यांचा तर पार विसर पडेल...

गुरुसेवेतच झिजले जीवन
विलेपनार्थ त्याचे चंदन।
रोमांचाची फुले लगडली
मनल्या कल्पद्रुमा ॥३॥

माझ्या अगदी नकळत्या वयापासूनच मी या आश्रमात आहे. माझे सद्गुरु मतंग ऋषींची सेवा करता करता या देहाचे चंदन झिजत गेले. अर्थात मला त्याचा आनंदच आहे. माझ्या कुलहीन जीवनाचा कुणाला तरी काहीतरी उपयोग झाला. हा देह झिजत असताना कुणाला तरी त्याचा परिमळ

© www.madhavvaraghuveer.com

लाभला. आता झिजून झिजून हा देह संपून जाण्यापूर्वी आपण इथे या आश्रमात आलात हे माझे केवढे भाग्य! आता याच देहाचे चंदन घासून तो चंदनलेप मी आपल्याला करत आहे. चंदन घासावे तितके अधिक दरवळते. या कल्पनेनेच माझ्या अंगावर अगदी रोमांच उभे राहत आहेत. मी काही नवतरुणी नाही ना प्रौढ प्रमदाही नाही. अगदी जराजर्जर अशी वृद्धा आहे. परंतु निसर्गात देखील असे चमत्कार मी पाहिले आहेत. एखाद्या पूर्ण वठून चाललेल्या वृक्षाची एखादीच फांदी नवपालवीने, फुलांनी बहरून जाते. तसेच आपल्या दर्शनाने माझ्यातील अष्टसात्त्विक भाव फुलारून येत आहेत. एखादे स्वप्न उराशी जपावे आणि अचानक ते सत्यात यावे, तेव्हा काय करावे तेच कळू नये आणि त्या सत्यात उतरलेल्या स्वप्नामुळे आनंदाश्रू झरझर वाहताहेत. रोमांच उभे राहत आहेत. काय करावे हेच कळत नाही.

निजज्ञानाचे दीप चेतवून
करिते अर्चन आत्मनिवेदन
अनंत माझ्या समोर आले
लेवुनिया नीलिमा ॥१॥

मी तर भिल्ल जमातीतील शबरकन्या! मला ज्ञान, तप, ध्यान वगैरे काहीही समजत नाही. मी कोणतीही साधना, उपासना केलेली नाही. परंतु एक गोष्ट मात्र माझ्याजवळ निश्चित आहे. ती म्हणजे सद्गुरुकृपा! माझे गुरु त्यांच्या शिष्यांना जो उपदेश करत असत तो माझ्या कानावर थोडाफार पडत असे. त्यांचे शिष्य त्यांना काहीतरी प्रश्न विचारायचे - उद्धाराबद्दल, मोक्षाबद्दल - त्यांची चर्चा काही मला पूर्ण समजायची नाही. पण काहीतरी अगदी थोडेसे समजायचे. त्या माझ्या तुटपुंज्या ज्ञानाचा दीप लावून मी आज आपले औक्षण करत आहे. आपल्या कार्यातील सफलतेसाठी सुयश चिंतित आहे. फूल अर्पण करत आपणा अर्पणा करत आहे. औक्षणामुळे आत्मतेज अधिक झळाळून निघते हे मी गुरुजींकडून ऐकले आहे. माझा हा ज्ञानदीप जरी मंद ज्योतीचा असला तरी त्यामागचा भाव मात्र सच्चा आहे.

आपण इथे आलात आणि मी कृतार्थ झाले आता मी आपल्या चरणी पूर्ण आत्मसमर्पण करणार आहे. कारण मी अडाणी असले तरी देखील गुरुंच्या कृपाप्रसादामुळे एवढे निश्चित जाणते की आपण जरी मनुष्यदेह धारण केलेले दिसत असलात तरी ते पूर्णब्रह्म, ते अनंतरूप आपणच आहात. तुमचा हा नीलवर्ण हा प्रत्यक्ष अथांग आकाशाचे द्योतक आहे. आकाश हे सर्वव्यापी आहे, सर्वगम आहे, सूक्ष्म आहे, व्यापक आहे. पण आपण तर त्यापेक्षाही विशाल आहात. मात्र हे अविकारी, अनवद्य, अनाम ब्रह्मचे जणू काही आकाशाचा नीलिमा धारण करून माझ्यासमोर प्रकट झाला आहे. मी धन्य आहे रामा, मी धन्य आहे.

नैवेद्या पण काय देऊ मी?
प्रसाद म्हणुनी काय घेऊ मी?
आज चकोरा घरी चालली
मुकेजली पौर्णिमा ।।ध्रु।।

खरं तर, आपल्या आराध्य देवताला प्रिय असणाऱ्या पदार्थांचा नैवेद्य दाखवण्यात भक्ताला मोठा आनंद मिळत असतो आणि त्याने सेवन केलेल्या पदार्थाचा अल्पसा अंश तो मोठ्या श्रद्धेने सेवन करत असतो. परंतु मी अशी दुर्दैवी की आपल्या समोर नैवेद्य म्हणून ठेवण्यासाठी आपल्याला साजेशी अशी एकही गोष्ट माझ्याजवळ नाही. मी तर शबरी एक भिल्लीण! माझा निर्वाह या रानमेव्यावर होत असतो. अर्थात तोही तुटपुंजा! या विश्वंभराचा स्वामी माझ्या कुटीत आला असताना त्यांना उपहार म्हणून तरी काय द्यावे हेच कळेनासे झालंय. मी पूर्वी गुरुजींकडून एकले होते की चकोर पक्षी केवळ पौर्णिमेच्या चांदण्याचे सेवन करून राहत असतो. चकोराला आस असते ती पूर्णचंद्राची आणि तो रजनीनाथ आपल्या रजतवैभवाने चकोराला पूर्णपणे संतुष्ट करतो आणि एवढे करूनही त्याच्या ऐश्वर्यामध्ये कमतरता येत नाही. पण आज विपरीतच परिस्थिती आहे. ती ऐश्वर्यवती पौर्णिमा आज मुकेजली होऊन चकोराच्या घरी आली आहे आणि चकोराला समजत नाहीये की मी आता काय करू?

© www.madhavteelakhuveer.com

सेवा देवा कंदमुळे ही ।
पक्व मधुरशी बदरिफळे ही
वनवेलींनी काय वाहणे
यांविण कल्पद्रुमा ।।६।।

देवाधिदेवा, माझ्याकडे असून असून काय असणार? मी वेडी बागडी, वनस्थळी राहणारी, वनवासी स्त्री. ही कंदमुळे आपल्यासाठी अत्यंत भक्तिभावाने निवडून आणली आहेत. त्याच जोडीला पक्व, गोड अशी बोरेही आहेत. आपण तर साक्षात कल्पवृक्ष आहात. इच्छिलेली प्रत्येक गोष्ट आपल्या कृपेने प्राप्त होते. परंतु अशा कल्पतरूपुढे वनवेलींचा प्रभाव तो किती असणार? त्या आपल्या मर्यादेत राहून शक्य असेल तेवढे उत्तमातील उत्तम अर्पण करणार ना? मीही माझ्या परीने, माझ्या कुवतीनुसार ही गोड बोरे आपणाला अर्पण करते आहे.

खरं तर मूळ वाल्मीकि रामायणात कुठेही बोरांचा उल्लेख नाही. केवळ रानमेव्याचा उल्लेख आहे. परंतु जनमानसात शबरी आणि उष्टी बोरं हे समीकरण अगदी घट्ट रुजलं आहे. आणि म्हणूनच गदिमांनी इथे कंदमुळांबरोबरच बोरांचा (बदरीफळांचा) आवर्जून उल्लेख केला आहे. पानांच्या बनवलेल्या द्रोणामध्ये शबरीने ही बोरं रामांच्या समोर ठेवली. शबरीच्या भक्तिभावाने श्रीराम अतिशय प्रसन्न झाले आणि मोठ्या प्रेमाने त्या फळांकडे आणि शबरीकडे पाहिले. तेवढ्यात शबरीच्या मनात काहीतरी विचार आला आणि त्यामुळे ती घाईघाईने उठली आणि म्हणाली.

शीते खगांची नव्हेत देवा
मीच चाखिली स्वये गोडवा ।
गोड तेवढी पुढे ठेविली
फसवा नच राघवा मला ।।७।।

श्रीरामांच्या पुढे ठेवलेल्या त्या फळांवर काही ठिकाणी डाग होते. काही फळे थोडी उष्टावल्यासारखी झाली होती. कदाचित रामप्रभूंना वाटायचं की पक्ष्यांच्या चोचीमुळे या



©www.madhaveeraghuveer.com

खुणा पडल्या असतील का? आणि म्हणून लगेचच शबरी त्याचे स्पष्टीकरण देते. ती म्हणते, या काही पक्ष्यांनी चोच मारल्याच्या खुणा नाहीत. मीच आधी ती चाखून पाहिली आहेत. माझ्या मनाने आजपर्यंत ज्यांची प्रतीक्षा केली पूजा केली त्यांना आंबट-तुरट फळे देण्याची चूक माझ्या कडून घडायला नको म्हणून मी ही दक्षता घेतली आहे. यातील प्रत्येक फळ हे गोडच आहे आणि मी स्वतः त्याची चव घेऊन पाहिले आहे. आणि केवळ गोड फळे निवडून तेवढीच तुमच्या समोर ठेवली आहेत. नाहीतर काय होते की वरवर तर याचा लालबुंद रंग दिसतो आणि कधीतरी ती आतून आंबट/तुरट असतात. पण इथे मात्र तसं नाही बरं का! फळांचा हा जो लालिमा आहे तो अगदी खरा आहे. फसवा नाही. इतक्यात लक्ष्मणही अधिक निरखून पहायला लागतो. तेव्हा पुन्हा शबरी सांगते---

का सौमित्री शंकित दृष्टी?
अभिमंत्रित ही बोरे उष्टी!
या बदरीवर नित्य नाचतो
वेदांच्या मधुरिमा ॥२॥

सुमित्रानंदना, असा संशयाने नकोस रे पाहू! तुला ती बोरे उष्टी वाटताहेत का? अरे खरं तर ती अभिमंत्रित आहेत. मंत्रोच्चारण करत ज्या पदार्थाला स्पर्श करावा, तो पदार्थ अभिमंत्रित झाल्याप्रमाणे होऊन जातो. आणि माझ्या सद्गुरुंच्या कृपेने मला जे श्रवण घडले ते मुखोद्गत झाले -- आणि तेव्हापासून माझ्या मुखामध्ये वेदमंत्रच आहेत. त्यांचे माधुर्य आहे, सामर्थ्य आहे. माझे कोणतेही काम करताना त्याला मंत्रसामर्थ्याची जोड असते, त्यामुळे या फळांना तू उष्टी समजू नकोस. त्यामागे माझा भक्तिभाव आहेच. लौकिकार्थाने तुम्ही त्याला उष्टी समजला, तरी ही बोरं नाहीत. श्रीरामा, आमची ही कंदमुळे बोरे सेवन केलीत आणि मी धन्य झाले. माझा आश्रम पुनीत झाला. धन्य मी शबरी श्रीरामा!----

शुद्ध सारंग —— मालती पांडे ——



आतिला [illegible] आनंद स्वरसाजात [illegible] झाला आहे

नवविधा भक्ती
ऋष्यमूक पर्वत सुग्रीव
दुःखी सहायक

२ एप्रिल २०२१



॥ श्रीराम ॥

श्रीरामांची निःस्सीम भक्त असणाऱ्या शबरीची उष्टी बोरे खाऊन श्रीराम संतुष्ट झाले, प्रसन्न झाले. कारण देव हा भावाचा भुकेला आहे, वस्तूचा / पदार्थाचा नाही. परंतु शबरीची कथा इथेच संपत नाही. श्रीरामप्रभूंनी तिला नवविधा भक्तीचा उपदेश केला ते म्हणाले, "मी कुणाचे रूप, विद्वत्ता, परिस्थिती पहात नाही. मला एकच नाते कळते, ते म्हणजे प्रेमाचे/भक्तीचे." हा बोध ऐकत असतानाच शबरीची दास्यभक्ती कळसाला गेली. तिने समाधानाने डोळे मिटले ते कायमचेच! ती अनंतात विलीन झाली. तिच्यावर अग्निसंस्कार करून राम-लक्ष्मण पुढे दक्षिण दिशेकडे निघाले. कबंधाने केलेल्या सूचनेप्रमाणे ते ऋष्यमूक पर्वतावर आले. तिथे किष्किंधापती सुग्रीव होता. तो स्वतः अत्यंत विमनस्क स्थितीमध्ये लपून बसला होता. त्याच्या पत्नीचे रुमाचे हरण त्याच्या भावाने - वालीने केले होते. सुग्रीवाने दुरूनच रामलक्ष्मणांना पाहिले आणि बहुधा वालीनेच यांना आपल्यावर हल्ला करण्यासाठी पाठवले असावे असे वाटल्यामुळे सुग्रीव घाबरून मलय पर्वतावर पळून गेला व राम-लक्ष्मणांचा समाचार घेण्यासाठी त्याने आपला निष्ठावंत सेवक हनुमंताला पाठवले. या प्रथम भेटीतच हनुमंताच्या मनात रामाविषयी अत्यंत आदर व भक्तिभाव निर्माण झाला. तसेच श्रीरामांना देखील याच्याविषयी जवळीक आपुलकी निर्माण झाली. त्याने सर्व वृत्तांत सांगून अग्नीच्या साक्षीने सुग्रीव व श्रीरामांची भेट घडवून आणली. दोघांमध्ये सौहार्दपूर्ण संवाद झाला. तसं पाहिलं तर दोघांचं दुःख एकाच प्रकारचं होतं. पत्नीला दुसऱ्या कुणीतरी जबरदस्तीने पळवून नेले होते. दुःखी माणूसच दुःखिताला सहाय्य करू शकतो. सुग्रीव म्हणाला, "माझा भाऊच माझा शत्रू झाला आहे. तू जर त्याचे निर्दालन केलेस आणि माझी पत्नी मला परत मिळवून दिलीस तर मी माझ्या सर्व सेनेसहित तुला सहाय्य करीन. अगदी सर्व पृथ्वी पालथी घालीन पण निश्चितपणे तुमची पत्नी तुम्हाला परत आणून देईन---"



©www.madhavraghuveer.com

वालीचा वध - झाडाआडून बाण।
अंगदाला [illegible]
सुग्रीव - विलासात - लक्ष्मणाचा राग
वानरगण - शोध - संपाती - माहिती
प्रत्येकाचे सामर्थ्य वर्णन — जांबुवंत

आपली प्रत्येक आज्ञा मला शिरसावंद्य आहे आणि खरोखर पुढे वाली व सुग्रीवाचे निकराचे युध्द झाले. त्यात सुग्रीव पराजित होत आहे हे पाहून श्रीरामाने वृक्षाच्या आडून वालीवर बाण सोडून त्याचा वध केला. अर्थातच सुग्रीवाची पत्नी रुमा व सुग्रीव यांचे मधुर मीलन झाले. वालीच्या पुत्र अंगद याला साम्राज्याचे वचन श्रीरामांनी वालीला दिले व पुढेदेखील त्याचे पालन केले. परंतु सुग्रीव मात्र राजविलासात दंग असल्यामुळे दिलेले वचन पूर्णपणे विसरला. तेव्हा लक्ष्मणाने कडसावून जाब विचारल्यावर मात्र सुग्रीवाचे डोळे उघडले. मग मात्र सज्ज होऊन सुग्रीवाने सर्व वानरगणांना गोळा करून, त्यांचे गट बनवून सीतेच्या शोधार्थ पाठवले. परंतु खूप शोध घेऊनही काही ठावठिकाणा लागेना. सर्व वानरगण हताश होऊन एका पर्वतावर बसलेले असताना संपाती नावाचा गृध्रराज तिथे आला. हा होता जटायुचा भाऊ! त्याला सूक्ष्ममती विद्या अवगत होती. त्यामुळे त्याला तिथूनच समजले की रामपत्नी जानकी ही लंकाधिपती रावणाच्या तावडीत सापडली आहे. लंकानामक सुवर्णद्वीपावरील अंतःपुरात तिला बंदिस्त करून ठेवले आहे. पण तिथे पोहोचणार कसे? कारण मध्ये हा समुद्र आहे. त्याला पार करणे तर शक्य नाही. काही तरी उपाय शोधावा लागेल. तुमच्यापैकी कोणाच्या अंगात एवढे सामर्थ्य आहे का? की जो एवढा समुद्र उल्लंघून जाईल.— तेव्हा वानरांनी आपापल्या शक्तीचे वर्णन करायला सुरुवात केली. कोणी म्हणाले पाच योजने! कोणी दहा तर कोणी वीस योजने! परंतु या भूभागापासून लंकेचे अंतर होते १०० योजने! एवढे अंतर पार करणे कुणालाच शक्य नव्हते. प्रत्येकजण आपल्या शक्तीचा अदमास घेत होता. परंतु सुग्रीवाचा निष्ठावान सेनापती / मंत्री मात्र काहीच बोलत नव्हता—

शेवटी त्या वानरांमधील ज्येष्ठ वानरवीर जांबुवंत समोर आला आणि हनुमानाला म्हणाला अरे! तू बोल ना काहीतरी! तुझ्यामध्ये हा अथांग सागर ओलांडून जाण्याची ताकद आहे. तू का बोलत नाहीस?

27
AUGUST

THURSDAY
WEEK 35
DAY 239-126
DATE 27.08.2015

AUGUST 2015

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

खरं तर हनुमंतापाशी या सर्व वानरवीरांपेक्षा अनेक पटीने शक्ती होतीच. परंतु त्याला मिळालेल्या शापामुळे त्याच्याकडे असलेल्या शक्तीचे त्याला विस्मरण झाले होते. आणि म्हणूनच हनुमान काही बोलत नव्हता. परंतु जांबुवंताने त्याच्यातील शक्तीचे स्मरण त्याला करून दिले आणि मग मात्र त्याच्यातील अंतःशक्ती जागृत झाली ---

वास्तविक स्फुरण आणि स्मरण यांचे उगमस्थान नाभिपाशी असते. तिथे सुप्तावस्थेत असलेली शक्ती जांबुवंताने जागी केली आणि म्हणून श्रीरामरक्षास्तोत्रामध्ये कृतज्ञतेने जांबुवंताचा उल्लेख केला आहे. आणि भक्ताच्या नाभीचे रक्षण जांबुवंताला आश्रय देणाऱ्या श्रीरामाने करावे अशी विनंती केली आहे --- नाभिं जाम्बवदाश्रयः। भक्ताला/दासाला वेळेवर आणि योग्य प्रकारे स्मरण व्हावे यासाठी ही प्रार्थना!

अशा या जांबुवंताने हनुमंताची आत्मप्रेरणा/आत्मशक्ती प्रज्वलित केली. त्याच्यातील आत्मविश्वास जागवला आणि तो इतरांना या हनुमंताची महती सांगू लागला. आणि म्हणूनच हनुमान समोर असूनही त्याचा तृतीय पुरुषी उल्लेख केला आहे.

तरून जो जाईल सिंधु महान
असा हा एकच श्री हनुमान॥

हा प्रचंड असा क्षारसमुद्र ओलांडून जाण्याची ताकद केवळ त्याच्यामध्ये आहे असा हा वीर हनुमान आहे.

भुजंग धरुनी दोन्ही चरणी
अंतराळी सागरा उडुनी
गरुड उभारी पंख गगनी
गरुडाहून बलवान॥३॥

गरुड हा आपल्या तीक्ष्ण नजरेने आपले सावज शोधून आणि उंचावरून एकदम जमिनीवर झेप घेतो. वळवळणाऱ्या भुजंगाला आपल्या अणकुचीदार नख्या असलेल्या पायांमध्ये घट्ट पकडून आपले पंख उभारतो आणि एकाच झेपेमध्ये कितीतरी अंतर पार करून जातो. गरुडाची भरारी ही प्रसिद्ध आहे. उगीच नाही गरुड हा पक्ष्यांचा राजा झाला ---

अगदी भगवंतांनी आपल्या विभूतिंमध्ये देखील वैनतेयाला स्थान दिले आहे. विनतेचा पुत्र असलेल्या या पक्षिराजाला श्री विष्णूने आपले वाहन म्हणून निवडले. त्याची तीक्ष्ण व अचूक दृष्टी, त्याची बाकदार चोच, त्याच्या अणकुचीदार नखांची पकड ही तर त्याची वैशिष्ट्ये आहेतच परंतु 'गरुडभरारी' हे त्याचे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण आहे. सर्वच पक्ष्यांना पंख लाभले असले तरी प्रत्येकाची शक्ती वेगवेगळी आहे. लहान पक्ष्यांना थोड्या अंतरासाठी देखील पुष्कळ वेळा पंख फडफडावे लागतात. परंतु गरुडाने मात्र, एकदाका आपल्या पंखांमध्ये शक्ती भरून घेऊन पंख पसरले की त्या एका भरारीमध्ये तो गरुड कितीतरी योजने अंतर पार करू शकतो. न थांबता न थकता! हे जरी कितीही खरे असले तरी हनुमान हा त्याच्यापेक्षाही बलवान आहे. त्यामुळे या सीतेच्या शोधासाठी हनुमंतच योग्य आहे.

अंजनीचा हा बलाढ्य आत्मज
हा अनिलाचा सुपुत्र क्षेत्रज
निजशक्तीने नाडील दिग्गज
बलशाली धीमान ॥ २ ॥

हा हनुमंत कोणी साधासुधा वानर नाहीये तर त्याच्या मातापित्यांच्या सामर्थ्याचा अंश त्याच्यात येणे अगदी स्वाभाविकच आहे. त्याची माता अंजनी हिने फार मोठे तपाचरण केले होते. तसेच केसरी नावाच्या बलाढ्य अशा वानरराजाचा तो क्षेत्रज पुत्र होता. केसरी हा शिवभक्त होता. त्यामुळे शंकराच्या कृपाप्रसादामुळे त्याच्या प्रचंड शक्तीचा अंशही हनुमानामध्ये आला होताच. शिवाय तो अनिलाचा औरस पुत्र आहे. पंचमहाभूतांमध्ये पृथ्वी ही सर्वांत जड आहे आणि वायु हा सूक्ष्मतर आहे या पृथ्वीला म्हणजे इलेला सामावून घेणारा, तिला निष्प्रभ करणारा, तिच्या पेक्षा शक्तीशाली आहे तो अन + इल अनिल. अशा या वायुला अनेक नावे आहेत. समीर, पवन, मातरिश्वा! ४९ मरुद्गणांपैकी हा एक आहे म्हणून मरुत आणि यांचा पुत्र

© www.madhuveer.com

म्हणून मारुती! शिवाय असेही म्हटले जाते की पायसदानातील सुमित्रेचा प्रसाद घारीने पळवून नेला होता. तेव्हा त्याचा काही अंश अंजनीला प्राप्त झाला व त्यातून या पुत्राचा जन्म झाला. इतके सारे शुभयोग जर एकत्र आले असतील तर हा पुत्र तेजस्वी, बलवान, सामर्थ्यवान असणार यात काही शंकाच नाही. इतकी अफाट शक्ती ज्याच्याजवळ आहे तो पवनपुत्र आपल्या दैवी शक्तीने दिशारूपी गजांना चीतपट करेल, हेही स्वाभाविकच आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे याच्याकडे शक्तीच्या जोडीला बुद्धीचे वरदान आहे. बुद्धिमतां वरिष्ठम्! असा याचा गौरवाने उल्लेख केला जातो. तो धीमान आहे बुद्धिमान आहे मेधावान आहे. आणि नेहमीच जिथे शक्ती बुद्धीचा मिलाफ असतो तिथे अशक्य वाटणारी अद्भुत कार्यही लीलया पार पडतात.

सूर्योदयी हा वीर जन्मला
त्रिशत योजने त्वरित उडाला!
समजुनिया फळ रविबिंबाला
धरु गेला भास्वान ।।३।।

त्याच्यामध्ये असणारी अफाट शक्ती तर त्याचा जन्म होण्याची वाट पहात होती. अंजनीच्या उदरात असल्यापासूनच या शक्तीला प्रकट होण्याची त्वरा होती आणि म्हणूनच सूर्योदयाच्या वेळी जन्मलेल्या या बालकाच्या नजरेला लाल केशरी अशा तेजस्वी रंगांचे सूर्यबिंब पडले मात्र! त्याच्यातील स्फुरण पावणारी शक्ती त्याला स्वस्थ बसू देईना. त्या नवजात शिशुने डोळे उघडले आणि त्याच्या दृष्टीला एक रसरशीत फळ पडले. आणि ते जवळ आहे का दूर असा प्रश्न मुळी त्याला पडलाच नाही. ते आकर्षक आहे आणि ते मला हवे आहे या विचाराने त्याने जी झेप घेतली ती काही सामान्य नव्हती. तीनशे योजने इतकी मोठी भरारी या बालकाने घेतली आणि त्या भास्वानाला धरण्यासाठी त्याने आपले हात उंचावले. भा म्हणजे तेज, प्रकाश, झळाळी!

अशा तेजोनिधीला आपल्या कवेत घ्यावे अशी कल्पना देखील कोणी केली नसेल. परंतु हा बालक काही सामान्य नव्हताच तो अलौकिक होता, तेजस्वी, पराक्रमी होता ---

बाल वीर हा रविते धरिला
भरे कापरे तिन्ही जगाला
या इवल्याशा बालकाकरिता
वज्र धरी मघवान ॥ ४॥

वीर आणि रवि ही केवळ अक्षरांची अदलाबदल आहे. परंतु इथेच तर गदिमा दिसतात. हे दोन्ही शब्द इथे चपखलपणे सामावले आहेत. या बालवीराने रविला धरायचे ठरवले आणि त्याप्रमाणे उड्डाण केले मात्र! परंतु ही घटना काही त्याच्या एकट्यापुरती मर्यादित किंवा व्यक्तिगत नव्हती याच्या उड्डाणाने त्रैलोक्याला कापरे भरले. अवघे भूमंडळ डळमळीत झाले. आखिल जगताच्या चक्षु असणाऱ्या सूर्याला या अफाट बलवान अशा बालवीराने धरले तर काय हलकल्लोळ होईल याची कल्पनाही करता येईना. सगळेजण म्हणजे देव-देवता, ग्रह-नक्षत्र-तारे घाबरले. शेवटी देवेंद्राने आपले शस्त्र उगारले. (वज्र) खरं तर हा शेवटचा असा जालीम उपाय आहे. परंतु विश्वावर अनपेक्षित आलेल्या या संकटामुळे मघवानाने (इंद्राने) आपले अमोघ अस्त्र काढले आणि या वीराच्या दिशेने फेकले ---

देवेंद्राच्या वज्राघाते
जरा दुखावत होय हनुते।
कोप अनावर येई वायुते।
थांबे तो गतिमान ॥ ५॥

देवेंद्राच्या वज्राला सहस्रधारा आहेत. त्यागमूर्ति अशा महर्षि दधीचिंच्या अस्थिंपासून ते वज्र बनवले जाते अशी कथा आहे. अर्थातच त्यामुळे सर्व आयुधांमध्ये श्रेष्ठ असणाऱ्या वज्राला दधीचिंच्या तपाची व त्यागाची धार प्राप्त झाली आहे.

© www.madhaveeraghuveer.com

शिवाय त्याचा उचित उपयोग करणारा साक्षात देवांचा देव-देवेंद्र आहे. त्या वज्राच्या अगदी ओझरता निसटता स्पर्श या बालकाला झाला आणि अगदी फार मोठी नसली तरी जराशी दुखापत हनुवटीला झाली आणि ती दुभंगल्याप्रमाणे झाली---
त्या व्रणामुळे त्याला हनुमान हे नाव मिळाले. मात्र ही झाली नंतरची गोष्ट! आपल्या पुत्रावर इंद्राने वज्र फेकले यामुळे वायुला मात्र अतिशय क्रोध आला. आणि त्याचे परिणाम-स्वरूप म्हणून तो वहायचेच थांबला. खरं तर वाहणे हाच वायुचा स्वभाव आहे. ईर या धातुचा अर्थ आहे. वाहणे, हलणे, फुसळणे, चालना देणे आणि सम् + ईर - यः सम्यक् ईर्ते इति समीरः। असं त्याचं नाव या कारणावरून पडलं आहे. आता तोच वहायचा थांबला म्हणजे सृष्टीतील हालचाल थांबली. सर्व विश्वाचा, चराचराचा श्वास कोंडला गेला. जो गतिशील होता तो अचानक अचल, स्थिर Stand still झाला---

पवन थांबता थांबे जीवन
देव वायुचे करिती सांत्वन
पुत्राते वर त्याच्या देऊन
गौरविती भगवान ॥६॥

वारा थांबला म्हणजे सगळं संपलंच की! त्रैलोक्याचे जीवनच थांबले. सगळ्या देवांना देखील चिंता वाटू लागली. परंतु अत्यंत क्रोधायमान झालेला वायु काही कोणाचेच ऐकेना. त्याचे वाहणे पूर्णपणे थांबले. सर्व देवांनी भगवान विष्णुंना प्रार्थना केली. तेव्हा त्यांनी वायुची समजूत घातली. आणि त्याच्या पुत्राला एक वर दिला. तो असा की या वायुपुत्राला कोणत्याही शस्त्राने इजा होणार नाही. तो तेजस्वी तर होईलच. पण इच्छामरणी होईल. इतर वानरांप्रमाणे तो सामान्य नाही तर असामान्य असेल. अलौकिक असेल. अशी. यांची प्रशंसा करून वायुचे सांत्वन केले. हे वरदान मिळाल्यामुळे वायु काहीसा शांत झाला व पूर्वीप्रमाणे वाहू लागला.

शस्त्र न छेदील या समरांगणी
विष्णुवराने इच्छामरणी।
ज्याच्या तेजे दिपे दिनमणी
चिरंतर आयुष्मान ॥ ७॥

या ब्रह्मांडामध्ये सर्वात तेजस्वी आहे तो सूर्य! त्याला भास्करमणि, दिनमणी, दिनकर, मार्तंड, तपन अशी नावे आहेत. त्याच्या तेजाची सर कोणालाही येणार नाही. परंतु या सूर्यावर झेप घेण्याचे साहस करणारा पवनतनय मात्र त्याला भयभीत करू शकला. त्या दिनकराचे तेज देखील याच्यापुढे निस्तेज झाले. सूर्य पुन्हा तेजाने झळकावा यासाठी श्री विष्णुंनी हनुमंताला चिरंजीवी होण्याचा वर दिला----

करि हनुमंता निश्चय मनसा
सामान्य न तू या कपिजनसा।
उचल एकदा पद वामनसा
घे विजयी उड्डाण ॥ ८॥

आतापर्यंतची सात कडवी ही श्रीहनुमंताचे यथार्थ वर्णन करणारी म्हणजेच हनुमंताला तृतीय पुरुषी ठेवून त्याच्याबद्दल इतरांना सांगणारी, त्याचे गुणगौरव करणारी होती. परंतु आता मात्र हनुमंताबद्दल नाही तर प्रत्यक्ष हनुमंताला आदेश दिला आहे. त्याच्यातील स्फुलिंग चेतवून प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आता आली आहे. आणि म्हणूनच जांबुवान म्हणतो आहे — हनुमंता, तू इतरांप्रमाणे सामान्य नाहीस. तू मनाशी निश्चय कर आणि झेप घे. तू एक पाऊल उचलायचाच काय तो अवकाश आहे. वामनमूर्ति दिसायला लहानखुरी असली तरी त्याच्या एका पावलामध्ये किती सामर्थ्य होते हे आपल्या सर्वांना ज्ञात आहे. हनुमंता, तू देखील एक पाऊल उचल आणि विजयी उड्डाण कर. तुला निश्चितच यशश्री प्राप्त होईल. तुझ्या उडीची कीर्ति ही आसमंत भरून राहणारी आहे.

© www.madhaveeraghuveer.com

इतिहास घडवणारा असा तू पुढील अनेक पिढ्यांना आदर्शभूत ठरणार आहेस. तुझे बळ आणि तुझी बुद्धी यांना निग्रहाची जोड लाभली तर तुला अशक्य असे काहीच नाही. जांबुवंताच्या या प्रेरणेमुळे हनुमंताचा आत्मविश्वास जागा झाला. आणि त्याने खरोखर सर्व सामर्थ्यानिशी कसे विजयी उड्डाण केले याचे शब्दचित्र डोळ्यासमोर उभे राहते.

या गीतात हनुमान या विशेषनामाशी यमक साधताना गदिमांनी बलवान, धीमान, भास्वान, मघवान, गतिमान, आयुष्मान अशा शब्दांची वैभवशाली उधळण केली आहे. संस्कृतप्रचुर शब्द असूनही कुठेही ते जड किंवा अगम्य वाटत नाहीत. तर त्यांचा सरळ अर्थ अंतःकरणात पाझरत जातो. परंतु वान आणि मान याविषयी एक कुतूहल ~~आपण~~ सहज जाता जाता करावेसे वाटते.

धनवान, श्रीमान हे शब्द आपण मराठीतही व्यवहारात वापरतो. ती गोष्ट त्यांच्याजवळ विपुल प्रमाणात आहे असा अर्थबोध त्यातून होत असतो. पुत्र असणारा तो पुत्रवान. सामर्थ्य असणारा तो सामर्थ्यवान हे आपल्याला माहिती आहे परंतु कधीही कधी धीमान, गतिमान या शब्दात आपण मान हा प्रत्ययही वापरतो. मग त्यात अंतर काय आहे? फरक कोणता?

प्रथम पदातील अंत्य अक्षर अ किंवा आ असेल तर वान प्रत्यय लागतो. अन्यथा उ ई यापैकी अक्षर शेवटी येत असेल तर मान हा प्रत्यय लागतो.
विद्यावान, ज्ञानवान / श्रीमान, धीमान, कीर्तिमान

अशा या हनुमंताची प्रशंसा करणाऱ्या प्रसिद्ध गीताला पं. वसंतराव देशपांडे यांनी अगदी योग्य न्याय दिला आहे.

भक्ती, कौतुक किंवा आवाहन करण्यासाठी साधारणपणे मुलतानी राग वापरला जातो. तोच इथे वापरला आहे.

त्यामुळे शब्द, स्वर, सूर, गायकी या सर्वच बाजूंनी हे गीत सर्वांगसुंदर झाले आहे.

असा हा एकच श्रीहनुमान ॥

॥ श्रीराम ॥

जांबुवंताने हनुमंताला त्याच्या अफाट सामर्थ्याची आठवण करुन दिली आणि आपोआपच हनुमंताचे बाहु स्फुरण पावायला लागले. त्याने विराट रुप धारण केले. महेंद्र पर्वतावरुन आकाशमार्गाने झेप घेतली. आणि तो त्रिकूटाचल पर्वतावर पोहोचला. तिथूनच त्याला दूरवर असणारी वैभवशाली लंका दिसली. लंकेपर्यंत पोहोचताना त्याला मार्गात अनेक अडथळे आले ते सर्व अडसर दूर करत हनुमंत लंकेनगर पोहोचला. परंतु त्या स्वर्ण नगरीचे रक्षण करण्यासाठी बलाढ्य असे रक्षक सिद्ध होते. त्यामुळे तिथे प्रवेश करणे कठीण होते. शेवटी हनुमंताने सूक्ष्म देह धारण करुन लंकेत प्रवेश केला. व रात्रीच्या वेळी नगर धुंडाळण्यास प्रारंभ केला. ~~[illegible]~~ रावणाच्या अंतःपुरात देखील शोध घेतला परंतु सीतामाता काही त्याला दिसली नाही. शेवटी निराश होऊन तो अशोकवनात आला. तिथे शिंशपा वृक्षावर बसून तो ते रमणीय वन न्याहाळत असताना राक्षसिणींच्या पहाऱ्यात असलेली म्लानवदना, मलिनवसना अशी देवीस्वरुप स्त्री त्याने पाहिली. 'हीच तो रामाची स्वामिनी' अशी खूण त्याला मनोमन पटली. इतक्यात सीतेची मनधरणी करण्यासाठी रावण तिथे आला. तेव्हा पतिव्रता अशा सीतेने अत्यंत कठोर शब्दात त्याची निर्भत्सना केली. रावणाचे नाही तर श्रीरामाचे गुणवर्णन केले. हनुमंत हे दुरुनच पाहत होता, ऐकत होता. त्याच्या मनामध्ये श्रीरामाविषयीचा आदर शतगुणीत होत होता. रावण तिथून निघून जाताच त्याने फांद्यावरुन उडी मारली ती थेट वैदेही समोरच. अशा तऱ्हेने तिला कोणतीही पूर्वकल्पना नव्हती. त्यामुळे ती बावरली, भांबावली, गोंधळली.

अशा वेळी हनुमंताने महापतिव्रता जानकीला वंदन केले आणि श्रीरामांनी खुणेसाठी दिलेली मुद्रिका दाखवली. सीतेने ती लगेचच ओळखली व हनुमंताकडे श्रीरामप्रभूंचे कुशल विचारले. तेव्हा हनुमंताने स्वतः श्रीराम तिच्या सुटकेसाठी येणार आहेत अशी ग्वाही त्या माऊलीला दिली आता सीतेचे दुःख कुठल्या



© www.madhaveeraghuveer.com

कुठे पळून गेले. माझे पती येणार, श्रीराम येणार, या राक्षसांच्या नावडीतून माझी सुटका करणार या बातमीने ती आनंदित झाली आणि ते पाहून हनुमंतदेखील हर्षभरित झाला.

वास्तविक त्याचे काम झाले होते परंतु तरीही या दशाननाची ताकद तरी अजमवावी आणि त्याने या सुचरिता अशा सीतेला पळवून आणल्याची सजा म्हणून त्याने तेथील झाडे उपटून टाकायला सुरुवात केली. ते अशोकवन पूर्ण उध्वस्त केले. जंबुमालीला ठार केले. तेव्हा रावणपुत्र इंद्रजिताने त्याला वश करून ~~दरबारात~~ आणले आणि रावणाच्या आज्ञेवरून त्याच्या शेपटीला वस्त्रे गुंडाळून ती पेटवून दिली.

अशा वेळी मारुतीने लंकेतील मंदिरे, गोपुरे, सदनांवर उड्या, एकापाठोपाठ एक अशा उड्या मारून संपूर्ण लंकाच पेटवून दिली. लंकेतील प्रजाजन भयकंपित झाले. सीतेला त्याची काळजी वाटायला लागली. जणू काही युगांत आला आहे असे भासू लागले. अग्निनेच तांडवनृत्य सुरू केले आहे असेही वाटायला लागले. रावणालाही काही कळेना, की आपण काय करायला गेलो आणि काय झाले? सगळीकडे हाहाःकार माजला ---

सर्व लंका पेटवून झाल्यावर हनुमंताने शांतपणे आपले शेपूट समुद्राच्या पाण्यात विझवले व आकाशमार्गाने तो पुन्हा श्रीरामांकडे परत आला व सर्व वृत्तांत कथन केला. चला, सीतेचा शोध तरी लागला. निदान ती सुरक्षित आहे या वार्तेने श्रीराम सुखावले. मात्र तिला आणण्यासाठी त्या दूरवरच्या लंकेपर्यंत जाणार तरी कसे? या तीरापासून त्या तीरापर्यंत पसरलेला हा अथांग सागर ओलांडणार तरी कसा? जानकीचा नेमका ठावठिकाणा समजला आहे. पराक्रमी असे श्रीराम त्या दशमुख रावणाचे निर्दालन करण्यासाठी समर्थ आहेत. असे असताना त्या पलीकडच्या तीरावर पोहोचायचे कसे हेच मोठे आव्हान होते.

म्हणून, शांत स्वभावाच्या श्रीरामांनी सलग तीन दिवस सागराची प्रार्थना सुरू केली. परंतु काहीच परिणाम झाला न --



© www.madhaveeradhuveer.com

उसळलेला समुद्र तसाच गर्जत राहिला. सागर प्रसन्न होऊन वाट काही करून देईना. शेवटी न राहवून श्रीरामांनी सागरावरच शस्त्र उगारले. तेव्हा रामबाणाच्या भयाने सागर प्रकट झाला आणि श्रीरामांना वंदन करून बोलू लागला "असा अविचार करू नकोस. तुझ्या सैन्यात नळ नावाचा वानर आहे. तो विश्वकर्म्याचा पुत्र आहे. त्याला सेतुबंधनाची कला अवगत आहे. त्याच्या मार्गदर्शनाखाली आणि वानरसेनेच्या मदतीने सेतु बांधावा. मी तो आनंदाने माझ्या छातीवर धारण करीन."

सागराचा हा सल्ला ऐकून श्रीरामांनी नळाला विचारले त्याने तत्काळ संमति दिली. तो खरं तर त्या काळातील वास्तुविशारद होता. Architect आणि एखाद्या सत्कार्यासाठी आपल्या कलागुणांचा, विद्येचा, ज्ञानाचा विनियोग होणे यासारखा दुसरा आनंद नाही. झालं... समुद्रावर सेतु बांधायचा आहे ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली. युद्धाची वानरसेना तर सज्ज होती. त्यात आणखी मजूरगणांची जोड मिळाली. ऋक्ष-अस्वल-रीस सर्वत्र वातावरण भारलेले होते. या सैन्यामध्ये शक्ती होती, स्फूर्ति होती, उत्साह होता, जोम होता आणि मुख्य म्हणजे भक्ती होती. श्रीरामप्रभूंच्या पत्नीच्या मुक्ततेसाठी आपलाही सहभाग असावा ही सद्भावना होती.

परंतु कार्य कठीण होते. अभूतपूर्व होते. आजपर्यंत नळाने मोठमोठे महाल बांधले होते. उंच मनोरे उभारले होते. उत्तुंग प्रासाद बांधले होते. नद्यांवर सेतुही बांधले होते. परंतु आजचे हे काम सामान्य नव्हते. इथे सागरावर सेतु बांधायचा होता. हे काम कठीण नक्कीच होते पण अशक्य नव्हते. संघशक्ती संघटित झाली तर ती अकल्पितालाही प्रत्यक्षात आणू शकते. आता कामाला भिडायला हवे. एकमेकांचा हुरूप, उत्साह वाढवायला हवा. आणि त्यासाठी सारेच जण कामाला लागले आणि काम करता करता गाऊ लागले ---

OCTOBER 2015

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |



सेतु बांधा रे, सेतु बांधा रे। सेतु बांधा रे सागरी।
सियावर रामचंद्रकी जय ।।

प्रभु रामचंद्रांच्या नावाची घोषणा करत हात जोरात चालू लागले. परंतु एवढ्या विराट सागरावर सेतु बांधण्यासाठी शिळाही तशाच प्रचंड हव्यात ना! उगीच किरकोळ दगड धोंडे काय कामाचे? मोठाल्या महाकाय पर्वतांमधून फोडून आणलेल्या शिळा आकाराने मोठ्या, मोठ्या म्हणजे किती मोठ्या असाव्यात? त्यांची तुलना गजराजांच्या शरीराशीच होऊ शकेल. हे पर्वत फोडून शिळा ओढत आणणे हे काही सामान्याचे काम नाही. आणि माणसाने समजा असे अचाट काम करायचे ठरवले तरी त्याला पुष्कळ वेळ लागू शकतो. परंतु इथे मात्र वानरशक्तीच्या रूपाने शक्तीचा समुदायच एकत्र आला होता. आणि इथे शक्तीच्या मदतीला त्वरा आली होती. काही वानरगण मोठाल्या शिळा डोंगरातून तोडून आणत होते आणि तितक्याच त्वरेने, तातडीने दुसरी फळी ते महाकाय फत्तर समुद्रात ढकलून देत होते. जणू काही त्यांच्यामध्ये चुरस लागली होती की तू आधी शिळा आणतोस का मी आधी समुद्रात ढकलतो ते! हे खेळ होतायत न होतायत तोवर आणखी इतर वानरगण सैन्याला येऊन मिळत होते. संख्याबळ, शक्तीबळ वाढतच होते. नवीन आलेले वानर म्हणत होते की आपण इकडून सेतु तर बांधणार आहोत. पण त्या दूरवर दिसणाऱ्या लंकेचा एवढा काय महिमा? आपण आपल्या अचाट/अफाट शक्तीने ती सगळी लंकाच इकडे ओढायची का? आहे काय न नाही काय?

उचका झाडे फेका डोंगर।
पुच्छी झेलील त्यांना सागर
ओढा पृथ्वी जलतरावर।
वडवाग्नी तो धरील माथी, सेतु शोभायति ।।२।।

आता या कामात मागे तर हटायचेच नाही. लवकरात लवकर सेतु बांधून व्हायला हवा. त्यासाठी मग काहीही करायला लागले तरी आम्ही तयार आहोत. सेतु उभारणीच्या कामात जे जे काही उपयोगात येऊ शकेल, त्या सगळ्याचीच

© www.madhaveeraghuveer.com

आम्हाला लाभदायक आहेत. ज्या ज्या गोष्टींना आकार आहे वजन आहे अशी प्रत्येक गोष्ट - म्हणजे झाड असो की डोंगर असो - आम्ही ते सर्व उखडून समुद्राच्या पाण्यावर टाकणार आहोत. सागर देखील सत्कर्माच्या बाजूने आहे. त्यानेच आम्हाला हा सल्ला दिला आहे. त्यामुळे या सर्व गोष्टींना तो आपल्या पाठीवर तोलून घेईल याची आम्हाला खात्री आहे आणि शेषनागाने जशी पृथ्वी आपल्या पाठीवर तोलून धरली तसा हा समुद्रातील वडवानळ या सेतूला आपल्या पाठीवर तोलून धरेल.

[या विश्वामध्ये अग्नि हा सर्वत्र आहेच. पृथ्वीच्या पोटामध्ये ज्वालारूपाने धगधगता अग्नि आहे. जंगलामध्ये वृक्षांच्या घर्षणाने जो अग्नि उत्पन्न होतो तो दावानल अगदी पर्वताच्या पोटामध्येही अग्नि असतोच. हिमालय जरी वरवर शीतल वाटत असला तरी त्याच्यात अग्नि आहेच आणि एरवी जरी पाणी हे अग्नीचा दाह शांत करत असले तरी समुद्राच्या तळाशी अग्नी धगधगत आहे त्यालाच वडवानल म्हटले आहे.

नामभक्ती वे दाटून पोटी
शततीर्थांच्या सवत्यो पाठी
सत्कार्याच्या पाथिकासाठी
श्रीरामाला असेच घेतो वानर पाठीवरी ॥ ३७ ॥

'सत्य संकल्पाचा दाता नारायण' असे सुवचन आहे. उत्तम कार्य करायचे असा केवळ संकल्प, विचार मनात यायचा अवकाश की परब्रह्म परमात्मा अशा काही अनुकूल गोष्टी घडवून आणतो की त्यी कार्यशक्ती शतगुणित होते. इथे तर दुर्जनाने केलेल्या अन्यायाचा प्रतिकार करायचा होता. रावणाने जबरदस्तीने परस्त्रीला पकडून नेऊन आपल्या राज्यात ठेवले होते. त्याचा बीमोड करायचा होता. सज्जनांना नेहमीच दुर्जनांकडून त्रास सहन करावा लागतो. इथे तर स्वत: श्रीराम अयोध्यापति असूनदेखील सध्या वनवासी झाले आहेत. त्यांच्या राजधानीत असणाऱ्या चतुरंग सेनेच्या



© www.madhaveeraghuveer.com

त्यांना आता, या घडीला काहीही उपयोग नाही. परंतु हे वानरगण त्यांना त्या सैन्याची कुठेही कमतरता भासू देत नाहियेत. कारण त्यांच्या उरात रामभक्ती आहे. रामाचे कार्य ते आपलेच कार्य अशा भक्तिभावनेने ते या कार्याला भिडले आहेत! 'प्राण जावो किंवा राहो' हीच भाषा यांच्या मुखात आहे. या उत्कट रामभक्तीमुळे वानर हे वानर न राहता ते तीर्थस्वरूप झाली आहेत. आता जरी श्रीरामांसाठीच ते मोठ्या शिळा पाठीवर वाहून नेत असले तरी वेळप्रसंगी प्रत्यक्ष श्रीरामांना देखील पाठीवर घेऊन लंकेपर्यंत जायला हे कमी करणार नाहीत. इतकी स्वामिनिष्ठा त्यांच्या रोमरोमात भरून राहिली आहे. आता ध्येय एकच - पैलतीरावर पोहोचायचे!

नळसा नेता सहज लाभला!
कोटि कोटि वानर बला
प्रारंभी घे रूप सागता
पाषाणाच हे पहा लीलया तरती पाण्यावरी ॥४॥

कार्य उत्तम असले की त्याला धुरंधर नेता लाभतोय. इथे तर या विषयातील उत्तम जाणकार असा नळासारखा नेता लाभला आहे. Well begun is half done. एक प्रमुख जरी चांगला असला तरी आपोआपच इतर सर्व जबाबदारीने वागतात. इथे तर सगळाच समसमा संयोग जुळून आला आहे. या कार्यात नेत्यासाठी शोधाशोध, निवडणूक करावी लागली नाही. सहजच या गोष्टी घडून आल्या. आणि जेव्हा कार्य सहज होऊ लागतात तेव्हा त्यामागे निश्चित काहीतरी दैवी योजना असते. या नळाच्या नेतृत्वाला साथ मिळाली आहे ती शक्तिशाली वानरसेनेच्या लक्षावधि हातांची! अजून तर सेतू बांधायला केवळ सुरुवातच झाली आहे. पण या प्रारंभातच पूर्णतेची बीजे रोवली गेली आहेत. या आरंभातच त्याच्या परिपूर्तीचे चित्र साकार झालेले दिसत आहे. आणि जेव्हा अशा या दैवी, अलौकिक घटना घडतात तेव्हा चमत्कार आढळून येतात. वास्तविक दगडांचा गुणधर्म आहे - पाण्यात बुडणे

| SEPTEMBER | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

परंतु त्या विश्वनियंत्याची इच्छा जर सत्कार्याला जोडली गेली तर अशक्य गोष्टी शक्य होतात. म्हणूनच दगडही पाण्यावर तरंगू लागतात.

चरण प्रभूचे जळात शिरता।
सकळ नद्यांना येई तीर्थता।
आरंभास्तव अधीर पूर्तता
शिळा हेकेने जडू लागल्या काठा काठावरी ॥१॥

दगडांनी आपला जडपणाचा गुणधर्म सोडला, म्हणावे की पाण्याने आपला बुडवण्याचा गुणधर्म सोडला म्हणावे एकापेक्षा विपरीत गोष्टीच घडत आहेत. तर मग ही श्रीरामप्रभूंच्या पदस्पर्शाची किमया म्हणावी की काय? खरोखर प्रभूच्या चरणस्पर्शाने साध्या नद्यांच्या पाण्याला देखील तीर्थाचा दर्जा प्राप्त होतो. पाण्याला संस्कृतमध्ये अनेक नावे आहेत. — जल, नीर, तोय, आप, जीवन, अंबु पण या प्रत्येकाच्या अर्थछटा मात्र भिन्न आहेत. आणि त्याची व्युत्पत्ति पण निराळी आहे. परंतु पाण्याचे पावित्र्य व मांगल्य मात्र चढत्या श्रेणीने आहे. पाण्यापेक्षा उदक व उदकापेक्षा तीर्थ श्रेष्ठ आहे. आणि म्हणूनच सर्व तीर्थक्षेत्रांचा नद्यांशी निकटचा संबंध आहे. या सागराचे पाणी देखील उचंबळत आहे. काठावर काठा आदळत आहेत.

सेतुबंधनाचे कार्य पूर्ण झाल्यानंतरचे चित्र सर्वांच्या दृष्टीसमोर वारंवार येत आहे. परंतु कोणत्याही कार्याच्या पूर्ततेसाठी प्रथम आरंभ तर व्हायला हवा ना! इथे तर पूर्तताच आरंभासाठी व्याकूळ झाली आहे. अगदी व्यवहारातही आपण पाहतो की एकदा का काम सुरू झाले की मग ते पूर्ण व्हायला फारसा वेळ लागत नाही. सुरू करण्याचाच फार तो अवकाश असतो. या काठांना सुद्धा परिपूर्तीची ओढ लागली असावी आणि म्हणूनच त्या एकमेकींना कानात सांगताहेत ----

© www.madhavraghuveer.com

गर्जा गर्जा हे वानरगण
रघुपति राघव पतितपावन।
जय लंकारि जानकीजीवन
युद्धाआधी स्फुरण या स्फूर्तिच्या भेरी॥

कार्याकार्यातही अंतरे असतेच. कोणतेही व्यक्तिगत कार्य हे शक्यतो न बोलता, मौनाने करावे. परंतु सर्वांनी मिळून करण्याच्या कामांमध्ये अधिक जोर येण्यासाठी मित्र घोषणा द्याव्यात. जयजयकार करावा. म्हणजे मग, कामाचा शीण जाणवत नाही. आणि अधिक प्रेरणा मिळते. पूर्वीपासूनच सैन्यामध्ये चैतन्य येण्यासाठी शंख फुंकले जायचे. मृदंग, ढोल, रणशिंगाचा वापर केला जायचा. किंवा मग, 'हर हर महादेव' सारखा जयघोष केला जायचा. इथेही या कठीण कार्याला सामोरे जाताना वानरगणांमध्ये जोर येण्यासाठी 'रघुपति राघव' 'पतितपावन' अशा घोषणा आसमंतात दुमदुमत आहेत. अजून तरी श्रीराम लंकेपर्यंत पोहोचलेही नाहीत. परंतु लंकाधिपती रावणाबरोबरच्या युद्धात सत्याचा जय निश्चित आहे या श्रद्धेने श्रीरामांचा उल्लेख लंकारि म्हणून आणि जानकीचा जणू प्राण असणारे म्हणून जानकीजीवन असा करत आहेत. युद्ध सुरू व्हायला अजून काहीसा अवकाश आहे. परंतु स्फूर्तीची रणवाद्ये वाजायला आत्तापासूनच सुरुवात झाली आहे.

सेतु नच हा फक्त श्रमांचा
विशाल हेतु श्रीरामांचा
महिमा त्याच्या शुभनामाचा
थबकुनि बघती स्वयकार्यी हे स्तब्ध दिशा चारी ॥७॥

आता हे काही श्रीरामांचे एकट्याचे कार्य उरले नव्हते. हा तर असत् प्रवृत्तीविरुद्ध असणाऱ्या सज्जनांचा लढा होता. खरं तर दशानन रावण हा शिवभक्त होता- शूर, पराक्रमी होता. तपाचरणी होता. परंतु आता अहंकारापायी तो उन्मत्त झाला होता. प्रत्यक्ष देवांना बंदिवासात ठेवून तो चौदा चौकड्यांचे राज्य गर्विष्ठपणाने भोगत होता. त्याचा विनाश होणे अटळ होते



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

आणि असे जनहिताचे कार्य जेव्हा घडते तेव्हा त्याला क्रतु म्हटले जाते. क्रतु म्हणजे यज्ञ! रामावतारातील हे महान कार्य म्हणजे प्रजेच्या कल्याणासाठी केलेले यज्ञकार्यच होते. इथे पारंपरिक समिधांचे हवन नव्हते. तर येथे श्रमाच्या समिधा अर्पण केल्या जात होत्या. श्रीरामांच्या पत्नीची - जानकीची मुक्तता हे केवळ निमित्तकारण होते परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे जनतेला निर्भयतेने मोकळा श्वास घेता यावा हा गुप्त हेतू त्यामागे होता. आणि रामाचे नाम घेत आरंभलेले हे शुभकार्य निश्चित पूर्णत्वाला जाईल याविषयी विश्वास होता. हे सगळे जरी खरे असले तरी यापूर्वी असे कधीच घडले नव्हते हे. कार्यच मुळी अभूतपूर्व होते. इतक्या मोठ्या प्रमाणात संघशक्ति कार्यरत झाल्याचे यापूर्वी कुणी पाहिले नव्हते की ऐकले नव्हते. त्यामुळे चारही दिशा स्तंभित होऊन हे नवल अनिमिष नेत्रांनी पाहू लागल्या - - -

मुहु:कारुनि फिरवा डंका
विजयी राघव हरली लंका।
मुक्त मैथिली कशास शंका
सेतुरूप हा सातत्य शिरला दुष्कळ्या अंधारी ॥८॥

एवढ्या मोठ्या संख्येने वानरगणांनी जयघोष सुरू केल्यानंतर तिथे समुद्रतटावर केवढ्या प्रमाणात ध्वनीची स्पंदने तयार झाली असतील. पाहिल्या ध्वनीलहरी विरायच्या आत नवनवीन लहरी उत्पन्न होत होत्या. वानरगणांचा तो प्रचंड मुहु:कार जणू काही गर्जून सांगत होता की या युद्धात सत्याचाच जय होणार आहे. श्रीरामच निश्चितपणे विजयी होणार आहेत आणि लंकाधिपती पराभूत होणार आहे. ज्या रावणाने सीतेचे बळजबरीने हरण केले होते त्या रावणाचा पूर्ण संहार होणार ही तर निश्चित घटना आहे. आणि दुष्टप्रवृत्ती रावणाचाच वध झाल्यावर मैथिली मुक्त होणार यात तर काहीच शंका नाही. दुष्ट प्रवृत्ती किंवा अज्ञानाची तुलना नेहमी अंधाराशी केली जाते आणि मोठा अंधार नाहीसा करण्यासाठी

© www.madhaveeraghuveer.com

नेहमी मोठ्या प्रकाशाची गरज नसते. एक लहानशी पणती देखील खूप मोठा, कधी काळ्या अंधार क्षणात नाहीसा करू शकते. सूर्य उगवल्यावर तमाचे, काळोखाचे अस्तित्व आपोआपच संपून जाते. सूर्याच्या लखलखीत प्रकाशात अंधार नाहीसा होतो. म्हणूनच सूर्याला तमारि (तम+अरि) म्हटले आहे. त्याचप्रमाणे त्याच सूर्याच्या वंशातील श्रीरामांना इथे लंकारि म्हटले आहे. आणि याच लंकेचा ध्वंस करण्यासाठी स्वत: प्रभु श्रीरामचंद्र आपल्या प्रचंड सेनेसहित येत आहेत. अर्थातच या दिव्य तेजस्वी प्रकाशस्रोतासमोर त्या दुबळ्या अंधाराचा कसा आणि किती पाड लागणार? यांच्या केवळ अस्तित्वानेच तो जळून जाणार आहे. या शक्तिशाली तेजापुढे त्या अशक्त अंधाराची काय बरोबरी? चला, उठा! आपण आपले कार्य करू या. सेतु बांधा रे सागरी।

सियावर रामचंद्र की जय ॥

प्रखर आवेशयुक्त संगीत - लोकगीताचा बाज
रघुपति राघव पतितपावन — भजनी ठेका
स्वरांचा मधुर संयोग
सियावर रामचंद्र की जय।
मान, प्रतिष्ठा, हुद्दा, पदवी विसरून सर्व श्रोत्यांची साथ।
अंगावर रोमांच। बाहू स्फुरण पावतात.
रामरसात तल्लीन होऊन जाते।
उत्स्फूर्त सहभाग
भुभु:कारांनी फिरवा डंका। होहोहोहोहो — —

## (३३) अनुपमेय हो सुरू युद्ध हे रामरावणांचे ।।

।। श्रीराम ।।

'सेतु बांधा' रे सागरी' अशा उत्साहवर्धक शब्दांत गीत गात, एकमेकांना प्रेरणा देत वानरगणांचे काम मोठ्या आवेशाने सुरू झाले. श्रीरामांचे नाम घेत मोठमोठ्या शिळा वानरगण समुद्रात टाकत होते. आणि वचन दिल्याप्रमाणे सागराने हा अवजड भार आपल्या छातीवर तोलून धरला होता. आणि खरोखरच अल्पावधीत हा लांब-रुंद असा अभूतपूर्व सेतु तयार झाला. सेतु जसजसा पूर्ण होत होता तसतशी वानरसेना पुढे पुढे चालली होती. सेतुबंधनाचा शेवटचा टप्पा पूर्ण झाला आणि ही श्रीरामांची प्रचंड सेना प्रचंड गर्जना करत, उड्या मारत, जयजयकार करत लंकेच्या किनाऱ्यावर पोहोचली. सर्वांनाच अत्यानंद झाला होता. समुद्रतटावर हा जल्लोष सुरू होता. त्याचप्रमाणे स्वर्गीय देवतांनाही खूप आनंद झाला होता. कारण रावणाने देवांना बंदिस्त केले होते. आता रावणवध होण्याची घटका जवळ येत चालली होती. दुष्ट प्रवृत्तींचा बीमोड आता लवकरच होणार होता. रामावताराचा हाच तर मुख्य हेतू होता. हे महत्वाचे कार्य दृष्टीपथात आले होते. आणि म्हणूनच सिद्ध, चारण, महर्षि, देवता या सर्वांनी श्रीरामांचे अभीष्ट चिंतले---

इकडे लंकेत काय परिस्थिती होती? रावणाचा भाऊ बिभीषण हा सत्प्रवृत्तीचा होता. म्हणून त्याने रावणाला खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परक्याची पत्नी पळवून आणून तिला बंदिवासात ठेवणे हा अधर्म आहे. या मार्गाने तू जाऊ नकोस. श्रीरामाचे आचरण हे सत्यधर्माचे आहे. असे वारंवार सांगून त्याचे मन वळवण्याचा प्रयत्न केला, परंतु हेकेखोर अशा रावणाला ते काही पटेना. तेव्हा बिभीषणाने रामाच्या पक्षात जाण्याचे मनाशी निश्चित केले. श्रीराम आपल्या प्रचंड सेनेसहित लंकेवर चाल करून येत आहेत. ही वार्ता रावणापर्यंत आधीच पोहोचली होती. आणि आपल्या शत्रूचे बलाबल जाणून घेण्यासाठी रावणाने आपले गुप्तहेरही रामसेनेत पाठवले होते. या दूतांनी श्रीरामांच्या अफाट ताकदीची कल्पना दिली होती. परंतु तरीही रावण आपल्याच गुर्मीत होता.

© www.madhaveeraghuveer.com

© www.madhaveeraghuveer.com

स्वतःच्या पराक्रमावर त्याचा फाजील विश्वास होता. अहंकाराने तो अगदी फुलून गेला होता. पण तरीही सहज त्याने आपल्या स्वेत प्रासादाच्या सौधावरून हे महाप्रचंड सैन्य पाहिले. त्याच्या कल्पनेपेक्षा ते कितीतरी अधिक होते. पण रावणाला भिण्याचे काहीच कारण नव्हते. कारण त्याला तर ब्रह्मदेवाचा वरप्रसाद लाभलेला होता. परंतु तरीही तो मनात चरकलाच. आणि त्याने वेगळीच खेळी खेळायचे ठरवले. त्याच्या मनात एक कपटी विचार आला. त्याने आपल्या विद्युज्जिव्ह नावाच्या राक्षसाकडून एक मायावी परंतु खरे वाटणारे असे श्रीरामांचे शिर तयार करून घेतले. आणि ते घेऊन तो अशोकवनात सीतेकडे गेला. "श्रीरामांचा वध झाला आहे. आता वाचवायला कोणीही येणार नाही आता तरी विवाह करून तू माझी हो." त्याच्यासाठी तू मला आजवर धिक्कारलेस तोच आता राहिला नाही. हे बघ त्याचे धनुष्य आणि हे त्याचे मस्तक!

रावणाचे हे गर्विष्ठ बोलणे ऐकून आणि खरोखर समोर आपल्या प्रिय पतीचे मस्तक पाहून सीता आक्रोश करू लागली. तिच्या साऱ्या आशा आता धुळीस मिळाल्या. आता कोठूनही प्रकाशाचा एक किरण येण्याची शक्यता उरली नाही. मी काय करू? कोठे जाऊ? या नराधमाच्या तावडीतून स्वतःला कशी वाचवू? आता मृत्युशिवाय अन्य तरणोपाय नाही काय करू? काय करू? असा विलाप करत ती त्या मस्तकाजवळ बिलगू लागली. रघुवरा बोलत का नाही? वारंवार ती आपल्या दैवाला दोष लावत होती. परिस्थितीला दोष देत होती. तिचे मन आक्रंदत होते. शेवटी ती मूर्च्छित झाली.

सीता आपल्याला वश होणे शक्य नाही हे रावणाने ओळखले व तो निघून निघून गेला. तेव्हा पहाऱ्यावरच्या सरमा नावाच्या राक्षसिणीला तिची दया आली. तिने खरा कानात सांगितले. 'श्रीराम जिवंत आहेत' या कल्पनेनेच तिच्या जिवात जीव आला. तिच्या आशा पल्लवित झाल्या व ती श्रीरामांची प्रतीक्षा करू लागली.

इकडे श्रीरामांचे प्रचंड सैन्य लंकेच्या भूमीवर उतरले...

08 तेथील सुवेल पर्वतावर चढून राम लक्ष्मण, सुग्रीव लंकेचा
विस्तार पाहू लागले. इतक्यात बिभीषणही त्यांना येऊन
09 मिळाला. तोही काही खाणाखुणा सांगत असतानाच अचानक
रावणाविषयी सुग्रीवाचा संताप इतका तीव्र झाला की
10 त्याने थेट रावणाच्या राजवाड्यावरच उड्डाण केले. तिथे
सुग्रीव-रावणाचे युद्ध झाले. रावणाकडे मायावी शक्ती
11 असल्यामुळे सुग्रीवाला माघार घ्यावी लागली व त्याने
रावणाच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली. तेव्हा
12 श्रीरामाने त्याच्या जखमांवरून मायेने हात फिरवला व
मोठ्या प्रेमाने त्याला समजावून सांगितले ---
13 सुग्रीवा साहस हे असले। भूपतीस तुज मुळी न शोभले
हे असले भलते सलते धाडस करणे तुझ्यासारख्या
14 वीरपुरुषाला शोभून दिसत नाही. असा उपदेश करून त्याला
युद्धनीतीचे काही धडेही दिले. यापुढे अविचाराने पाऊल
15 उचलू नकोस. तुझ्या या अविवेकी कृतीमुळे पुढे अनर्थ
झाला असता. राजाने सर्वांना आधी भावनांवर विजय
16 मिळवायचा असतो. आपले शौर्य असे वाया दवडायचे नाही.
आणि कितीही पराक्रम असला तरी युद्ध करण्यापूर्वी योजना
17 आखणे आवश्यक असते. सर्वांना विश्वासात घेऊन, मग
चढाई करायची असते ही संघभावना तू विसरलास की
18 काय? या उपदेशातून कोणत्याही लढाईतील सार्वकालीन सूत्रे
सांगितली आहेत. हा बोध सुग्रीवाला मनोमन मान्य झाला.
19 आणि त्याने पुन्हा नव्याने वानरसेनेची योजना, व्यूहरचना
करायला सुरुवात केली. आता कोणत्याही क्षणी युद्धाला
20 तोंड फुटणार होते. परंतु अनेकदा युद्ध हे अटळ असले तरी
ते सर्वदृष्ट्या अहितकारकच असते त्यामध्ये दोन्ही पक्षांची
वित्तहानि, जीवितहानि होण्याची शक्यता असते. शक्य असेल
तर युद्ध टाळावे असे धर्मशास्त्र सांगते. साम-दाम-दंड
भेद या चारही उपायांचा अवलंब करून झाल्यावरच
अगदी अपरिहार्य असेल तर युद्ध करावे या नियमाला ही
धर्मशास्त्राचा आधार आहे. स्वतः श्रीरामचंद्र तत्पर धर्मज्ञ आहेत.



©www.madhaveeraghuveer.com

तेव्हा प्रत्यक्ष युद्ध सुरु करण्यापूर्वी सामोपचाराने युद्ध व हानि टाळता येईल काय, हे पाहण्यासाठी अंगदाला रावणाकडे पाठवले. या प्रसंगाचा उल्लेख रामायणात अंगद शिष्टाई म्हणून केला आहे. [महाभारत- श्रीकृष्ण शिष्टाई] खरं तर युद्धपरिणामांची सहृदय जाणीव ठेवून रावणाला केलेले हे आवाहन होते. हा काही भित्रेपणा नाही तर ही पराक्रमी पुरुषाची अहिंसा आहे. स्वतःच्या सामर्थ्यातून जन्मलेली ही करुणा आहे. अंगदाने रावणाकडे जाऊन या सर्व भीषण परिणामांचे वर्णन केले

शेवटचा करी विचार फिरुनि एकदा।

परंतु अहंमन्य रावणाला त्याचे हे सौम्य बोलणे देखील सहन झाले नाही. त्याने मांडलेला प्रस्ताव रावणाने झुगारून दिला आणि युद्धासाठी दंड थोपटले. आता मात्र युद्ध होणार हे निश्चित झाले. राजधर्मानुसार केलेला युद्ध टाळण्याचा श्रीरामाचा शेवटचा प्रयत्न अयशस्वी झाला आणि या अभूतपूर्व युद्धाला सुरुवात झाली.

परंतु ही काही साधीसुधी लढाई नव्हती तर हे होते युद्ध रामरावणांचे! हा होता महाभयानक संगर! दोन्ही बाजूंनी संचरलेला युद्धज्वर हा महत्त्वाचा भाग होता. हे गीत वाचताना त्या स्वराचा संसर्ग आपल्यालाही झाल्या शिवाय रहात नाही. जणू काही ते घनघोर युद्ध नजरेसमोर उभे राहते. शंख दुंदुभिंचे स्वर कानावर आदळू लागतात. आपलेही बाहु फुरफुरु लागतात. या प्रचंड युद्धात आपणही सहभागी होतो. कारण हे युद्ध अभूतपूर्व आहे. असे युद्ध यापूर्वी कधीही झाले नाही आणि पुढे कधी होणारही नाही.

नभा भेदुनी नाद चालले शंख दुंदुभीचे।
अनुपमेय हो सुरु युद्ध हे रामरावणाचे।।ध्रु.।।

शब्द ही आकाशाची तन्मात्रा आहे. आकाशतत्त्वामुळे ध्वनीची आवाजाची निर्मिती होते असते. आपल्याला नाद ऐकू येतो तोही आकाश आहे म्हणूनच! फार मोठ्या आवाजाला आपण आकाश दणाणून टाकणारा ध्वनि म्हणतो. पण या मोठ्या आवाजापेक्षा देखील या युद्धातील रणदुंदुभि, शंख, ध्वनि, चीत्कार, आरोळ्या

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

यांचे आवाज नभाला देखील भेदून जाणारे होते. वास्तविक आकाश हे सर्वात सूक्ष्मतर, तरल असे तत्व आहे. आकाशापलीकडे केवळ आकाशच आहे. परंतु या रणभेरींचे आवाज आकाश फाडून पुढे चालले आहेत. कारण हे रामरावणाचे युद्ध आहे. आणि याला उपमा तरी कशाची देणार? उपमेयाच्या तोडीचे उपमान तरी असायला हवे ना? ज्याला तोडच नाही, उपमा नाही असे हे अनुपमेय युद्ध सुरु झाले ---

सशंख राक्षसगण तो दिसला
कृष्णघनावर बलाकमाला
मुखातुनि घन गर्जे चपला
रणांगणावर कोसळले तो पाऊस बाणांचे ॥१॥

दोन्ही सैन्यांनी शंख फुंकायला सुरुवात केली. तो आवाज तर अगदी कानठळ्या बसवणारा होताच. परंतु ते दृश्यही फार विचित्र दिसत होते. त्या काळ्याकभिन्न असुरांच्या मुखातील ते शंख म्हणजे जणू काही काळ्या ढगांनी आभाळ भरून आले असताना बगळ्यांच्या माळा उडत जाव्यात तसे ते दृश्य दिसत होते. किंवा भर पावसाळ्यात काळ्या ढगावर वीजेच्या चमकदार रेषा उमटाव्यात तसे वाटत होते आणि पाठोपाठ गडगडाटी गर्जना करत धो धो पाऊस कोसळावा तसा राक्षससेनेवर बाणांचा अक्षरशः पाऊस पडत होता. अविरत बाण येऊन कोसळत होते.

नाचत थय थय खिंकाळती हय
गज गर्जित करी नादसमन्वय
भीषणला तो जणू नादमय।
त्या नादातच मिळे रडरव फक्त राक्षसांचे ॥२॥

युद्धामध्ये कितीतरी पथके असतात. हत्तीदळ, घोडदळ, पायदळ। या सर्वांचा केवढा तरी कोलाहल झाला. [illegible] युद्धाला जसा रंग भरत जातो तसतसा हत्ती-घोड्यांना देखील चेव चढत जातो. त्यामुळे घोड्यावर स्वार झालेल्या सैन्याला साथ देत घोडे खिंकाळू लागले आणि त्यांच्या स्वरात स्वर मिसळत हत्ती चीत्कार करू लागले. युद्धाच्या भीषणतेला या

© www.madhaveeraghuveer.com

नादमयतेची साथ मिळाली. आणि या आवाजाच्या मानाने थोडा कमी परंतु विराट संख्येमुळे प्रचंड वाटणारा पावलांचा आवाजही त्यात मिसळला. हा आवाज प्लवंगांच्या म्हणजे वानरांच्या पावलांचा होता. तसाच राक्षसांच्या अजस्त्र पावलांचाही होता. सगळाच गलबला माजला----

दंत दाबुनी निज अधरांवर
वानरताडण करिती निशाचर।
नभात उडती सदेह वानर
शस्त्र म्हणुन ते घाव घालती वृक्षपर्वतांचे ॥३॥

कोणतेही काम हे कष्टाने करणे आणि सहजतेने करणे यात जे अंतर आहे तेच इथे या सैन्यात दिसून येते. कार्य एकच होते - शत्रुपक्षाचा पाडाव करणे. आणि राक्षसांच्या अंगात ताकदही भरपूर होती. तरीही वानरांवर चढाई करताना त्यांना दात ओठ खाऊन ते काम करावे लागत होते. आणि त्या राक्षसगणांचा हल्ला चुकवण्यासाठी वानरांकडे नैसर्गिक कौशल्य होते, ते म्हणजे उंचच उंच उड्या मारण्याचे! त्यामुळे रावणसेना अगदी जीव खाऊन वानरांवर चाल करायची आणि हे वानरसैन्य आपल्या आवाक्यात आले आहेत असं वाटायचं तेवढ्यात वानरगण उंचच उंच उड्या मारून त्यांच्या हातून कोलट्या सुटायचे. आणि वर त्यांना खिजवायचे. अर्थातच वानरांकडे इतकी सुसज्ज शस्त्रास्त्रे नव्हती परंतु निसर्गानेच त्यांना शस्त्रे पुरवली होती. शस्त्र म्हणून ते मोठाली झाडे त्यांच्या फांद्या किंवा अगदी वेळप्रसंगी पर्वतशिलांचाही अचूक वापर करायचे.

जय दाशरथी जय वातसुत
गरज करती वानर गर्जित।
सेतूविन अहा अथवा हाणीत।
भरास आले जळ जणु की महासागरांचे ॥४॥

कोणतेही कठीण काम करण्यासाठी आतून उत्साह हवा. मन खंबीर हवे. त्याला धृतीची जोड हवी. आणि मनाला स्फूर्ति देण्यासाठी प्रेरणादायक शब्द नेहमीच उपयोगी पडतात.

© www.madhaveeraghuveer.com

आणि जेव्हा आपल्या नेत्याचे, सेनापतीचे, प्रमुखाचे नाव घेतो तर एक आगळाच हुरूप येतो आणि त्यातही त्याच्या नावामध्ये त्याच्या आईवडिलांचे नाव गुंफले तर मग त्याच्या पुण्याईची पराक्रमाची जोड लाभल्याने त्या नावाचा महिमा अधिक वाढतो. भगवद्गीतेमध्ये अर्जुनाला अर्जुन या नावाने जितक्या वेळा संबोधले आहे त्यापेक्षा कितीतरी वेळा पार्थ, कौन्तेय वा पांडव म्हटले आहे. त्याच न्यायाने इथे देखील श्रीराम, सुग्रीव किंवा अंगद असे न म्हणता दाशरथी व तारासुत असा पुकारा केला आहे. या गर्जना देत एकीकडे हाताने प्रहार सुरू आहे. एकीकडे शस्त्र चालवायचे आणि दुसरीकडे शत्रूने मारलेले शस्त्र झेलायचे हे काम अखंड सुरू आहेत. एकीकडे राक्षसांची प्रचंड सेना व दुसरीकडे वानरसेना - इतक्या अफाट संख्येने होती की जणू तो सेनासागरच भासत होता. दोन महासागरांचे युद्ध सुरू आहे असे वाटत होते.

गदा शूळ मारा कागून शक्ती।
राक्षस वानर घेती युक्ती।
रणांत पडती अमुच्या रक्ती
जय लंकाधिप घोष घुमविती अरि वानरांचे ॥५॥

श्रीरामसेनेमध्ये जसा जोश वाढत चालला होता तसाच तिकडे रावणसैन्यालाही जोषही वाढत चालला होता. कोणीच माघार घ्यायला तयार नव्हते. परस्परांवर शस्त्रांचे वार केले जात होते. गदा त्रिशूळ असेल किंवा वृक्ष, पाषाण असेल, या शस्त्रांनी कोणी जखमी होत होते. कितीतरी आपल्याच रक्ताच्या थारोळ्यात मृत्युमुखी पडत होते. राक्षससेनेला देखील चेव चढला होता, 'जय लंकाधिप' असा त्यांचाही जयजयकार सुरू होता.

चाप कोसळे पडला धोंडा
वर बाणांचा सडा वाकडा
हाणा मारा ठोका तोडा
संहारार्थी अर्थ धावती सर्व आपिलांचे ॥६॥

©www.madhaveeraghuveer.com

अवघी लंकाभूमी हेच समरांगण झाले होते. सर्वत्र संहार सुरू होता. कधी रथाचे कळस उन्मळून पडत होते तर कधी रथच उद्ध्वस्त होत होते. बाणांचा तर अखंड वर्षाव सुरू होता. काही बाण शत्रुपक्षात सरळ घुसत होते तर काही तिरके, उभे, आडवे! बाणांचा अक्षरशः खच पडला होता. भीषण दृश्य होते ते! आणि त्याच वेळेला आपल्या सहकाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 'हाणा मारा ठोका तोडा' अशाही गर्जना घुमत होत्या. अर्थातच आपापल्या भाषेत! राक्षसांची भाषा वेगळी, मानवांची वेगळी, वानरांची, अस्वलांची आणखीनच वेगळी! परंतु आवेश मात्र सगळ्यांचा सारखाच होता. संहार करणे हेच ध्येय नजरेसमोर होते. मग भाषा कोणतीही असो. खरे तर हाणा-मारा-तोडा-ठोका ही भाषा काही काव्याला अनुकूल नाही. अगदी गद्य किंवा त्याही पलीकडे जाऊन ही अगदी रुक्ष किंवा कठोर भाषा आहे. परंतु या गीतामध्ये युद्धाचे वास्तव वर्णन करताना गदिमांची प्रतिभा अगदी फुलून आली आहे. या चरणामुळे युद्धाची भीषणता मनावर ठसते.

रणात मरता आनंदाने
मांस कर्दमी फुलती वदने।
तीही तुडविती जातील चरणे।
रणभूमीवर ओहळ फुटले शोणिताचे॥८॥

युद्धात सहभागी होताना प्रत्येकालाच मृत्यूची अगदी स्पष्ट कल्पना असतेच. एक तर विजय किंवा मृत्यू। यापैकी काहीतरी घडणार हे निश्चित। परंतु सत्याच्या, न्यायाच्या धर्माच्या बाजूने लढण्यात आणि त्यामध्ये आलेला मृत्यू आनंदाने, हसत-हसत स्वीकारण्यातच खरा पुरुषार्थ आहे. इथे गीतेतील वचनाची सहजच आठवण होते. हतो वा प्राप्स्यसि त्यामुळे अगदी मृत्यूला सामोरे जाताना रक्तामांसाच्या चिखलात देखील कितीतरी चेहऱ्यांवर कृतकृत्यता दिसत होती. आयुष्याची सार्थकता जाणवत होती परंतु अशा फुललेल्या वदनांना पुढच्याच क्षणी तुडवले जात होते. कारण या कलेवरांचा अगदी खच पडला होता. त्याकडे बघायला कोणालाही फुरसत नव्हती.

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

लालभडक रक्ताचे जणू पाट वाहत होते या रणभूमीवर।
परंतु तरीही अगदी मरेहोतोवर शरीर घेऊन योद्धे
लढतच होते --- लढतच होते ---
कलेवरावर पडे कलेवर
असे निशाचर न कळे वानर।
मरणाहूनही शौर्य भयंकर
कैक योजने उडुनि जाती भाग अवयवांचे ॥८॥

'मरणान्तानि वैराणि' असे एक वचन आहे. मृत्यूनंतर वैर संपून जाते. असे म्हणतात. ते पूर्णपणे नाही तरी एका वेगळ्याच अर्थाने इथे खरे ठरलेले दिसते. कलेवरावर कलेवरे पडत होती. ती बाजूला सारायलादेखील कुणाला फुरसत नव्हती. तिथे कुणालाही हद्द सीमा पण उरला नव्हता. कुठे अस्वलाच्या शरीरावर राक्षसाच्या शरीराचे ओझे तर त्याला अगदी लागूनच वानराचे शरीर पडले होते. खरं! तेही पूर्ण नव्हे तर अगदी छिन्नविच्छिन्न झालेले असे होते. त्या शस्त्रांचा वेग आणि सैन्याचा आवेग इतका प्रचंड होता की शरीराचे अवयव तोडल्यानंतरही ते उडून लांब जाऊन पडत होते. मूळ शरीर एकीकडे आणि त्याचे हातपाय दुसरीकडे अशी अवस्था होती. परंतु आता कुणालाही कसलेही भान उरले नव्हते. किती सैन्य मेले? त्यात तुमचे किती? आमचे किती? हा हिशोबही उरला नव्हता. केवळ शौर्य गाजवायचे हा एकच विचार प्रत्येकाच्या मनात होता. त्यामुळे मरणाचे काय त्यांना?

चक्रे चरणे हस्त अंगुले,
शुंडा ग्रीवा शिरे धाकुले
पडले ते आलिंगित झाले।
प्रलयकाळसे अंग थरारे धरणी गगनाचे ॥९॥

सजीव/निर्जीव असाही काही भेद उरला नाही. शस्त्र अन् गात्रांचा जणू काही सडाच पडला होता. कित्येकदा तर चक्र घुसलेल्या अवस्थेत अवयव पडले होते. आणि केवळ सैनिकच नाही, तर त्यांचे रथ, हत्ती, घोडे यांचीही शरीरे भूमीवर पडली होती. हत्तीसारख्या महाकाय प्राण्याची देखील शकले झाली होती



© www.madhaveeraghuveer.com

08 कुठे सोंड तर कुठे कान पडले होते. त्यातच अस्वलांचे पाय, वानरांच्या शेपट्या, राक्षसांचे हात पडले होते. त्याचा एकत्र
09 खच पडला होता. आणि ते देखील अखंड नाही तर पुन्हा त्यांचे तुकडे - तुकडे होत होते. जेव्हा कल्पांत येतो तेव्हा नेमक
10 काय होते बरे? आताच जणू काही प्रलयकाळ आल्यासारखे वाटत होते. आकाश आणि जमीन थरारून उठली होती.
11 निनादत होती. हादरत होती. भयकंपित असेच हे सारे वातावरण होते

धुंद तरी हो कुठे कुणाचे
12 काळमुखातून कोणी नाचे
कुठे कुणाचे कबंध नाचे
13 घुमा बोलतो त्या कोणा तुटके भान कोणाचे ॥३०॥

खरे तर युद्धाचेही काही नियम असतात. दंडक असतात
14 पण इथे तर हा युद्धज्वर इतका कळसाला पोहोचला होता की कोण कुणाशी लढतो आहे हेच कळेनासे झाले
15 होते. इथे द्वंद्वयुद्ध तर नव्हतेच. मग ही कोणाबरोबरची लढाई म्हणावी का? परंतु याचा निर्णय तर सर्वच
16 जाणतात. काळाच्या मुखातून कोणीही वाचत नाही. आजपर्यंत कोणीही काळावर मात करु शकला नाही.
17 शकणार नाही. युद्धाच्या वर्णनातून अद्भुत, रौद्र, भयानक या रसांची निष्पत्ति झाली आहेच. आता या शेवटच्या
18 चरणात तर बीभत्स रसही आहे. कुठे कुणाचे कबंध नाचे। ही कल्पनासुद्धा नकोशी वाटते. अंगावर काटा आणते.
19 मस्तक नसलेल्या धडाचे नाचणे हे दृश्य तर किळस आणणारे आहे. नकोसे वाटणारे आहे. युद्धाचा आवेश रोमरोमात इतका
20 भरुन राहिला आहे की शिर नसताना देखील उरलेला देह नाचला आहे. लढतो आहे. कुणाला हे बघायलाही वेळ नाही. कारण कुणाला कशाचे भानच नाही. असे हे
अभूतपूर्व युद्ध सुरु आहे - - - प्रत्यक्ष रणभूमीवर आपोआपच अनन्वय अलंकार — वाल्मीकि रामायण — रामरावणायुद्ध - - अनुपमेय
बाबूजी - भैरवी - कोमल रेषभ शुद्ध स्वर — विविध रसांचे दर्शन घडवून श्रोत्यांना भोवणतेकडे नेत आहे - - -



© www.madhaveeraghuveer.com

(३४) त्रिवार जयजयकार

१२ एप्रिल २०२१

॥ श्रीराम ॥

। त्रिवार जयजयकार ।

अनुपमेय हो सुरु युद्ध हे रामरावणांचे।

आजपर्यंत कधीही झाले नाही, यापुढे कधी होणार नाही असे घनघोर युद्ध या भूतलावर झाले. दोन्ही पक्ष अगदी तुल्यबळ होते. शस्त्राला शस्त्राने उत्तर दिले जात होते. परस्परांवर तुटून पडत अगदी प्राणपणाने प्रत्येकजण लढत होता. बाणांचा वर्षाव होत होता. शस्त्रांचा भयंकर ध्वनि आसमंतात घुमत होता. गदा गदेवर आदळत होत्या. त्यांचा खणखणाट होत होता. मृत शरीरांचा नुसता खच पडला होता. अशा धुमश्चक्रीत श्रीरामाने रावणाच्या सारथ्याला मारले. रथ मोडून पडला. रावण एकटा पडला होता. वानरसेनेचे पारडे जड होत चालले होते अशा वेळेला रावणाने आपला बलाढ्य असा भावाला - कुंभकर्णाला उठवण्याचा प्रयत्न केला. सहा सहा महिने झोपून राहणाऱ्या या कुंभकर्णाकडे सहाय्यासाठी मागणी केली आणि महापराक्रमी अशा कुंभकर्णाने बंधुप्रेमाखातर ती मान्य केली. व तो समरांगणावर निघाला. त्याने अक्षरशः अतुलनीय पराक्रम गाजवला. वानरांचे जथ्थेच्या जथ्थे घायाळ केले. लक्ष्मणालाही हा कुंभकर्ण आवरेना. सरतेशेवटी श्रीरामांच्या बाण वर्षावाने त्याचे हातपाय तोडले. पर्वतासारखे त्याचे मस्तक बाणाने भेदून अंतरिक्षात उडवून दिले. कुंभकर्णाचा वध झाला. तसेच रावणपुत्र इंद्रजिताचाही लक्ष्मणाच्या बाणाने वेध घेतला. आता रावण एकटाच पडला. दोन्ही वीर अगदी त्वेषाने लढत होते. श्रीरामांनी भुजंगासारखा तीक्ष्ण बाण सोडून रावणाचे मस्तक उडवले. पण काय आश्चर्य! तिथे त्याच जागी त्या मस्तकासारखे दुसरे मस्तक निर्माण झाले. श्रीराम पुन्हा पुन्हा शरसंधान करत होते. मस्तकाचा वेध घेत होते आणि पुन्हा नवीन मस्तक निर्माण होत होते. अशी शंभर मस्तके छेदली परंतु रावणाच्या अंत होण्याची चिन्हे दिसेनात. श्रीरामांच्या पराक्रमामध्ये कुठे कमतरता नव्हती. त्यांच्या शिराचा अचूक वेध घेतला जात होता. मस्तक धडावेगळे होत होते.

© www.madhaveelaghuveer.com

परंतु तिथे तत्काळ दुसरे मस्तक तयार होत होते अत्यंत विवेकी, स्थिरबुध्दी, सुधीर अशा श्रीरामांनाही कळेना की नेमकी चूक कोठे होत आहे? आज का निष्फळ होती बाण! अशी विचारणा ते आपल्या सारथ्याला करत होते. असंख्य राक्षसांना लीलया संपवणाऱ्या मला या दशाननाला का बरे नष्ट करता येत नाहीये! हा माझा नाहि तर माझ्या धनुर्विद्येचा अपमान आहे. अशा निराश अवस्थेत अचानकच श्रीरामांना स्मरण झाले की आणि अगस्ति ऋषींनी वनवासात असताना श्रीरामांना आवर्जून दिलेला ब्राम्ह देदीप्यमान बाण त्यांनी धनुष्याला लावला. आकर्ण प्रत्यंचा खेचून, गुरुंचे स्मरण करुन, श्रीरामांनी रावणाच्या दिशेने बाण सोडला. त्या बाणाने रावणाच्या मस्तकाचा नाही, तर हृदयाचा वेध घेतला. ते हृदय शतशः विदीर्ण झाले. रावणाच्या हातातील धनुष्यबाण खाली पडले. तो राक्षसराज जमिनीवर कोसळला. आपल्या नेत्याची ती अवस्था पाहून राक्षसेना घाबरली, गोंधळली, भांबावली. आणि वाट फुटेल तिकडे पळत सुटली. ही त्यांची दुर्दशा पाहून इकडे वानरसेनेला मात्र चेव आला. तावडीत सापडलेल्या राक्षसांना पकडून काढत त्यांनी विध्वंस सुरु केला. आणि त्याचबरोबर मोठ्याने भुभुःकार सुरु केला. 'रावण मेला, रावण मेला' असा गर्जनांनी आसमंत दणाणून गेला इतरांनीही मोठ्या आवाजात पुकारा केला --- देव हो बघा रामलीला

भुवरी रावणवध झाला !! आणि खरोखरच अंतरिक्षातून पुष्पवृष्टी झाली. नौबती झडू लागल्या. गंधर्व गाऊ लागले -

भुवरी रावणवध झाला ||२|| सर्वत्र हर्षोल्हासाचे वातावरण होते. रामाचा जयजयकार सुरु होता. परंतु स्वतः श्रीराम मात्र या सर्वांपासून अलिप्त होते.

आदर्श राजा, आदर्श पुत्र, आदर्श बंधु, आदर्श पती असणार प्रभू रामचंद्र आता अगदी शत्रू म्हणून देखील आदर्शच होते. एका राजाने दुसऱ्या राजाशी कसे वागावे याचा वस्तुपाठच श्रीरामांच्या वर्तनातून मिळतो.

© www.madhaveeraghuveer.com

'मरणान्तानि वैराणि' म्हणजे मृत्यूनंतर वैरही संपते. असे सांगून त्यांनी बिभीषणाकडून रावणाचे विधिवत और्ध्वदेहिक ही करवून घेतले. आणि हे सर्व झाल्यानंतर हनुमंताकरवी ही शुभ वार्ता सीतेपर्यंत पोहोचवली. अर्थातच सीता अतिशय आनंदित झाली. परंतु आनंदाने तिच्या मुखातून शब्द उमटेना. ती मुग्ध अबोल झाली. अशी ही जनकनंदिनी जेव्हा पतीसमोर आली, तेव्हा त्यांना एकमेकांचे मुखदर्शन झाले. अंतःकरणात कितीतरी भावभावनांचा कल्लोळ झाला असेल. तरीही अत्यंत संयमित स्वरात तिला श्रीराम म्हणाले, "किती यत्ने मी पुन्हा पाहिली तूते। कीर्तिने चारुते सीते।। केवळ दर्शनेच त्यांची भेट घडत असताना श्रीराम सांगत होते - हे तुझ्यामुळे गे घडले तुजसाठी नाही केले।। हा सारा पराक्रम, हे समुद्र उल्लंघन, ही वानरसेना, ही हनुमंताची भेट, रावणवध हे सारे तुझ्यामुळे घडले असले तरी हे मी माझ्यावरील कलंक पुसण्यासाठी आणि रघुवंशाला पूर्वलौकिक प्राप्त करून देण्यासाठी केले आहे. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. परंतु पापी रावणावर मात्र माझा विश्वास नाही. त्यामुळे आपल्यामधील नाते आता संपले आहे. हे ऐकताच सीतेचे हृदय विदीर्ण झाले.

तिने आपल्या पावित्र्याविषयी, शुद्धतेविषयी पुष्कळ सांगून देखील श्रीरामांचा त्यावर विश्वास बसेना. तेव्हा सीतेने चिता सिद्ध करायला सांगितली व अग्निदिव्य केले - त्यात तिचे पावित्र्य व पातिव्रत्य झळकून निघाले. आणि नंतर श्रीरामांनी मोठ्या प्रेमाने सीतेचा स्वीकार केला आणि केवळ राजधर्म पाळण्यासाठी मला हा कठोर निर्णय घ्यावा लागला हेही सांगितले. माझ्यासाठी माझी प्रजा ही देवासमान आहे. प्रजेचे सुख हीच माझी देवपूजा आहे. असे मी मानतो. वैदेही, तुझ्या पवित्रतेविषयी माझ्या मनात खात्री आहे.

सगळी विघ्ने दूर झाली. मनातील संशय सरले. कुठेही किल्मिषाला जागा उरली नाही. पावित्र सीतेला अग्निदिव्य करावे लागले यासाठी श्रीरामांनी अग्निदेवतेच्या पावलांची क्षमा मागितली

व सीतेला स्वामिनी म्हणून संबोधले. सगळीकडे आनंदीआनंद झाला. श्रीरामांनी जानकीचा पत्नी म्हणून स्वीकार केला.

परंतु लक्ष्मणाला या वैभवशाली लंकेविषयी आकर्षण वाटू लागले होते आणि आपण तिथेच स्थायिक व्हावे अशी इच्छा देखील त्यांने बोलून दाखवली. परंतु प्रभू रामचंद्र म्हणाले

अपि स्वर्णमयी लङ्का न मे लक्ष्मण रोचते।
जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी॥

अशी लक्ष्मणाची समजूत घालून सर्व राज्यश्री बिभीषणाच्या स्वाधीन करून त्याला लंकेच्या सिंहासनावर बसवले...

आता मात्र ओढ लागली होती ती अयोध्येची! आता भेट घ्यायची होती ती भरताची! खरंच अयोध्येतील प्रजाजन १४ वर्षे वाट पहात होते ती प्रभू रामचंद्रांची! बिभीषणाने पुष्पक विमानाची व्यवस्था केली. त्यात बसून श्रीराम, लक्ष्मण, सीता अयोध्येकडे निघाले. विमानातून काही भूप्रदेश श्रीराम सीतेला दाखवत होते. काही आठवणी सांगत होते. वाटेत एकच दिवस ते भरद्वाज मुनींच्या आश्रमात थांबले. कारण त्याच दिवशी वनवासाची १४ वर्षे पूर्ण होत होती. विमान अयोध्येला पोहोचण्यापूर्वी हनुमंताकरवी आपल्या येण्याचे वृत्त आधीच कळवले होते. साऱ्या अयोध्यानगरीला एका महोत्सवाचे रूप आले होते. सर्व प्रजाजन उंची वस्त्रे, आभूषणे धारण करून श्रीरामांच्या दर्शनासाठी उत्सुक होते. जवळच असणाऱ्या नंदीग्राम येथे तापसी वृत्तीने राहणारा भरतही अयोध्येत आला होता. सारी अयोध्या शृंगारली होती.

पुष्पक विमान खाली उतरले. सर्व अयोध्यावासीयांनी जयजयकार केला! 'सियावर रामचंद्रकी जय' अशा जयनादाने आसमंत दुमदुमून गेला. सर्वच प्रजाजनांना श्रीराम सीतेचे चरणवंदन करायचे होते. इतक्यात भरत समोर आला. त्याने १४ वर्षे ज्या पादुका सिंहासनावर ठेवून श्रद्धेने त्यांचे पूजन केले होते अशा पादुका त्याने पुन्हा प्रभूंच्या चरणी घातल्या. आनंदाश्रू अनावर झाले होते. आसवांचा पडदा भरत व श्रीरामांच्या मध्ये असल्याने परस्परांना एकमेकांची धूसर आकृती दिसत होती...

परंतु प्रजाजनांना समजेना की यातील भरत कोण व श्रीराम कोण? इतके दोघेही एकरूप झाले होते--

श्रीरामांपासून दूर राहून भरताने श्रद्धेने सिंहासनावर पादुका ठेवून राज्यकारभार सांभाळला होता. परंतु मनात सतत राघवाचे चिंतन होते. दृष्टीसमोर आराध्यदैवत नसताना केलेली भरताची ही 'निर्गुण भक्ती' होती. व श्रीरामांच्या सतत चिंतनाने भरताला ही सरूपता लाभली होती. म्हणजे त्याचे रूप हुबेहूब रामासारखेच झाले होते. मात्र लक्ष्मणाची ही 'सगुण भक्ती' होती. सेवास्वरूप होती. ध्वजदंडाप्रमाणे होती. पाणावलेल्या डोळ्यांनी भरत म्हणाला, "श्रीरामा, दादा तुझे राज्य आता तू परत घे. माझी जबाबदारी संपली."

श्रीरामांनी भरताला आलिंगन दिले. सर्व मातांना प्रणाम केला. उर्मिला, मांडवी, श्रुतकीर्ति यांनी औक्षण केले. हे सर्व सुरू असताना अयोध्यावासीयांचे डोळे श्रीरामांना ओवाळत होते आणि आनंदाने म्हणत होते---

त्रिवार जयजयकार रामा। त्रिवार जयजयकार।।
पुष्पक यानातून उतरले स्वर्गसौख्य साकार।।धृ.।।

एकूणच सौख्याची परमोच्च अवस्था म्हणजे स्वर्गसुख असे मानले जाते. त्या सुखाचा जरी कुणी अनुभव घेतला नसला किंवा तो सांगता येत नसला तरीदेखील आपल्याच आयुष्यातील अगदी जपून ठेवावेत अशा प्रसंगांना आपण स्वर्गीय सुख असे म्हणतो. हा प्रसंग देखील प्रजाजनांना अगदी मर्मबंधातील ठेव म्हणावी असा अमोलिक आनंदाचा सोहळा होता. आणि खरंच आहे अगदी अपूर्व वाटले असणार पुष्पक विमानातून जेव्हा रामजानकीने भूमीवर पाऊल ठेवले असेल, तेव्हा प्रत्यक्ष देवच अवतरल्याची भावना झाली असेल तर त्यात काही नवल नाही. आधीच सगळ्यांचा लाडका श्रीराम या १४ वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर, इतक्या महोत्सवात चमकून) दिसणार होता ही मुळी पर्वणी होती. खूप मोठ्या संख्येने प्रजाजन जमले होते आणि आनंद हा दिल्याने वाढतो. आता तर तो आनंद पोटात मावत नव्हता. सहस्रमुखातून तो आनंद ओसंडत होता---

तुला चिंतीते सुदीर्घ ~~आयु~~ आयु
पुण्यसलिला सरिता सरयु ।
पुलकित पृथ्वी पुलकित वायु ।
आज अहल्येपरी जाहला नगरीचा उद्धार ॥त्रिवार॥३॥

केवळ प्रजाजनच नाही, तर सर्व चराचर सृष्टी या आनंदामध्ये विहरत आहे असं वाटत होतं. लोकांचा आनंद त्यांना त्यांच्या शब्दांतून व्यक्त करता येत होता. परंतु या अयोध्यानगरीतील वृक्ष-वेली, पशु-पक्षी, पर्वत-नद्या देखील आपापल्या परीने आनंद व्यक्त करत होते. पक्षी चिवचिवाट करत होते. फुलपाखरे तर अत्यानंदाने स्वतःभोवती गिरक्या घेत होती. आधीच गंधवती असणारी पृथ्वी देखील या आनंददर्शनाने रोमांचित झाली होती. तिच्या रंध्रारंध्रातून परिमळ फुलत होता आणि हा सुगंध पसरवण्यात वारा तिला साथ देत होता. आनंदाला सुगंधाची साथ लाभली होती. वातावरणात चैतन्य भरून राहिले होते. ज्या शरयूतीरावर हा सोहळा सुरू होता, ती तरी कशी मागे राहील? ती तर या अयोध्येची जीवनवाहिनी आहे. रघुवंशातील वीर पुरुषांचा पराक्रम जिने पाहिला आहे, ज्यांच्या सत्यभाषणामुळे, तपाचरणामुळे जिचे पाणी पावन झाले आहे अशी ही पुण्यतोया शरयू देखील प्रार्थना करते आहे. ती म्हणते आहे, "हे श्रीरामा, मी तुझ्या दीर्घायुष्यासाठी परमेश्वराकडे प्रार्थना करते आहे. तुला सुयश चिंतीते आहे. अहल्या जशी अनेक वर्षे शिळा होऊन पडून होती. परंतु आपले चरण लागताच तिचा उद्धार झाला. तशीच अवस्था आज अयोध्येची झाली आहे. तिचा उद्धार झाला आहे.

शिवचापासम विरह भंगला
स्वयंवरासम समय रंगला
अधीर अयोध्यापुरी भंगला
सानंदा तुला अर्पिते हृद प्रीतीचे हार ॥२॥त्रिवार

आज पुन्हा त्या दिवसाची आठवण होते आहे. जनकनंदिनी समवेत आपण वाजत गाजत अयोध्येमध्ये प्रवेश केला होता. त्या प्रसंगानंतर १४ वर्षांपेक्षा अधिक काळ लो

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

असला तरी काही समानता निश्चित आहे. त्या वेळी आपण शिवधनुष्याचा भंग केला होता आणि आता या अयोध्येला श्रीरामांचा विरह झाला होता, त्याचाच भंग होतो आहे. स्वयंवरस्थानी जसे हर्षोल्हासाचे वातावरण होते तसे औत्सुक्याचे, चैतन्याचे वातावरण आज इथे आहे. ही मंगलमयी अयोध्यानगरी आपल्या मीलनासाठी अगदी आतुर झाली आहे आणि आनंदाश्रूसहित आपल्या आदराचे प्रेमभावनेचे हार आपल्या गळ्यात घालत आहे ---

तव दृष्टीच्या पावन स्पर्शे
आज मांडिला उत्सव हर्षे।
मने विसरली चौदा वर्षे
सुसज्ज आहे तव सिंहासन करी प्रभो स्वीकार ॥३॥

रामभेटीचा हा आनंद इतका अलौकिक आहे की त्या आनंदाच्या लोटामध्ये मधली दुःखदायक अशी १४ वर्षे केव्हाच पुसून टाकली आहेत. आजच्या या आनंदोत्सवामध्ये दुःखाला प्रवेशच नाही. आपल्या वत्सल दृष्टीने मध्यंतरीचा विरहकाळ जणू लुप्तच झाला आहे. आता नको त्या क्लेशदायक आठवणी! आता केवळ आनंद साजरा करु या, आपले सिंहासन तर सज्ज आहेच. त्याचा स्वीकार करावा अयोध्या या रामराज्यासाठी आतुर आहे.

तुझ्या मस्तकी जले शिंपता
सप्त नद्यांना मिळो तीर्थता।
अभिषिक्ता तुज जाणीव येता
मुनिजनांचा पुन्हा होऊ दे अर्थासह उच्चार ॥४॥

राज्याभिषेक प्रसंगी पवित्र नद्यांच्या जलाने अभिषेक करण्याची परंपरा आहे. असे पवित्र जल कलशामध्ये सिद्ध आहे. परंतु तुझ्या मस्तकावर जेव्हा त्या पवित्र जलाचा अभिषेक होईल तेव्हा तुझ्यामुळे त्या सातही नद्यांना पावित्र्य लाभेल. त्यांचे पाणी हे केवळ पाणी न उरता तीर्थ होऊन जाईल. एकीकडे जलप्रोक्षण करत मुनिजन शास्त्रविधिसह मंत्र उच्चारतील त्यातून ते तुला आदर्श राजनीतीचा उपदेश

© www.madhaveeraghuveer.com

करतील. त्याच्या सखोल अर्थासह तो उपदेश तू जाणून घे. आणि उत्तम राज्यकारभार कर----

पितृकामना पुरी होऊ दे
रामराज्य या पुरी येऊ दे।
ते कौसल्या माय पाहू दे
राहीसह तू परंपरेने भोग तुझा अधिकार॥५॥

प्रत्येक व्यक्ती जन्मतःच कितीतरी ऋण घेऊन जन्माला येत असते. त्यामध्ये देवऋण, गुरुऋण, समाजऋण असली तरी सर्वात वरच्या स्थानावर पितृऋण मातृऋण आहे. आणि या ऋणातून उतराई होण्याचा काय उपाय आहे? तर आईवडीलांच्या आज्ञा पाळणे, त्यांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करणे, उतारवयात त्यांना विश्राम देणे, सुखात ठेवणे--- अर्थातच महाराज दशरथांची मनापासून इच्छा होती की त्यांच्या ज्येष्ठ पुत्र श्रीरामाने राज्यकारभार सांभाळावा--- ती इच्छा पूर्ण करून तू आदर्श राजा होशील याची आम्हाला खात्री आहे. या नगरीत रामराज्य येईल. कौसल्यामातेने १४ वर्षे पुष्कळ दुःख सोसले आहे. आता तिला सुखाचे दिवस दाखवणे ही तुझीच जबाबदारी आहे. ती तू उत्तम रीतीने पार पाडशील. सर्व कर्तव्य पार पाडून राही सीतेसह हा परंपरेने आलेल्या अधिकाराचा तू उपभोग घे.

इथे गदिमांनी पुरी या शब्दावर औचित्यपूर्ण श्लेष साधला आहे. पुरी - पूर्ण । पुरी - नगरी

प्रजाजनी जे रचिले स्वप्नी
मूर्त दिसे ते स्वामी लोचनी।
राजा राघव सीता राज्ञी
चतुर्विदसे लोक पूजिती रघुकुलदीपक चार॥६॥

खूप काळपर्यंत प्रजाजनांनी जे स्वप्न पाहिले होते. यापूर्वी देखील रघुवंशाची धवल कीर्ति अनेक पिढ्यांनी पाहिली होती, ऐकली होती. त्यामुळे आदर्श राज्याविषयी अयोध्या वासीयांच्या काही कल्पना होत्या. मनोरथे होती. आता दीर्घ प्रतीक्षेनंतर का होईना ते स्वप्न साकार होत आहे

गीत-४थे- चार बोलडे वेद संगतीच
तुस्या धर्मरत घरी ।।

लाडके कौसल्ये राणी---



राघवांसारखा उत्तम राजा आणि सीतेसारखी सद्गुणी राणी लाभणे हे आमचे सौभाग्य आहे. तो आमच्या मानबिंदु आहे. आणि शिवाय त्रिबाला जीव देणारे हे तुम्ही चार भाऊ म्हणजे या भारतभूमिला कलादमत असणाऱ्या चार वेदांप्रमाणे तुम्ही शोभून दिसत आहात. तुम्हाला त्रिवार वंदन! वारंवार वंदन!

रामराज्य या असता भूवर
कलंक केवळ चंद्रकलेवर।
कज्जल रेखित स्त्रीनयनांवर
विचारातले सत्य आणतील अयोध्येत आचार ।।५।।

रामराज्यातील प्रत्येक गोष्ट शुद्ध, निर्मळ, स्वच्छ, शुभ्र असणार आहे. इथे कृष्णकृत्यांना स्थानच नाही. असत्य-भाषण, अनाचार, अनीति, अविवेक यासारख्या अभद्र गोष्टी इथे शोधूनसुद्धा सापडणार नाहीत. इथे केवळ स्वच्छ प्रकाश असेल. काळ्या रंगाला इथे स्थानच नाही.

आणि अगदी असून असून असलाच थोडासा काळा रंग तर तो केवळ चंद्रलेखवरच्या कलंकरूपाने असेल. किंवा फार तर स्त्रियांच्या नेत्रांना अधिक सुंदर बनवणाऱ्या काजळाचाच काय तो रंग! बाकी सगळीकडे स्वच्छ, नितळ पारदर्शक व्यवहार! कारण या अयोध्येमध्ये जितके विचार शुद्ध तितकेच आचरणही शुद्धच असणार! इथे आचार-विचारांमध्ये कुठे अंतरच नाही. विरोधाभास तर नाहीच नाही. आणि जसा राजा तशी प्रजा! आमच्या राजाचे वर्तन जर सोन्यासारखे शुद्ध असेल तर प्रजा तरी कशी अपवाद असणार? आणि म्हणूनच आम्ही घोष करत आहोत

त्रिवार जयजयकार। रामा, त्रिवार जयजयकार।।
समाधि वर्षतील मेघ धरेवर
सस्यशालिनी धरा निरंतर
सेवारत जन स्वधर्मतत्पर।
शांति: शांति: मुनी वांछिती तो येवो आकार।
त्रिवार जयजयकार, रामा त्रिवार जयजयकार।।१।।

© www.madhavraghuveer.com

मनुष्य आणि निसर्ग हे परस्परांवर निर्भर आहेत.
माणूस बेभान झाला तर निसर्गही कोपतो
माणूस मर्यादशील असेल तर निसर्गही नियमानुसार
वागतो.



| OCTOBER | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

08 भारतीय संस्कृतिमध्ये कधीच स्वार्थी विचार नव्हते
परमेश्वराकडे जे मागणे मागायचे ते विश्वकल्याणा
09 साठी! वैदिक आणि वैदिक प्रार्थना हेच सांगते --
काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी
10 देशोऽयं क्षोभरहितः सज्जनाः सन्तु निर्भयाः
आमच्या ऋषींना, पूर्वजांना सृष्टीच्या हिताची काळजी
11 होती. सर्वांचे कल्याण होवो -- सर्वेऽपि सुखिनः सन्तु।
केवळ मी, माझे परिजन किंवा माझा प्रदेश अशी
12 संकुचित वृत्ती नव्हतीच. माऊलींनी देखील अखिल
प्राणिजातांसाठी वरदान मागितले आहे. जो जे वांछिल --
13 समर्थ म्हणतात - जनहित विवरी।
त्याच भावनेने, त्याच उच्च संस्कारात वाढलेले प्रजाजन
14 रामराज्याचे सुखदायक असे चित्र रंगवत आहेत --
ते म्हणताहेत - पृथ्वीवर सर्वच काही सुरक्षीत सुरू असेल -
15 इतरांच्या सद्गुणांचा आदर केला जात असेल. दुःखितांना
समजून घेतले जात असेल तर आपोआपच निसर्गाला
16 देखील त्याची दखल घ्यावीच लागते --
या पृथ्वीवर योग्य काळी योग्य तेवढा पाऊस पडेल
17 धनधान्याने ही वसुंधरा संपन्न होईल. या भूमीवर
सत्याचे राज्य असेल. लोकही सदाचार व धर्माने
18 वागणारे असतील. प्रत्येक जण स्वधर्माचरण करेल तर
ते सर्वांनाच प्रसन्न करणार ठरेल. कुठेही तेढ होणार
19 नाही आणि सर्व प्रजाजनांना ज्या शांती समाधानाची अपेक्षा
असेल ती शांति इथे साकार होईल ---
त्रिवार जयजयकार, रामा, त्रिवार जयजयकार।।
20

राग भैरवी - हुरहुर लावतो - साफल्य, तृप्ती, समाधान देतो
शेवटचे समूह गीत

१३ एप्रिल २०२१

॥ श्रीराम ॥

त्रिवार जयजयकार! करत श्रीरामांना प्रजाजनांनी सिंहासनाकडे नेले -- शुभ मुहूर्तावर श्रीरामांना राज्याभिषेक झाला -- आणि खऱ्या अर्थाने रामराज्याला सुरुवात झाली. या समारंभासाठी आलेल्या राजांना व आप्तस्वकियांना श्रीरामांनी मोठ्या सन्मानाने निरोप दिला -- रावणाबरोबर झालेल्या अभूतपूर्व युद्धामध्ये त्यांची फार मोलाची मदत झाली होती अशा सुग्रीव, अंगद, जांबुवंत यांचाही आदरसत्कार करून त्यांना मानचिन्हे दिली. बिभीषणालाही अनेक आभूषणे देऊन त्याचा गौरव केला. त्याला लंकेला जाऊन राज्यकारभार करण्याची आज्ञा दिली. हनुमंत हे सर्व तटस्थतेने दुरून पहात होता. खरे तर या सर्व युद्धामध्ये हनुमंताचा सिंहाचा वाटा होता. जेव्हा श्रीरामांनी त्याला विचारले की 'तुला मी काय देऊ?' तेव्हा तो वंदन करून म्हणाला --

प्रभो मज एकच वर द्यावा।
या चरणांच्या ठायी माझा निश्चल भाव असावा ॥ध्रु॥

अध्यात्ममार्गात कधीही दास्यभक्तीचा विषय असेल तर हनुमंताचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. कपिकुळाशी मंडण असणारा हा हनुमान बुधकौशिक ऋषींना देखील वंदनीय वाटतो. श्रीरामचरणौ शरणं प्रपद्ये। हनुमंताच्या उल्लेखाशिवाय श्रीरामकथा पूर्ण होणार नाही. सीतेने दिलेला रत्नहार देखील तोडून टाकणारा व आपली छाती फाडून त्यात रामदर्शन घडवणारा हनुमान आदर्श दास आहे. तो चिरंजीव आहे.

अयोध्येत श्रीरामांचे राज्य आल्यापासून जणू काही पृथ्वीवर स्वर्गच नांदू लागला. सर्वत्र आनंदीआनंद होता. वनवास संपला होता. जानकी देखील अतिशय खुशीत होती. एकदा श्रीरामांच्या समवेत ती उपवनात बसली असता तिची कृश व फिकुटलेली काया पाहून श्रीरामांनी तिला विचारले, 'सीते तुझी प्रकृति ठीक आहे ना? तुला काही होतंय का? काही हवंसं वाटतंय का?' तेव्हा स्मित करत ती म्हणाली --

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

58561 61253

ओठात थांबुनी सशब्द आशा । लाजे ।
डोहाळे पुरवा रघुकुलतिलका माझे ॥

सीता गर्भवती होती. तिला पुन्हा वनविहार करण्याचे डोहाळे लागले होते. १४ वर्षे तिला या निसर्गरम्य वनजीवनाची सवय झाली होती. आता राजमंदिरात असताना वनातील रम्य आठवणी तिला येत होत्या.

मी पुन्हा वनांतरी फिरेन हरिणीवाणी ।

मामा वरेरकर - नाट्यगीत - भूमिकन्या सीता -- सीतेने सलज्ज वदनाने केलेली ही जगावेगळी मागणी म्हणजे एक भावरम्य कविताच आहे.

श्रीरामांनी सीतेचे हे डोहाळे पुरवण्याचे निश्चित केले. परंतु मध्यंतरी अशा काही घटना घडल्या की प्रजाजनांच्या मनाचा मान राखण्यासाठी श्रीरामांनी सीतेचा त्याग केला. अर्थातच सीतेला याची काहीच कल्पना नव्हती. लक्ष्मणाने जेव्हा रथ वनप्रदेशात नेला तेव्हा सीतेला आनंद झाला. परंतु लक्ष्मणाने जेव्हा सत्यकथन केले तेव्हा मात्र ती उन्मळून पडली. तिच्या दुःखाला पारावार उरला नाही. कोठे जावे! काय करावे हे तिला समजेना. आणि ती अतीव दुःखाने विलाप करू लागली

मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे?
पतिचरण पुन्हा मी पाहू कुठे?

माझे जीवन आता निरर्थक वाटते आहे. माझे प्राण आता शरीरातून बाहेर पडायला बघत आहेत. या भागीरथीमध्ये प्रवेश करावा असं मला वाटत आहे. पण तेही मला आता शक्य नाही. कारण मी आता कुणाची मुलगी नाही, सून नाही, पत्नी नाही. पण आता मी होणाऱ्या बाळांची माता आहे. आता या रघुवंशाच्या अंकुरासाठी, त्यांच्या वंशजासाठी मला जगावे लागेल आणि त्यांचा सांभाळ मी करेन. अयोध्येच्या प्रजाजनांच्या मनातून मी जरी उतरले असले तरी माझे प्रभू श्रीराम - राजाराम सुखात राहो हीच माझी इच्छा आहे. भावजी तुम्ही परत फिरा.

कुश - दर्भ - टोकदार पाती - तीक्ष्ण - पवित्र
लव - मऊ सळसळीत, पाणथळ ठिकाणी

NOVEMBER 2015

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

SUNDAY

WEEK 40

DAY 277-088

DATE 04.10.2015

04 OCTOBER

श्रीरामांना माझा प्रणाम सांगा. सीतेच्या आर्त हृदयातून शब्द उमटत होते. परंतु जनमानसातून उठण्याचा सल तिच्या स्वरातून व्यक्त होत होता. श्रीराम हे राजाराम म्हणून श्रेष्ठ ठरले असले तरी सीताराम म्हणून नाही.

अत्यंत जड अंतःकरणाने लक्ष्मण गर्भवती सीतेला वनामध्ये सोडून पुन्हा अयोध्येला परतला. कर्तव्यबुद्धीने श्रीराम राज्यकारभारात लक्ष घालू लागले.

इकडे सीता मात्र असहाय्य स्थितीमध्ये इकडे तिकडे फिरत होती. अशातच तिला एक पर्णकुटी दिसली. ऋषितुल्य आणि प्रेमळ अशा वाल्मीकींना तिने पाहिले. त्यांनी तिची मोठ्या आस्थेने चौकशी केली. तिला आश्रय दिला. अगदी स्वतःच्या कन्येप्रमाणे तिचे पालन केले. यथाकाल ती प्रसूत झाली. तिने जुळ्या अपत्यांना जन्म दिला. ही दोन्ही अपत्ये अशी भाग्यवान की त्यांना आपल्या आईचे प्रेम आणि वाल्मीकींकडून संरक्षण मिळाले. वाल्मीकी शस्त्र व शास्त्र दोन्ही जाणत होते. श्रीरामांच्या या सुपुत्रांना भूत-पिशाच्चांची बाधा होऊ नये म्हणून वाल्मीकींनी अभिमंत्रित कुश व लव त्यांच्या शरीराभोवती फिरवले व कुश/लव अशीच त्यांची नावे ठेवली. वाल्मीकींच्या संस्कारांच्या छायेमध्ये ही दोन्ही बाळ वाढत होती, मोठी होत होती. आता शैशवावस्था संपून ती बारा वर्षांची झाली.

अयोध्येमध्ये रामराज्य नांदत होते. श्रीरामप्रभूंनी राजसूय यज्ञाला प्रारंभ केला होता. दुरून दुरून अनेक राजे, ऋषि-मुनि, प्रजाजन अयोध्येत आले होते. मुनिवर्य वाल्मीकी देखील आपल्या शिष्यांसह म्हणजेच लव/कुश यांच्यासह आले होते. त्रिकालज्ञानी असे वाल्मीकी आपल्या दोन्ही शिष्यांना रामचरित्रातील प्रसंग आपल्या गळ्यातून मांडण्याचा आदेश देत आहेत. आणि रामाच्या नगरीमध्ये जाऊन रामकथेचे गायन करण्यास सांगत आहेत.

© www.madhaveeraghuveer.com

रघुराजाच्या नगरी जाऊन
गा बाळांनो, श्री रामायण ॥

मुनिजन पुनित सदना मधुनि
नराधिपांच्या निवासस्थानी।
उपमार्गानुन राजपथानुनि
मुक्त दरवळो तुमचे गायन ॥१॥

ह्या अयोध्यानगरीमध्ये तुम्ही प्रथमच आला आहात. या नगरीचे माहात्म्य मी तुम्हाला सांगतो. ही अ+योध्या - अजिंक्य अशी नगरी आहे. कितीतरी मुनिजनांच्या तपाचरणाने पवित्र झालेली ही नगरी आहे. इथले राजे देखील पराक्रमी आणि तरीही मर्यादशील आहेत. प्रजाहितदक्ष असूनही ते उपभोगशून्य स्वामि या नात्याने आणि राजर्षींच्या आदेशानुसार राज्यकारभार करतात. पूर्वी राजांना राजर्षींचा धाक असायचा. प्रत्येक राजाला सल्ला देणारा ऋषि असायचे. Legislation - Execution युद्ध, तह, समेट, यांचा निर्णय ऋषी घ्यायचे. अशा साधुवृत्तीने राहणाऱ्या ऋषींच्या नियमनामुळे राजा नेहमी प्रजारंजन करणारा, प्रजेला सुखात ठेवणारा असायचा. ही अयोध्या नगरी आखीव-रेखीव आहे. इथे महामार्ग सुशोभित आहेत. त्याला काटकोनात येऊन मिळणारे उपमार्ग ही आहेत. वृक्ष वेली, फुलां फळांनी सुशोभित वातावरण सुगंधित आहे. त्याच्या जोडीला गंधाच्या जोडीला सुरांचा दरवळही या मार्गामधून पसरू दे...

रसाळ मुळे फळे सेवुनी
रसाळता द्या स्वरात भरुनी
अनुकूल घेत जा स्वरा मिळवुनी
लय तालांचे पाळा बंधन ॥२॥

ही रामकथा गाताना तुम्ही प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. रसाळ अशा फळांनी, कंदमुळांनी तुमची क्षुधाशांती होईल व आणि शिवाय त्या फळांचा गोडवा तुमच्या स्वरामध्ये
2015 उतरून राहू दे. तुमची रसाळ वाणी प्रजाजनांची मने

© www.madhaveeraghuveer.com

आकर्षून घेईल. मात्र तुमचे स्वर तुम्ही पक्के करा. लय व तालाशी बंधने पाळून तुमच्या गायनामध्ये आगळी शुद्धता येऊ दे. जनमानसात तुमच्या प्रभाव पडू दे--

नगरी जमिला लोक पाहण्या
जाईल वार्ता श्री रघुनाथा ।
उत्सुक होऊनी श्रवणा करण्या
करतील ते तुम्हा निमंत्रणा ॥७॥

योग्यत्या, प्रशंसनीय, कौतुकाच्या गोष्टी पसरायला वेळ लागत नाहीत. अयोध्येत कितीतरी अतिथी, अभ्यागत येत असतात. पण हे दोन कुमारवयीन बटु आपल्या मधुर वाणीतून नितकीय मधुर अशी रामकथा सांगत आहेत. ज्यांनी ऐकले ते मुग्ध झाले आणि म्हणूनच ते एकमेकांना कौतुकाने ही वार्ता सांगत आहेत. असे होता होता अगदी सहजच ही बातमी राजवाड्यापर्यंत पोहोचेल. तिथून कानोकानी ती श्रीरामप्रभूंपर्यंत जाईल. आणि आनंदाने औत्सुक्याने राजा श्रीराम तुम्हाला राजवाड्यात पाचारण करेल. आणि ही संधि तुम्ही दवडू नका---

संक्रम द्या पुरता ध्यानी
भाव उमटू द्या स्पष्ट गायनी ।
थोडे थोडे गान नितदिनी
पूर्ण कथेचे साधा निजगानी ॥८॥

मात्र तुम्ही प्रभु रामचंद्रांसमोर गाणार आहात याचे भान ठेवा. तिथे गाताना सर्गांचा यथायोग्य क्रम लक्षात घेऊनच गायचे आहे. सावधानतेने सर्गांची नोंद घ्या. आणि त्या प्रसंगाला अनुरूप असे भाव समजून घ्या आणि त्यानुसार तसे तसे स्वर तुमच्या कंठातून उमटू द्या. हे चरित्र जरी पुष्कळ मोठे असले तरी त्यातील थोडा थोडा भाग रोज म्हटलात तर तुम्हाला योग्यतो परिणाम साधता येईल. आणि ही कथा पूर्ण होईल. शिवाय त्याची रंगत वाढत जाईल.

©www.madhaveeraghuveer.com

नका सांगू रे नाम ग्राम वा
स्वतःस माझे शिष्यच म्हणवा
स्वरात ठेवा हास्य गोडवा
योग्य तेवढे बोला भाषण ॥५॥

अर्थातच ही गोड गळ्याची गुणी मुले आहेत तरी कोण? अशी चौकशी निश्चितच कुणीतरी करतील. त्या बाबतीत मात्र फारसे काही न बोलता केवळ माझे शिष्य एवढीच तुमची ओळख द्या. अर्थात विचारलेल्या प्रश्नांना उत्तर न देणे हा एखाद्याचा अनादर होऊ शकतो. परंतु चेहऱ्यावर हास्य आणि स्वरामध्ये माधुर्य असेल तर समोरच्याचा गैरसमज होणार नाही. मोजके बोलणे असेल तर व्यर्थ बोलण्याला आपोआपच आळा बसतो. मितभाषी व्यक्ती अंतःकरणाचा ठाव घेऊ शकते. कमी बोला परंतु योग्य बोला।

स्वये ऐकता नृप शत्रुजय
संयत असू द्या मुद्रा अभिनय।
काव्य नव्हे हा अमृतसंचय।
आदरील त्या रघुकुलभूषण ॥६॥

ज्या श्रीरामांनी हा राजसूय यज्ञ मांडला आहे ते श्रीराम शूर पराक्रमी आहेत. अनेक बलाढ्य शत्रूंना त्यांनी पराभूत केले आहे. असा हा शत्रुंजय नृप ज्ञानी आहे. अंतर्यामी आहे. त्यांच्या समोर वावरताना शरीरावर जेवढा संयम हवा तसाच तुमच्या देहबोलीवर हवा. तुमच्या मुद्रेवरचे भाव शांत असू द्या. प्रसंगाला अनुकूल असा तुमचा अभिनय असू दे. तुम्ही जे काव्य गाणार आहात ते काही सामान्य काव्य नाही तर तो प्रत्यक्ष अमृताचा निधी आहे. अलौकिक असा अक्षय संचय आहे. आणि 'गुणी गुणं वेत्ति' या न्यायाने तो गुणग्राहक राजा श्रीराम तुमच्या अद्भुत गुणांची कदर करेल. तो त्याचा आदर करेल. तशी उदारता आणि उदात्तता त्याच्या रोमरोमात आहेच.

स च सर्वगुणोपेतः कौसल्यानन्दवर्धनः।
समुद्र इव गाम्भीर्ये धैर्येण हिमवानिव॥



08

नच स्वीकारा धना कांचना
नको दान रे नको दक्षिणा।

09

काय धनाचे मूल्य मुनिजना।
अवघ्या आशा श्रीरामार्पण॥७॥ गा बाळांनो —

10 तुमच्या गीत गायनाने श्रीराम प्रमुदित होतील, प्रफुल्लित होतील. आणि प्रसन्न होतील. साहजिकच त्यामुळे ते तुम्हाला

11 काही तरी, पारितोषिक स्वरूपात दान, दक्षिणा, द्रव्य, अलंकार देऊ करतील. परंतु बाळांनो, हे ध्यानात ठेवा -

12 यापैकी कशाचाही तुम्ही स्वीकार करू नका. आपण संतोषवृत्तीने राहणारे आहोत. या बाह्य भौतिक वस्तूंचे

13 आपल्याला किंचितही आकर्षण नाही. सगळ्या आशा आकांक्षा श्रीरामाच्या चरणी अर्पण करणे हेच आपले

14 अंतिम लक्ष्य असणार आहे

15

वर्तुळ पूर्ण — स्वये श्री
गा बाळांनो

16

सात भाषांमध्ये काव्यमय रूपांतर।

17

जोवरि जग हे जोवरि भावना
तोवरि नूतन गीतरामायण

18

काव्य नव्हे हा अमृतसंचय।

19

गीतरामायणाची थोरवी

20

हे कार्य दैवीच आहे.

१९८० रौप्यमहोत्सव
२००५ सुवर्णमहोत्सव
अजरामर कलाकृती —

© www.madhaveeraghuveer.com